


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, रविवार १९ एप्रिल २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०+४




# होर्मुझमध्ये भारतीय जहाजांवर गोळीबार



## टँकर्सचा यू-टर्न,'मच्छर फ्लिट'चा दरारा

**तेहरान/वृत्तसंस्था :** इराणी नौदलानं होर्मुझ सामुद्रधुनी ओलांडण्याच्या प्रयत्नात असलेल्या दोन जहाजांवर गोळीबार केला आहे. अमेरिकेच्या नाकाबंदीच्या प्रत्युत्तरात इराणनं होर्मुझमधील जलमार्ग पुन्हा एकदा बंद करण्याची घोषणा केल्यावर गोळीबाराची घटना घडली आहे. इराणी नौदलानं ज्या दोन जहाजांवर गोळीबार केला, ती जहाजं भारतीय असल्याची माहिती समोर आली आहे. इराणकडून झालेल्या गोळीबारामुळे होर्मुझमध्ये तणाव वाढला आहे.

होर्मुझची सामुद्रधुनी इराणनं बंद केलेली असताना भारतीय जहाजांनी याच मार्गानं जाण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी इराणी नौदलांकडून गोळीबार करण्यात आला. इराणच्या तस्नीम वृत्तसंस्थेनं याबद्दलचं वृत्त दिलं आहे. 'होर्मुझ सामुद्रधुनीमध्ये आयआरजीसीनं केलेल्या गोळीबारानंतर दोन भारतीय जहाजांनी आपला मार्ग बदलला. त्यांनी यू-टर्न घेतला. ही जहाजं पश्चिमेकडे वळली. या जहाजांमध्ये एक भारतीय झेंडा असलेला सुपरटँकर (VLCC) होता. त्यामध्ये २० लाख बॅरल इराकी तेल होतं,' अशी माहिती तस्नीम वृत्तसंस्थेनं दिली आहे.

टँकर ट्रॅकर्स डॉट कॉमनं दिलेल्या माहितीनुसार, 'आज रेकॉर्ड करण्यात आलेल्या दोन चॅनल १६ ऑडिओ रेकॉर्डिंगनुसार, इराणच्या Sepah (IRGC) नौदलानं दोन भारतीय जहाजांना होर्मुझ सामुद्रधुनीतून पश्चिमेच्या परत जाण्यास भाग पाडलं. यावेळी गोळीबार झाला. या जहाजांमध्ये एक भारतीय झेंडा असलेल्या VLCC सुपरटँकर आहे. त्यात २० लाख बॅरल इराकी तेल आहे.' अमेरिकेनं होर्मुझमध्ये नाकाबंदी सुरु ठेवल्यावर इराणनं आक्रमक पवित्रा घेतला आहे. होर्मुझवर पुन्हा नियंत्रण मिळवत इराणनं त्यांच्याकडे असलेला मच्छर ताफा अर्थात मॉस्किटो फ लीट सक्रिय केलं आहे. हा ताफा पडद्याआडून कारवाया करतो. होर्मुझवरील नियंत्रणात या ताफ्याची भूमिका महत्त्वाची आहे. मॉस्किटो फ लीटचा आकार लहान असतो. या बोटी अतिशय लहान असल्यानं त्यांच्या कारवाया वेगवान असतात. त्यांची निर्मिती आणि रचनाच मोठ्या जहाजांच्या वाहतुकीत अडथळा आणण्यासाठी केली गेलेली आहे. या बोटी इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डच्या नौदलाचा प्रमुख हिस्सा आहेत. इराणच्या रिव्होल्युशनरी गार्डनं होर्मुझवर पूर्णपणे नियंत्रण मिळवलं. सामुद्रधुनी ओलांडण्यासाठीची परवानगी त्यांच्याकडूनच दिली जात आहे.

मॉस्किटो फ लीट एखाद्या छापा टाकणा-या पथकाप्रमाणे काम करतात. मोठ्या युद्धनौका आणि पारंपरिक नौदल लढाया यांच्याऐवजी इराणनं मारा आणि पळा या रणनीतीचा अवलंब केला आहे. या बोटींचा माग काढणं अतिशय अवघड असतं. या बोटींमधून नौदलाचे सैनिक क्षेपणास्त्रं आणि ड्रोन्स सोडू शकतात. आकार अतिशय लहान असल्यानं या बोटी सॅटेलाईट फोटोंमध्ये दिसत नाहीत. समुद्र किना-यांवर असलेल्या गुफांमध्ये या बोटी बांधलेल्या असतात. गरज पडल्यास अवघ्या काही मिनिटांत त्या तैनात केल्या जातात. या बोटी होर्मुझमधून जाणा-या व्यापारी जहाजांसाठी धोकादायक ठरु शकतात.

## 'तुम्हीच परवानगी दिली आणि आता गोळीबार करताय?'

हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणा-या 'जग अर्णव' या भारतीय तेल टँकरवर इराणच्या रिव्होल्युशनरी गार्ड्सनी केलेल्या गोळीबाराचा धक्कादायक तपशील समोर आला आहे. गोळीबार सुरू झाल्यानंतर भारतीय जहाजाच्या कॅप्टनने रेडिओ संदेशाद्वारे इराणच्या नौदलाला खडेबोल सुनावले. या संवादाची ऑडिओ क्लिप आणि माहिती आता जागतिक स्तरावर चर्चेचा विषय ठरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जेव्हा इराणच्या गनबोट्सनी विना इशारा गोळीबार सुरू केला, तेव्हा भारतीय कॅप्टनने इराणी नेव्हीला सुनावले आहे.



■ भारतीय कॅप्टनचा इराणच्या नेव्हीकडून विश्वासघात
■ रेडिओवरील थरार समोर

भारतीय कॅप्टन: 'सेपाह नेव्ही (इराण नौदल), आम्ही तुमच्याकडूनच रीतसर 'क्लिअरन्स' (परवानगी) घेउन या मार्गावरून जात आहोत. तुम्ही आम्हाला पुढे जाण्याची संमती दिली होती, मग आता आमच्यावर गोळीबार का करत आहात?' तुमच्या यादीत माझे जहाज दुस-या क्रमांकावर आहे, असेही या कॅप्टनने सांगितले. परंतू, इराण गोळीबार करतच राहिला. यावर इराणच्या बाजूने कोणतेही स्पष्टीकरण दिले गेले नाही, उलट गोळीबार सुरूच ठेवण्यात आला. यामुळे भारतीय टँकरला आपला मार्ग बदलावा लागला. इराणने स्वतःच हा सागरी मार्ग खुला केल्याचे जाहीर केले होते आणि भारतीय जहाजाला अधिकृत परवानगीही दिली होती. असे असूनही झालेला हा हल्ला विश्वासघातासारखा असल्याचे भारताने म्हटले आहे. परराष्ट्र मंत्रालयाने इराणच्या राजदूताला बोलावून या 'रेडिओ ट्रान्सक्रिप्ट'चा हवाला देत जाब विचारला आहे. 'जग अर्णव' हे जहाज २० लाख बॅरल तेल घेउन जात होते. इराणच्या या कृतीमुळे जागतिक स्तरावर इराणच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सध्या हे भारतीय जहाज ओमानच्या दिशेने सुरक्षितपणे परतले आहे, मात्र या घटनेमुळे आखाती देशांतील तणाव एका नव्या वळणावर पोहोचला आहे.

# काल आमचे संख्याबळ कमी पडले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला आरक्षण विधेयक पडल्यानंतर काँग्रेसच्या नकारात्मक राजकारणावर टीका केली. 'आमचा संकल्प थांबणार नाही, प्रत्येक अडथळा दूर करू,' असे म्हणत त्यांनी देशातील महिलांना आश्वस्त केले आहे.



'लोकसभेत काल आमच्याकडे आवश्यक संख्याबळ नव्हते, याचा अर्थ असा नाही की आम्ही हरलो आहोत. आमचे आत्मबळ अजेय आहे आणि मी देशातील माता-भगिनींना विश्वास देतो की, महिला आरक्षणाच्या मार्गातील प्रत्येक अडथळा आम्ही दूर करूच,' अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपला इरादा स्पष्ट केला. महिला आरक्षण विधेयक मंजूर न झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्यांनी काँग्रेसच्या जुन्या कार्यपद्धतीवरही कडाडून टीका केली.

'देशासाठी जे निर्णय गरजेचे असतात, ते कार्पेटखाली ढकलणे ही काँग्रेसची जुनी सवय आहे. 'लटकवणे, अटकवणे आणि भटकवणे' हेच काँग्रेसचे वर्क कल्चर राहिले आहे. सभागृहात आम्हाला २/३ (६६%) मते मिळाली नसतील, पण देशातील १००% नारी शक्तीचा आशीर्वाद आमच्या पाठीशी आहे. महिलांना संसदेत येण्यापासून कुणीही रोखू शकणार नाही, केवळ योग्य वेळेची प्रतीक्षा आहे,' असे पंतप्रधान म्हणाले. स्वातंत्र्यानंतर आपल्यासोबत स्वतंत्र झालेले अनेक देश भारताच्या पुढे गेले, कारण काँग्रेसने प्रत्येक महत्त्वाचा निर्णय लटकवून ठेवला. सीमा विवाद असो वा पाकिस्तानसोबतचा पाणी प्रश्न, काँग्रेसने केवळ राजकारण केले, असा आरोप मोदींनी केला.पंतप्रधानांनी आरोप केला की, काँग्रेसने जनधन योजना, डिजिटल पेमेंट, जीएसटी, कलम ३७० हटवणे आणि तिहेरी तलाक कायद्यासह प्रत्येक क्रांतिकारी निर्णयाला विरोध केला आहे. आता 'वन नेशन वन इलेक्शन' आणि 'यूसीसी' लाही हाच पक्ष विरोध करत आहे. जर हे विधेयक मंजूर झाले असते, तर उत्तर प्रदेश, बंगाल, केरळ यांसारख्या सर्वच राज्यांतील लोकसभेच्या जागा वाढल्या असत्या. डीएमके आणि टीएमसीने केवळ विरोध करण्यासाठी आपल्याच राज्यांतील जनतेला संधीपासून वंचित ठेवले आणि विश्वासघात केला,' असे मोदी म्हणाले.समाजवादी पक्षाने या विधेयकाला विरोध करून डॉ. राम मनोहर लोहियांचे स्वप्न पायाखाली तुडवले आहे, अशी टीका त्यांनी केली. 'विरोधकांनी या विधेयकाचे श्रेय घेतले असते तरी मला चालले असते, मी स्वतः जाहिरात देउन त्यांना क्रेडिट दिले असते. पण त्यांचा हेतू खोटा होता. आमचा हा प्रयत्न थांबणार नाही, भविष्यात आम्हाला अजून संधी मिळतील आणि आम्ही हा संकल्प पूर्णच करू,' असा ठाम विश्वास पंतप्रधानांनी व्यक्तकेला. दरम्यान पंतप्रधानांच्या संबोधनापूर्वी, पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी त्यांच्यावर जोरदार हल्ला चढवला आहे. पंतप्रधान पुन्हा एकदा असत्याचे जाळे विणतील, असे त्यांनी म्हटले आहे. ममता बॅनर्जी यांनी असा आरोप केला की, महिला आरक्षणासंदर्भातील विधेयक देशात फूट पाडण्याच्या विशिष्ट उद्देशानेच मांडण्यात आले होते असे त्या म्हणाल्या.

### *ओंकारेश्वरवरून परतताना अपघात*

# एकाच कुटुंबातील 3 ठार

**खंडवा//वृत्तसंस्था :** मध्य प्रदेशातील खंडवा जिल्ह्यातील बोरगाव परिसरात शुक्रवारी पहाटे सुमारे पाच वाजता झालेल्या भीषण कार अपघातात जळगाव जिल्ह्यामधील भुसावळ तालुक्यातील वरणगाव फॅक्टरी परिसरात राहणा-या एकाच कुटुंबातील तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला, तर चौघे गंभीर जखमी झाले. या अपघाताने संपूर्ण वरणगाव आणि दर्यापूर शिवार परिसरावर शोककळा पसरली. अपघातग्रस्त ठाकूर कुटुंबाच्या घरी नातेवाईक आणि शेजा-यांनी मोठी गर्दी केली होती.

**कारवरील नियंत्रण सुटल्याचा अंदाज-** ऊज्जैन ओंकारेश्वर आणि सीओ येथील देवदर्शन करुन मूळ गावी परत येत असताना झालेल्या अपघातात वरणगाव येथील तिघांचा मृत्यू झाला. वरणगाव येथील श्याम विक्रम ठाकूर (वय ४५), शोभा विक्रम ठाकूर (वय ६०) व शिवन्या श्याम ठाकूर (वय ५) अशी मृतांची नावे आहेत. प्रवासादरम्यान पहाटेच्या सुमारास वाहनावरील नियंत्रण सुटल्याने कार रस्त्यावर पलटी झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे, मात्र अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

**अपघातात एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू-** अपघाताच्या वेळी कार चालवणा-या श्याम ठाकूर यांचा जागीच मृत्यू झाला तर गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या शोभाबाई ठाकूर यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचीही प्राणज्योत मालवली. लहानगी शिवन्या हिला ब-हाणपूर येथील खाजसगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले परंतु उपचार सुरू असताना तिनेही प्राण सोडले झाला. या अपघातात चार भाविक जखमी झाले असून त्यांच्यावर विविध रुग्णालयांत उपचार सुरू आहेत.

# ऊन्हाच्या चटक्यासोबतच 'गारपिटी'चे संकट!

## राज्यात 20 ते 22 एप्रिल दरम्यान वादळी पावसाचा इशारा

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्रात २० ते २२ एप्रिल दरम्यान वादळी पावसासह गारपिटीची शक्यता आहे. पुणे, छत्रपती संभाजीनगर आणि विदर्भात विजांच्या कडकडाटासह पाउस होईल. कडाक्याच्या उन्हाचा चटका सोसणा-या राज्यातील जनतेसाठी हवामान खात्याने एक महत्त्वाची सूचना दिली आहे. येत्या २० ते २२ एप्रिल दरम्यान राज्याच्या विविध भागांत हवामानात मोठे बदल होणार असून, वादळी वा-यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज असल्याने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, उत्तर खानदेश, पश्चिम महाराष्ट्रातील घाट माथा आणि दक्षिण मराठवाड्यात



पावसाचा जोर अधिक राहू शकतो. १९ एप्रिलला दुपारनंतर घाट क्षेत्र आणि उत्तर खानदेशात ढगाळ वातावरण निर्माण होउन वादळी पावसाला सुरुवात होउ शकते. २० आणि २१ एप्रिलला पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. पुणे विभाग, छत्रपती संभाजीनगर, दक्षिण मराठवाडा आणि विदर्भातील अमरावती परिसरात विजांच्या कडकडाटासह सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. २२ एप्रिलला पावसाचा जोर हळूहळू ओसरण्याची चिन्हे आहेत. अवकाळी पाउस आणि गारपिटीचा धोका लक्षात घेता कृषी विभागाने शेतक-यांसाठी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत:

१. पीक संरक्षण: काढणी केलेली पिके सुरक्षित जागी किंवा ताडपत्रीने झाकून ठेवावीत. २. कामाचे नियोजन: शेतीची कामे हवामानाचा अंदाज घेउनच नियोजित करावीत. ३. विजेपासून संरक्षण: वादळ आणि विजांचा कडकडाट सुरू असताना झाडाखाली किंवा मोकळ्या जागेत आश्रय घेणे टाळावे.राज्यात सध्या तापमानाचा पारा वाढलेला असताना, दुपारनंतर अचानक आभाळ दाटून येण्याचे प्रमाण वाढणार आहे. अरबी समुद्रावरून येणा-या बाष्पयुक्त वा-यांमुळे हे बदल होत असल्याचे हवामान तज्ज्ञांचे म्हणणे आहे. या वादळी पावसामुळे उकाड्यापासून काहीसा दिलासा मिळणार असला, तरी शेती पिकांच्या नुकसानीची भीती व्यक्त केली जात आहे.

## महाराष्ट्रात ऊष्णतेचा इशारा

# विदर्भात तापमान 44 अंश पार

## अमरावतीत सर्वाधिक ४४.४ अंश तापमान



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सध्या तापमान खूप जास्त वाढताना दिसत आहे. घराबाहेर पडल्यावर घामाच्या धारा लागतात. दरम्यान, महाराष्ट्रात सर्वाधिक तापमानाची नोंद विदर्भात झाली आहे. विदर्भात तीव्र ऊष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी कडक उन्हात बाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे. तसेच अनेक जिल्ह्यांमध्ये शाळा-कॉलेजला सुटी देण्यात आली आहे. विदर्भात तापमानाचा पारा वाढतच आहे. वाढते तापमान ⇨(पान २ वर)

# 'कॉर्पोरेट जिहाद'ची होणार चौकशी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) मध्ये घडलेली घटना अंत्यत गंभीर आहे. ही घटना कॉर्पोरेट जिहादमध्ये मोडते का? याची सरकार गांभीर्याने चौकशी करीत आहे. यंत्रणा या घटनेच्या मुळाशी जाण्यासाठी सखोल तपास करीत आहेत. जर एखाद्या कटाचा पुरावा समोर आला, तर सरकार निर्णायक कारवाई करण्यास तयार असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. नाशिक टीसीएसमध्ये घडलेली घटना अत्यंत गंभीर आहे. या प्रकरणाची दखल घेतल्याबद्दल मी टीसीएसचे आभार मानतो. टीसीएसच्या प्रमुखांनी या घटनेचा निषेध केला असून, ते चौकशीत पोलिसांना सहकार्य करत आहेत. आम्हीही या घटनेच्या



मुळाशी जाण्याचा प्रयत्न करत आहोत. धर्मांतर आणि छळाच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर टीसीएसने आपल्या नाशिक शाखेतील कर्मचा-यांना सुरक्षिततेसाठी खबरदारीचा उपाय म्हणून घरून काम करण्यास सांगितले आहे. तपासादरम्यान पोलिस अधिका-यांनी संशयित आरोपींमध्ये झालेले सुमारे ७८ संशयास्पद फोन कॉल रेकॉर्ड, ई-मेल आणि चॅट्स जप्त केले आहेत. पोलिसांना संभाव्य आर्थिक व्यवहारांचेही पुरावे मिळाले आहेत. एकूण नउ गुन्हे दाखल केले असून, एक गुन्हा देवळाली कॅम्प पोलिस ठाण्यात आणि उर्वरित आठ गुन्हे मुंबई नाका येथे दाखल केले आहेत.

**'निदा खानवर धर्मांतराचे आरोप नाहीत'-** नाशिक टीसीएस प्रकरणात निदा खानचे प्रतिनिधित्व करणारे अ‍ॅड. बाबा सय्यद यांनी सांगितले की, त्यांच्या अशिलावर धर्मांतर किंवा छळाचे कोणतेही आरोप नाहीत. धार्मिक भावना दुखावल्याच्या आरोपाखाली निदा खानचे नाव एफआयआरमध्ये नोंदवण्यात आले आहे. निदा खान टीसीएसमध्ये एचआर मॅनेजर नव्हती, तर ती प्रोसेस असोसिएट म्हणून काम करत होती. पहिल्या तक्रारीत बलात्कार आणि धार्मिक भावना दुखावण्याच्या गुन्ह्यांशी संबंधित कलमे होती. दानिश शेखला मुख्य आरोपी करण्यात आले असून, निदा खान आणि अत्तार हे सहआरोपी आहेत. पोलिस तपासात इतर बेकायदेशीर कृत्ये उघडकीस आली आणि आठ एफआयआर दाखल करण्यात आले. इतर एफआयआरमध्ये जबरदस्तीने धर्मांतराचा उल्लेख नाही, केवळ धार्मिक भावना दुखावल्याची तक्रार आहे. दोन आरोपी पोलिस कोठडीत आहेत. त्यांची कोठडी शनिवारी संपेल, असेही ते म्हणाले.

## भीषण अपघातात दोघे ठार

**नागपूर :** नागपूर शहरातील वाढत्या विकासकामांमुळे निर्माण होणा-या धोकादायक परिस्थितीचा आणखी दोन बळी गेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठातील दोन विद्यार्थ्यांचा दुचाकी अपघातात मृत्यू झाला असून, या घटनेमुळे सुरक्षिततेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सक्षम विनोद बन्सोड (वय २०) आणि आर्यन रवींद्र सोनटक्के (वय २०) अशी मृत विद्यार्थ्यांची नावे आहेत. दोघेही विधि विद्यापीठाच्या तृतीय वर्षात शिक्षण घेत होते आणि वसतिगृहात राहत होते. बुधवारी १५ एप्रिल रोजी रात्री मित्रांसोबत जेवण करून परत येत असताना ही दुर्घटना घडली. वर्धा रोडजवळ निर्जन भागात, अंधारात आणि अपु-या रस्ते व्यवस्थेमुळे त्यांची दुचाकी खोल ⇨(पान २ वर)

# मंत्रालयात मंत्र्यांसोबत आता एकाच व्यक्तीला प्रवेश



◆ मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी अनिवार्य
◆ गर्दी नियंत्रणासाठी मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई: मंत्रालयात होणारी कार्यकर्त्यांची जत्रा आणि मंत्र्यांच्या मागे धावणारी पीएंची फौज आता या सगळ्याला चाप बसणार आहे. महाराष्ट्र सरकारने मंत्रालयातील अफाट गर्दी टाळण्यासाठी एक अत्यंत कडक आणि मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्र्यांसोबत फक्त एकाच व्यक्तीला प्रवेश दिला जाणार आहे. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी याबाबतचे कडक निर्बंध जारी केले असून, सर्व मंत्र्यांना याबाबतच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयात जणू जत्रा भरलेली असते. मतदारसंघातील प्रश्न, कार्यकर्त्यांची कामं आणि पदाधिका-यांची लगबग यामुळे मंत्रालयाचा सहावा आणि सातवा मजला अक्षरशः गजबजलेला असतो. या गर्दीमुळे कामकाजात मोठा अडथळा निर्माण होत असल्याचं निरीक्षण मुख्य सचिवांनी नोंदवलं आहे. याच गर्दीला 'ब्रेक' लावण्यासाठी आता सरकारने नियमावली कडक केली आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्र्यांसोबत त्यांच्या कार्यालयातील केवळ एकाच व्यक्तीला मंत्रिमंडळ सभागृहापर्यंत एन्ट्री मिळेल. इतर पीए किंवा ⇨(पान २ वर)

# परतवाडा लैंगिक शोषण प्रकरण: 'चुकीची वक्तव्ये करून वातावरण बिघडवू नका'

## चंद्रशेखर बावनकुळेंचा भाजप नेत्यांना सल्ला



**अमरावती/प्रतिनिधी :** परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणावरून राजकीय नेत्यांमध्येच आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत, त्याविषयी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आपल्याच पक्षातील नेत्यांना प्रसार माध्यमांमध्ये बेजबाबदार वक्तव्ये करून वातावरण बिघडवू नका, असा सल्ला दिला आहे.

**नेत्यांनी पुरावे द्यावेत-** चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, खा. डॉ. अनिल बोंडे यांच्याकडे काही पुरावे असतील, तर त्यांनी ते पोलिसांनी दिले पाहिजेत. या प्रकरणात डॉ. अनिल बोंडे, माजी खासदार नवनीत राणा किंवा अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान जे काही वक्तव्य करीत आहेत, त्यातून समाजामधील वातावरण बिघडणार नाही, याची काळजी त्यांनी घेतली पाहिजे. प्रसार माध्यमांमध्ये दिलेल्या वक्तव्यामुळे पोलीस तपास भरकटणार नाही, याची सर्वच नेत्यांनी काळजी घेतली पाहिजे. जी काही माहिती आहे, ती त्यांनी पोलिसांना, विशेष तपास पथकाला दिली पाहिजे.

■ १५ वर्षीय पीडितेचा जबाब नोंदवण्याची प्रक्रिया सुरु
■ 'एसआयटी'मार्फत सखोल चौकशीचे आदेश

**एका पीडितेचा जबाब-** बावनकुळे म्हणाले, या प्रकरणात नागपूर येथील एक १५ वर्षीय पीडित मुलीचा जबाब पोलीस नोंदवून घेत आहेत. त्या जबाबानंतर पोलिसांची कारवाई सुरू होईल. खरे तर या प्रकरणी पोलिसांनी स्वतः दखल घेउन आरोपींच्या विरोधात गुन्हे दाखल केले आहेत. कुणीही आतापर्यंत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यास पुढे आलेले नाही. स्वतः पोलिसांनी खबरदारी घेउन समाज माध्यमांवर प्रसारित झालेले आक्षेपार्ह छायाचित्रे, चित्रफिती हटवण्याचे काम सुरू केले. विशेष तपास पथकामार्फत अत्यंत काळजीपूर्वक या प्रकरणाचा तपास सुरू आहे. या प्रकरणात नागरिकांना, पीडित मुलींना किंवा त्यांच्या पालकांनी कुठल्याही प्रकारची भीती न बाळगता तक्रारीसाठी पुढे आले पाहिजे.

**सरकार मदत करण्यास तयार-** बावनकुळे म्हणाले, या



प्रकरणात सरकार पीडितांना संपूर्ण मदत करण्यास तयार आहे. त्यांची नावे समोर येणार नाहीत, याची काळजी सरकार घेणार आहे. पोलिसांना तपासात मदत करणे ही सर्वांचीच जबाबदारी आहे. तशा पद्धतीने नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य करावे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या प्रकरणाचा आढावा घेतला आहे. मी स्वतः आज ग्रामीण पोलीस अधीक्षक कार्यालयात येउन सविस्तर माहिती जाणून घेतली आहे. या प्रकरणात कुणीही सुटणार नाही, अशा पद्धतीची योजना आम्ही तयार केली आहे. जे आरोपी पळून गेले असतील, त्यांना कुठल्याही भागातून हुडकून काढू. कोणत्याही आरोपीला सोडणार नाही. हे प्रकरण सरकारने अत्यंत गांभीर्याने घेतले आहे. सर्वच बाजूंनी पोलिसांचा तपास सुरू आहे.



जनमाध्यम



# पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला मनपाचा आढावा

## -प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या पालकमंत्र्यांच्या सूचना

**अमरावती/प्रतिनिधीः-**
अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आज अमरावती महानगरपालिकेत महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. महसूल मंत्री तथा अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिका कॉन्फरन्स हॉलमध्ये आयोजित या बैठकीत विविध विकासकामे, प्रकल्पांची सद्यस्थिती आणि आगामी नियोजन यावर सखोल चर्चा करण्यात आली. शहरातील मूलभूत सुविधा, पायाभूत विकास, कर वसुली आणि सामाजिक योजनांच्या अंमलबजावणीवर विशेष भर देण्यात आला.

बैठकीच्या सुरुवातीला स्थानिक संस्था कर व वस्तू व सेवा कर यासंदर्भातील प्रलंबित बाबी, तसेच मालमत्ता कर वसुलीची स्थिती याचा सविस्तर आढावा घेण्यात आला. कर वसुली वाढविण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी दिल्या. मनपा व्यापारी संकुलांच्या भाडे निर्धारण प्रक्रियेत पारदर्शकता राखून महसूल वाढीसाठी ठोस निर्णय घेण्याचे निर्देशही यावेळी देण्यात आले. महानगरपालिकेची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी पालकमंत्र्यांनी काही महत्त्वाचे धोरणात्मक निर्णय घेतले. व्यापारी संकुल भाडे तसेच मनपाच्या व्यापारी संकुलांचे भाडे पुनर्रचित (निश्चित) करण्याचे निर्देश दिले, जेणेकरून महसूल वाढेल. कर वसुली तसेच स्थानिक संस्था कर, वस्तू व सेवा कर आणि मालमत्ता कराच्या वसुलीत पारदर्शकता आणि वेग आणण्याच्या सूचना केल्या.

शहरातील गृहनिर्माण प्रकल्पांवरही बैठकीत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. रमाई आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल प्रकल्पांची प्रगती तपासण्यात आली. लाभार्थ्यांना वेळेत घरे उपलब्ध करून देण्यासाठी कामे गतीमान करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच प्रलंबित प्रकरणे तत्काळ निकाली काढण्यावर भर देण्यात आला.

अमरावती व बडनेरा येथील भुयारी गटार प्रकल्प हा शहरासाठी अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प असून त्याच्या अंमलबजावणीत कोणतीही ढिलाई होऊ नये, याबाबत पालकमंत्र्यांनी स्पष्ट सूचना दिल्या. महाराष्ट्र नगरोत्थान योजना, अंगणवाडी बांधकामे आणि नाविन्यपूर्ण योजनांअंतर्गत सुरू असलेल्या विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शाळांमधील मूलभूत सुविधा सुधारण्यासाठी आवश्यक निधी व नियोजन करण्यावरही भर देण्यात आला. शिक्षण बजेट तसेच शिक्षण व्यवस्थेसाठी प्रत्येक वर्षी १५ कोटी याप्रमाणे तीन वर्ष ४५ कोटीची भरीव बजेटची तरतूद करण्यात येईल. नवीन मनपा इमारत तसेच महानगरपालिकेच्या प्रस्तावित नवीन इमारतीचे पीपीटी मॉडेल यावेळी सादर करण्यात आले.





धार्मिक व पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या अंबादेवी व एकविरादेवी तीर्थक्षेत्रांबाबत सकारात्मक चर्चा झाली. अमरावतीचा ऐतिहासिक वारसा आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांच्या विकासासाठी मोठे निर्णय घेण्यात आले. अंबादेवी व एकविरा देवी मंदिर परिसराच्या नूतनीकरणाचे पीपीटी मॉडेल पाहून तातडीने कामाचे निर्देश दिले. तलाव संवर्धन तसेच छत्री तलाव आणि वडाळी तलाव यांचे सौंदर्यीकरण करून पर्यटनाला चालना दिली जाईल.

शहरातील क्रीडा व सांस्कृतिक पायाभूत सुविधांच्या दृष्टीने नेहरू मैदान येथे आधुनिक टाऊन हॉल इमारत उभारण्याचा प्रस्ताव बैठकीत चर्चिला गेला. तसेच छत्री तलाव व वडाळी तलाव संवर्धन व सौंदर्यीकरण प्रकल्पांद्वारे शहराचे सौंदर्य वाढविण्यासोबतच पर्यावरण संतुलन राखण्यावर भर देण्यात आला.

शिवटेकडी येथे 'शिवसृष्टी' विकसित करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्पही चर्चेचा केंद्रबिंदू ठरला. अंबानाला गाळ काढण्याच्या कामांवर भर देण्यात आला. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर नालेसफाई वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

ऊर्जा बचत व पर्यावरणपूरक उपक्रमांचा भाग म्हणून सोलर प्रकल्प राबविणे, तसेच पीएम ई-बस सेवा प्रकल्प प्रभावीपणे सुरू करण्याबाबतही चर्चा झाली. शहरातील घनकचरा व्यवस्थापन सुधारण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे निर्देश देण्यात आले. IWMS (Integrated Work Management System) प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे कामकाजात पारदर्शकता व गती येईल, असे मत व्यक्त करण्यात आले.

याशिवाय अमरावती महानगरपालिका क्षेत्रात फिशरीज हब प्रकल्पबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. बैठकीच्या शेवटी ना. चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करत प्रकल्प वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करावेत, असे निर्देश दिले. नागरिकांना अधिकाधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्रमुख ध्येय असल्याचे त्यांनी नमूद केले.

या बैठकीस महापौर श्रीचंद तेजवाणी, आमदार संजय खोडके, आमदार सुलभा खोडके, आमदार रवि राणा, आमदार धीरज लिंगाडे, महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा, माजी पालकमंत्री प्रविण पोटे पाटील, उपमहापौर सचिन भेंडे, स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, सभागृह नेता चेतन गावंडे, गटनेता डॉ.राजेंद्र तायडे, गटनेता नाना आमले, शहर सुधार समिती सभापती राधा कुरील, उपसभापती सुमती ढोके, शिक्षण समिती सभापती ॲड.प्रीती रेवणे, महिला बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे, उपसभापती लता देशमुख, विधी समिती उपसभापती डॉ.मधुरा काहाळे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त नरेंद्र वानखडे, उपायुक्त योगेश पिठे, नगरसेवक, नगरसेविका, महानगरपालिका अधिकारी व विविध विभागांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉक्टरांच्या पर्समधून सोन्याचे दागिने गायब

## - अडीच लाखांचा ऐवज लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. एका वरिष्ठ डॉक्टरांच्या पर्समधून अज्ञात चोरट्यांनी सुमारे अडिच लाख रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार डॉ. अमित विजय कुबडे (वय ६१) यांचे 'पद्मकमल क्लिनिक' आहे. १० एप्रिल रोजी सकाळी सुमारे ७ वाजता ते क्लिनिकमधील काम आटोपून घरी परतत होते. यावेळी त्यांच्या जवळ असलेल्या पर्समध्ये मौल्यवान दागिने व रोकड ठेवलेली होती. पर्समध्ये १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र, अंदाजे २० सोन्याचे मणी (सुमारे १ ग्रॅम) आणि १,५०० रुपये रोख अशी एकूण सुमारे २.५ लाख रुपयांची मालमत्ता होती. मात्र ही चोरी लगेच लक्षात आली नाही. १२ एप्रिल रोजी सायंकाळी पर्स तपासल्यावर दागिने आणि रोकड गायब असल्याचे निदर्शनास आले. घटनेची माहिती मिळताच डॉ. कुबडे यांनी तात्काळ गाडगे नगर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली.

पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३७९ अंतर्गत गुन्हा नोंदवला असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, शहरात वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. मौल्यवान वस्तू जवळ बाळगताना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी नागरिकांना केले आहे.

# चाकूचा धाक दाखवणारा तरुण जेरबंद

## -गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-**
गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या डी.बी. पथकाने रात्रीच्या गस्तीदरम्यान तात्काळ कारवाई करत चाकूचा धाक दाखवून नागरिकांमध्ये दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणाला ताब्यात घेतले. आरोपीकडून धारदार 'चायना चाकू' जप्त करण्यात आला असून त्याच्यावर आर्म ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

१६ एप्रिल २०२६ रोजी रात्री गाडगेनगर पोलीस स्टेशन हद्दीत डी.बी. पथक नाईट पेट्रोलिंग करत असताना गुप्त माहिती मिळाली. त्यानुसार पी.डी.एम.सी. हॉस्पिटलच्या मुख्य प्रवेशद्वारासमोर एक तरुण हातात चाकू घेऊन लोकांना धमकावत असल्याचे समजले. पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपी हर्षित प्रकाश नंदेश्वर (वय २४, रा. गाडगेनगर) याला ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून १३ इंच लांबीचा स्टीलच्या पात्याचा धारदार चायना चाकू जप्त करण्यात आला. आरोपीचे कृत्य गंभीर स्वरूपाचे असल्याने त्याच्यावर आर्म ॲक्ट कलम ४, २५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गजानन अन्सापुरे करत आहेत.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गाडगेनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव यांच्या नेतृत्वात डी.बी. पथकाने ही कारवाई पार पाडली. या पथकात पोउपनि सागर ठाकरे, भारत वानखडे, राजेश गुरेले, मतिन शेख, सुशांत प्रधान, धनराज कुमरे, अविनाश आत्राम आणि सैनिक हिरासिंग साखरपवार यांचा समावेश होता. पोलिसांच्या या तत्पर कारवाईमुळे परिसरात दहशत पसरवणाऱ्या घटनेवर आळा बसला असून नागरिकांनी सुटकेचा निश्वास टाकला आहे.

# शोरूम मालकाच्या घरातून ७ लाख गायब

**अमरावती/प्रतिनिधीः-**
शहरातील केशव कॉलनी परिसरात एका व्यावसायिकाच्या घरातून लाखोंची रोकड गायब झाल्याची घटना समोर आल्याने खळबळ उडाली आहे. घरातील लॉकरमधून तब्बल ७ लाख रुपये कमी झाल्याचे उघड होताच गाडगे नगर पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून, दोन संशयितांविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.



तक्रारदार श्रवण पवन गट्टानी (वय ३२) हे 'जीपीएस होंडा' या नावाने दुचाकी विक्रीचे शोरूम चालवतात. शोरूममधील रोख रक्कम सुरक्षिततेच्या कारणास्तव ते नियमितपणे घरी आणून ठेवत असत. ७ एप्रिल रोजी त्यांनी ९.५० लाख रुपये तर १४ एप्रिल रोजी आणखी १५ लाख रुपये घरातील लॉकरमध्ये ठेवले होते. दरम्यान, काही दिवसांसाठी बाहेरगावी गेलेल्या गट्टानी यांनी परतल्यानंतर लॉकरमधील रक्कम तपासली असता एकूण २४.५० लाखांपैकी ७ लाख रुपये गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. घरभर शोध घेतल्यानंतरही रक्कम न सापडल्याने त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. प्राथमिक चौकशीत, ज्या खोलीत लॉकर ठेवले आहे त्या ठिकाणी साफसफाईसाठी येणाऱ्या घरगुती कामगारांवर संशय व्यक्त करण्यात आला आहे. त्यानुसार गाडगे नगर पोलिसांनी प्रवीण पवार आणि एका महिलेविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे. विश्वासाचा गैरफायदा घेत ही चोरी झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास पथक सक्रिय झाले आहे. लवकरच या प्रकरणाचा उलगडा होईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# बालसुधारगृहातून पळालेले दोन विधीसंघर्षित बालक पुन्हा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील रुक्मिणीनगर येथील बालसुधारगृहातून पळून गेलेल्या दोन विधीसंघर्षित बालकांना अखेर गुन्हे शाखेच्या पथकाने ताब्यात घेतले आहे. १८ एप्रिल रोजी गुप्त माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली असून, चिचफैल परिसरातून दोघांना शोधून पुन्हा ताब्यात घेण्यात आले.पोलीस ठाणे फ्रेजरपुरा येथे नोंद असलेल्या दोन वेगवेगळ्या गुन्ह्यांतील ही दोन्ही बालके वयाने १७ वर्षांची असून, घरफोडी व शरीराविरुद्धच्या गंभीर गुन्ह्यांमध्ये त्यांचा सहभाग असल्याने त्यांना बालन्यायालयाच्या आदेशाने बालसुधारगृहात दाखल करण्यात आले होते. मात्र, त्यापैकी एक बालक १२ एप्रिल रोजी तर दुसरे १३ एप्रिल रोजी सुधारगृहातून पळून गेले होते. या घटनेनंतर सुधारगृह प्रशासनाने दिलेल्या फिर्यादीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांनी विशेष पथक नियुक्त करून शोधमोहीम सुरू केली. अखेर गुप्त माहितीच्या आधारे दोन्ही बालकांचा ठावठिकाणा लागला आणि त्यांना ताब्यात घेण्यात यश आले. या दोन्ही बालकांविरुद्ध शहरातील राजापेठ, फ्रेजरपुरा, खोलापुरी गेट, सिटी कोतवाली व नांदगाव पेठ पोलीस ठाण्यांमध्ये शरीराविरुद्ध तसेच मालमत्तेविरुद्धचे गंभीर गुन्हे नोंद असल्याची माहिती समोर आली आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, तसेच गुन्हे शाखेचे वरिष्ठ अधिकारी रमेश धुमाळ यांच्या नेतृत्वात पार पडली. पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने ही यशस्वी कारवाई केली.

# १ व १० वरिल उर्वरित

## महाराष्ट्रात ऊष्णतेचा इशारा

आणि उष्ण लाटेच्या पार्श्वभूमीवर नागपूर जिल्हा प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आज नागपुरात शाळा-कॉलेजला सुटी असणार आहे. विद्यार्थ्यांना उष्णतेचा त्रास होउ नये यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

विदर्भात सर्वात जास्त तापमान आहे. अमरावतीत तर ४४.४ अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली आहे. विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये तापमान ४४ अंश सेल्सियसपेक्षाही जास्त आहे. अकोला हा तर जगातील सर्वाधिक तापमान असलेल्या जिल्ह्यांमध्ये दुस-या क्रमांकावर होता. दरम्यान, काल अकोल्याच्या तापमानात किंचित घट झाली होती. मात्र, अमरावती, चंद्रपूर, वर्धा, नागपूर, वाशिम आणि गडचिरोलीच्या तापमानात वाढ झाली आहे.

## मंत्रालयात मंत्र्यांसोबत आता

कार्यकर्त्यांना बाहेरच थांबावं लागेल. जर एखाद्या विशेष व्यक्तीला बैठकीला उपस्थित राहायचं असेल, तर मुख्यमंत्र्यांची पूर्वपरवानगी घ्यावी लागेल. त्याचे कागदपत्र सुरक्षा अधिका-यांना दाखवल्याशिवाय आत पाउल ठेवता येणार नाही.

जर बैठक 'सह्याद्री' अतिथीगृहावर असेल, तर फक्त आमदार आणि खासदारांनाच वेटिंग रूममध्ये बसता येईल. त्यांच्या स्वीय सहायकांना परिसरात फिरण्यासही मनाई करण्यात आली आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या आधी आणि नंतर २ तास सातव्या मजल्यावर किंवा मंत्रिमंडळ सभागृहात कोणतीही इतर बैठक घेता येणार नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि सर्व बड्या सचिवांच्या उपस्थितीत होणा-या या बैठकीत गांभीर्य राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्र्यांच्या अवतीभोवती घोटाळणा-या कार्यकर्त्यांच्या गराड्यामुळे अनेकदा महत्त्वाच्या फायलींची ने-आण करताना अडथळे येतात. आता या नव्या निर्णयामुळे मंत्रालयात 'फिल्डिंग' लावणा-या कार्यकर्त्यांना मोठा धक्का मानला जात आहे.

## भीषण अपघातात दोघे

खड्ड्यात कोसळली. याठिकाणी पूर्वी खाणकाम झाल्यानं मोठा खड्डा तयार झाला असल्याचं समोर आलं आहे. मात्र, त्या ठिकाणी कोणतीही सूचना फलक, सुरक्षा कुंपण किंवा प्रकाशयोजना नव्हती. परिणामी, रात्रीच्या अंधारात तो खड्डा चालकाच्या लक्षात न आल्यानं अपघात झाला असावा, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

**रात्रभर तिथेच पडून राहिले-** अपघातानंतर सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, जखमी अवस्थेत दोघांनाही वेळेवर मदत मिळाली नाही. परिसर निर्जन असल्यामुळे ते रात्रभर तिथेच पडून राहिले. सकाळी काही कामगारांना रक्तबंबाळ अवस्थेत त्यांचे पार्थिव आढळून आले. तत्काळ त्यांना एम्स रुग्णालयात नेण्यात आले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केलं. या घटनेमुळे केवळ कुटुंबीयांवरच नव्हे, तर संपूर्ण विद्यापीठ परिसरावर शोककळा पसरली आहे. सक्षमचे वडील वर्धा येथे सहदिवाणी न्यायाधीश आहेत, तर आर्यनचे वडील यवतमाळ येथे वकिली व्यवसाय करतात. दोघेही कुटुंबातील होतकरू आणि आशादायी विद्यार्थी होते. दरम्यान, या दुर्घटनेनंतर संबंधित खाण क्षेत्रातील सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. स्थानिक प्रशासनाने अशा धोकादायक ठिकाणी आवश्यक ती उपाययोजना का केली नाही, याबाबत नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून, विद्यार्थ्यांनी वसतिगृहातून बाहेर पडण्याची नेमकी कारणे आणि अपघाताच्या परिस्थितीचा शोध घेतला जात आहे.

## परतवाडा प्रकरणाची सखोल चौकशी

तपासून यातील आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करीत आहे. आरोपींना शिक्षा होईल यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे.

परतवाडा येथील प्रकरणी माध्यमांमध्ये विविध वृत्त येत आहेत. त्यामुळे याप्रकरणी पीडित बयाण देण्यासाठी पुढे येण्यास समस्या निर्माण होऊ शकत असल्यामुळे माध्यमांनीही सजगपणे वार्तांकन करावे. तसेच धर्मामध्ये तेढ निर्माण होऊन सामाजिक सलोखा बिघडू नये, तसेच तपास भरकटू नये यासाठी प्रयत्न करावे. माध्यम प्रतिनिधींकडे याप्रकरणी काही पुरावे असल्यास ते पोलिसांना द्यावे, याप्रकरणी पोलिसांकडून देण्यात येणारी माहिती अधिकृत समजावी, असे बावनकुळे यांनी सांगितले.

## एनडीपीएस प्रकरणातील १२

त्यांच्याविरूध्द पकड वॉरंट काढण्यात आला होता. या आरोपींना गुन्हे शाखेने शनिवारी (दि.१८) पहाटे ४ वाजता ताब्यात घेतले. आरोपी महेश साहू, शेख शहजाद व अकरम शहा यांना आंध्र प्रदेश पोलिसांनी संबंधित न्यायालयात खात्री करून समज देऊन सोडले व आरोपी अफसर खान मुक्तार खान ,शेख राजू शेख शेखजी यांना आंध्र प्रदेश पोलिसांच्या स्वाधीन केले.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त गणेश शिंदे, रमेश धुमाळ ,श्याम घुगे, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या मार्गदर्शनात गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहाय्यक निरीक्षक मनीष वाकोडे, सतीश देशमुख ,फिरोज खान, मंगेश लोखंडे, प्रशांत मोहोड, नाझीमोद्दीन सय्यद, रणजीत गावंडे यांनी केली.

## मुलींच्या सन्मानासाठी बजरंग

कार्तिक नाचनकर, दुर्गेश सोलंकी, सतीश कुरील, अश्विन चौधरी, पंकज गायकवाड ,सुरज कोठार ,जितू भुजबळ, विनय साहू, तनु बांडाबुंचे, शरद अग्रवाल, रमेश गुप्ता, पवन श्रीवास ,प्रदीप सोळंकी, विकास मारोडकर, ओम पांडे ,नंदू काळे, राज गणेशकर, सुभाष पटवी, विजय उपाध्याय, देवांशू नवलानी, सागर व्यास, तुषार वानखडे, भूषण दलाल, अजिंक्य काळे, करण सोळंकी, आकाश राठोड, पवन सोळंकी, राजेश तूरडकर, सौरभ जाधव, प्रेम निंभोरकर, शरद गाढवे, आदींचा सहभाग होता.

## दक्षिण आशियातील सर्वात

आहे. दरवर्षी १८० व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देईल. एमएडीसी आणि एअर इंडियाच्या संयुक्त उपक्रमामुळे विमान वाहतूक क्षेत्रात ३००० हून अधिक रोजगार निर्माण होणार तर कौशल्य विकास, तांत्रिकी सेवा, पुरवठा साखळी व लहान व्यवसायिकांनाही चालना मिळेल. १८० व्यावसायिक वैमानिकांना प्रशिक्षण देण्यासाठी हे केंद्र उभारण्यात येत आहे. यामुळे वाहतूक क्षेत्राला अधिक आत्मनिर्भर बनविण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल हे मानले जात आहे. हे केवळ तरुणांना वैमानिक बनविण्याचे त्यांचे स्वप्न साकार करण्याची संधी देणार नाही, तर एअर इंडियाचे जागतिक दर्जाची विमान कंपनी बनविण्याचे ध्येय देखील अधिक मजबूत करेल.

## आशा सेविकांचे थकीत मानधन

त्यांच्या कार्यक्षमतेवरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

खासदार बळवंत वानखडे यांनी आपल्या निवेदनात केंद्र सरकारला थकीत मानधन तात्काळ वितरित करण्याची मागणी केली आहे. तसेच, भविष्यात मानधन वेळेवर व नियमित मिळावे यासाठी ठोस यंत्रणा उभारावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. याशिवाय राज्य सरकारशी समन्वय साधून या प्रश्नाचे कायमस्वरूपी निराकरण करावे,असेही ते म्हणाले.

दरम्यान, आशा सेविका व गटप्रवर्तिका यांनीही शासनाकडे लवकरात लवकर न्याय मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त केली असून, या प्रश्नाकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज अधोरेखित होत आहे.

## सोलर बसवण्याच्या नावावर

होते. यासाठी त्यांनी अभिजीत धर्माळे यांच्याशी संपर्क केला.धर्माळे यांनी सोलर सिस्टम बसवण्यासाठी त्यांच्या कडून पैसे घेतले. त्यांच्या घरी जाऊन जागेची पाहणी केली आणि पैसे घेऊन कामाला सुरुवात करण्यात येईल असे सांगितले. तरीपण काम सुरू झाले नाही. मिरगे त्यांना कामासाठी रोज फोन लावत होते, पण ते उचलत नव्हते. एक दोनदा त्यांनी फोन उचलले आणि त्यांना उडवा उडवीचे उत्तर दिले. या नंतर मिरगे यांना माहिती मिळाली की, आरोपी धर्माळे यांनी अशाप्रकारे काही लोकांकडून पैसे घेतले आहे. मिरगे आणि इतराना धर्माळे यांनी ८ लाख ७० हजार १७० रुपयाचा चुना लावला. या प्रकरणात पोलिसांनी चंद्रशेखर मिरगे यांच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

## समतापर्व म्हणजे फुले-शाहू-

करण्याची आज खऱ्या अर्थाने गरज आहे. समतापर्व म्हणजे फुले -शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा जागर असून त्यांच्या जाणिवेसोबतच स्वयंप्रत अंगीकृत करून अनुसरण करण्याचे आवाहन अमरावतीच्या आमदार सुलभा संजय खोडके यांनी केले.

समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावतीच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्य ११ ते १७ एप्रिल पर्यंत समतापर्वचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला आ. सुलभा खोडके यांनी उपस्थित राहून वैचारिक पुष्प गुंफतांना फुले -शाहू- आंबेडकर यांच्या विचारातून पुरोगामी महाराष्ट्राची जडण-घडण झाली असल्याचे सांगितले. महात्मा फुले यांनी विषमतेवर कडा प्रहार करून जो समतावादी विचार मांडला त्यांचे प्रतिबिंब व महत्व आज भारतीय संविधानात अधोरेखित झाले आहे. समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय या मानवतावादी मूल्यांची मशाल तेजाने पेटवण्यासाठी समतापर्व च्या माध्यमातून वैचारिक भीम जयंती साजरी होणे आजची गरज असल्याचे सुद्धा आ.खोडके यांनी सांगितले. यावेळी प्रभागाचे नगरसेवक प्रमोद महल्ले व नगरसेविका मीनल योगेश सवाई देखील उपस्थित होते. या पाचदिवसीय समता पर्व कार्यक्रमात वेशभूषा स्पर्धा, वत्कृत्व स्पर्धा , सांस्कृतिक कार्यक्रम सामाजिक प्रबोधन, परिवर्तन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. तसेच संदीपपाल महाराज यांचा बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रमातुन नागरिकांमध्ये उत्साहाची लाट उसळली होती. संदीपपाल महाराज यांनी आपल्या वाणीतून अंधश्रद्धा, भोंदूपणा,जाती प्रथा अशा विषयांवर घणाघात करून सामाजिक समरसतेचा संदेश दिला.

पाच दिवस चाललेल्या समतापर्व उत्सवाचा बक्षीस वितरण व सत्कार समारंभाने समारोप करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात राजेंद्र खोरगडे, देवेंद्र पवार ,गौतम वानखडे , रवी वानखडे ,नरेंद्र गुलदेवकर, सुधीर गाडे, नरेंद्र वानखडे राहुल खंडारे, दिनेश वानखडे, गजानन मनोहरे, तसेच वनिता धवणे ,वैशाली खंडारे,रंजना हरले,अर्चना मनोहरे, गुंफा उके ,सोनू वंजारी, रीना वानखडे, आदींसह समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावती येथील महिला -पुरुष व युवक बांधवानी अथक परिश्रम घेतले.

## तलवार घेऊन दहशत निर्माण

पोलिसांनी तेथे कार्यवाही करून आरोपी अमन रमजान रायलीवाले याला ताब्यात घेतले. त्याच्या कडून तलवार जप्त करण्यात आली. ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ अन्वये त्याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, सहाय्यक आयुक्त शिवाजीराव बचाटे यांच्या निर्देशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईमच्या विजया पंधरे ,समाधान वाठोरे यांच्या मार्गदर्शनात डीबी पथक प्रमुख उपनिरीक्षक सागर ठाकरे, भारत वानखडे, मतीन शेख ,सुशांत प्रधान, धनराज कुमरे, रुपेश हटकर, आशिष पडोळे यांनी केली.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ रविवार, १९ एप्रिल २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

# गायगाव पेट्रोल-डिझेलच्या 'कुबेर' ची सुरक्षा धोक्यात ?

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला जिल्ह्यातील गायगाव येथील पेट्रोल-डिझेल डेपोची सुरक्षा अक्षरशः धोक्यात आली असून, मागील बाजूच्या भिंतीवरून टोळ्या सर्रास अवैध प्रवेश करत हजारो लिटर इंधनाची चोरी करत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, या गंभीर प्रकाराकडे संबंधित विभागाचे पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

- **मागील भिंतीतून टोळ्यांचा अवैध प्रवेश**
- **हजारो लिटर इंधन लंपास**
- **अनेक घटना सीसीटीव्हीत कैद**



गायगाव येथे एचपीसीएल, इंडियन ऑईल आणि बीपीसीएल या प्रमुख तेल कंपन्यांचे मोठे डेपो असून, येथे दररोज रेल्वेमार्गे लाखो लिटर पेट्रोल-डिझेलचा साठा आणला जातो. त्यानंतर हा साठा टँकरद्वारे विविध पेट्रोल पंपांवर पाठविला जातो. एवढ्या प्रचंड साठ्यामुळे या भागाला 'पेट्रोल-डिझेलचा कुबेर' म्हणून ओळख मिळाली आहे. मात्र, याच ठिकाणी सुरक्षेची पार वाट लागल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे.

मागील काही महिन्यांपासून एका तडीपार गुन्हेगाराने पुन्हा या भागात सक्रिय होत स्वतःचे जाळे निर्माण केले आहे. 'एमपीडी'सारख्या गंभीर गुन्ह्यातून सुटून आलेल्या या इसमाने स्थानिक आंबटशौकीनांना हाताशी घेत अवैध इंधन चोरीचे मोठे रॅकेट उभे केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या टोळीला यंत्रणेतीलच काही 'आतील हात' मिळाल्याची माहिती समोर येत असून, त्यांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात इंधनाची अफरातफर होत असल्याची चर्चा रंगली आहे. या टोळीचे धाडस इतके वाढले आहे की, डेपोच्या मागील १० फूट उंच भिंतीवरून थेट प्रवेश करून इंधन चोरी करण्याचे प्रकार दिवसाढवळ्या घडत आहेत. दररोज हजारो लिटर पेट्रोल-डिझेल गायब होत असताना संबंधित यंत्रणा मात्र 'डोळेझाक' करत असल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. यामुळे शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडत असून, मोठ्या अपघाताचा धोका देखील निर्माण झाला आहे. याप्रकरणी कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने उरळ पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. 'हात ओले' असल्याची चर्चा गावात जोर धरत असून, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

### बाळापूरकडे 'काळा साठा'!

गायगाव डेपोमधून चोरी केलेले पेट्रोल-डिझेल बाळापूर परिसरात साठविले जात असल्याची माहिती पुढे आली आहे. या रॅकेटमध्ये अनेक टोळ्या कार्यरत असून, सध्या एका तडीपार आरोपीची गँग सर्वाधिक सक्रिय असल्याचे सांगितले जाते. या गँगमध्ये खून, प्राणघातक हल्ल्यासारख्या गंभीर गुन्ह्यांतील आरोपींचा समावेश असल्याने स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. त्यामुळे कुणीही पुढे येऊन तक्रार करण्यास तयार नसल्याचे चित्र आहे.

### 'नशेतून' लागली आग?


काही दिवसांपूर्वी डेपोच्या परिसरातील शेतशिवारात लागलेल्या आगीमागेही याच टोळीचा निष्काळजीपणा कारणीभूत असल्याची चर्चा गावकऱ्यांत रंगली होती. नशेच्या अवस्थेत पेट्रोल-डिझेल हाताळताना ही आग लागल्याचा संशय व्यक्त केला जात असून, सुदैवाने मोठा अनर्थ टळला.


### प्रशासन जागे होणार कधी?

गायगावसारख्या संवेदनशील डेपोमध्ये उघडपणे सुरू असलेला हा इंधन चोरीचा प्रकार केवळ आर्थिकच नव्हे तर सुरक्षेच्या दृष्टीनेही अत्यंत धोकादायक आहे. तरीही संबंधित विभाग, तेल कंपन्या आणि पोलिस प्रशासन निष्क्रिय असल्याचे चित्र चिंताजनक आहे. या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

# सागर कोकास यांच्या प्रयत्नाने 'त्या' १०९ वृक्षांना जीवदान

## मा.न्यायालयाचा 'जैसे थे' चा आदेश





■ प्रतिनिधी | वाशिम ■

येथील अकोला नाका परिसर ते हिंगोली मार्गावर रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या १०९ सार्वजनिक वृक्षांची तोड करू नये यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते, वृक्षप्रेमी सागर कोकास यांनी वाशीम येथील विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांच्या न्यायालयात प्रकरण दाखल केले आहे. १६ एप्रिल २०२६ रोजी या सार्वजनिक १०९ वृक्षांपैकी काही वृक्षांची तोड सुरू असल्याची बाब अर्जदार सागर कोकास यांचे निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ 'त्या' १०९ वृक्षांना जीवदान मिळण्यासाठी मा.न्यायालयामध्ये अर्ज व प्रतिज्ञा पत्र दाखल केले. या अर्जावर मा.न्यायालयाने अर्जदारांच्या वकीलाचा युक्तीवाद ऐकून येथील प्र.सह दिवाणी न्यायाधीश एस.एस.सहस्त्रबुद्धे यांनी या प्रकरणातील प्रतिवादींनी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवावी तसेच कोणतेही झाड तोडू नये असा आदेश १६ एप्रिल रोजी पारीत केला आहे.

येथील विद्यमान दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) यांचे न्यायालयात सामाजिक कार्यकर्ते, वृक्षप्रेमी सागर कोकास यांनी वाशीम पालिकेच्या हद्दीतील अकोला नाका परिसर ते हिंगोली रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या सार्वजनिक १०९ झाडांची तोडणी करू नये याबाबत प्रकरण दाखल केले आहे. सद्या हे प्रकरण न्यायप्रवीष्ठ असताना प्रतिवादीकडून १६ एप्रिल २०२६ रोजी वाशीम शहरातील अकोला नाका, पोस्ट ऑफीस व ईतर परिसरातील मोठ्या वृक्षांची तोडणी सुरु असल्याचे अर्जदार सागर कोकास यांचे निदर्शनास आले. सागर कोकास यांनी तत्काळ मा.न्यायालयामध्ये याबाबतीत अर्ज व प्रतिज्ञा पत्र सादर करून मा.न्यायालयाच्या प्रतिवादीचे कृत्य निदर्शनास आणून दिले. तसेच या दाव्यात मूळ दावा निकाली लागेपर्यंत वाद मिळकतीवरील असलेल्या १०९ वृक्षांची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबतचा आदेश पारीत करण्यात यावा अशी मा.न्यायालयाला विनंती केली.

तसेच प्रतिवादी यांचे विरूद्ध वाद मिळकतीवरील वृक्षांची 'जैसे थे' परिस्थिती न ठेवल्यास प्रतिवादी वृक्षांची कटाई करण्याच्या वाईट हेतूमध्ये सफल होतील. आणि अवैध वृक्ष तोड करून त्याचे लाकूड काळ्या बाजारात ज्यादा दराने विकण्याच्या वाईट हेतूमध्ये सफल होतील. ही बाब अर्जदाराने मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून देवून त्या सर्व वृक्षांची 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याबाबतचा आदेश पारीत केल्यास प्रतिवादी पक्षाचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता या प्रकरणात न्यायोचित आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती ही कोकास यांनी त्यांचे अर्जात केली.

या प्रकरणात मा.न्यायालयाने वादीच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादीने अर्जात प्रतिवादी १०९ वृक्ष तोडण्याच्या तयारीत असल्याचे कथन केले आहे. काही वृक्षांची तोड केल्याचे देखील वादीने अर्जात नमूद केले आहे. वादीने अर्जासोबतच प्रतिज्ञा लेख दाखल केला आहे. या प्रकरणात सर्व प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे सादर केलेले नाही. त्यामुळे अंतरीम मनाई हुकुमाच्या अर्जाचा निकाल लागण्यास कालावधी लागणार आहे. त्यामुळे वादीच्या म्हणण्याप्रमाणे 'जैसे थे' परिस्थिती ठेवण्याचा आदेश पारीत करणे योग्य ठरेल असा निष्कर्षही मा.न्यायालयाने या प्रकरणात काढला आहे. त्यामुळे या प्रकरणातील प्रतिवादींनी तात्पुरत्या मनाई हुकुमाच्या अर्जावर सुनावणी होवून पुढील आदेश होईपर्यंत 'जैसे थे' परिस्थिती ठेवावी, तसेच कोणतेही झाड तोडू नये असा आदेश येथील प्र.सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) एस.एस.सहस्त्रबुद्धे यांनी १६ एप्रिल रोजी पारीत केला आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार

■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम येथील विद्याभारती शाळेत आयोजित ITO (Indian Talent Olympiad) परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन करत शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. विशेष म्हणजे राज्यस्तरावरही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत शाळेची गुणवत्ता अधोरेखित केली आहे. या परीक्षेत इयत्ता २ री मधील ऋतुजा राम शेळके हिने राज्यस्तरावर ७ वा क्रमांक मिळवून शाळेचा नावलौकिक राज्यस्तरापर्यंत नेऊन पोहोचवला आहे. तर इयत्ता ९ वी मधील श्रावस्ती नारायण इंगोले हिने राज्यस्तरावर २० वा क्रमांक पटकावला.

# आपादग्रस्त कुटुंबांना रेडक्रॉसकडून जीवनावश्यक साहित्य किटचे वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

आपादग्रस्त कुटुंबांना मानवीय दृष्टिकोनातून मदत करण्याची परंपरा जपत इंडियन रेडक्रॉस सोसायटीच्या वतीने जीवनावश्यक साहित्य किटचे वितरण करण्यात आले. या उपक्रमातून अनेक गरजू कुटुंबांना दिलासा मिळाला.

इंडियन सोशल अँड रिसर्च फाउंडेशनचे सचिव संदीप पुंडकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य चंद्रशेखर खेडकर तसेच अॅड. सुभाषसिंह ठाकुर यांच्या हस्ते कुटुंबांना किटचे वाटप करण्यात आले.



तत्कालीन जिल्हाधिकारी निमा अरोरा यांच्या सूचनेनुसार जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कोविड काळात आपादग्रस्त कुटुंबांची सेवा करण्याची संधी मिळाल्याचे मत रेडक्रॉसच्या कार्यकारी सदस्या अरुधंतीताई शिरसाट यांनी व्यक्त केले. यापूर्वीही अनेक कुटुंबांना मदत करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. दरम्यान, शासकीय नियमानुसार उर्वरित लाभार्थ्यांना महाराष्ट्र शाखेकडून प्राप्त साहित्याचे वितरण करण्यात येत असून हा उपक्रम समाधानकारक असल्याचे कार्यकारी सदस्य प्रशांत राठी यांनी सांगितले.

रेडक्रॉसतर्फे अलीकडेच धर्मार्थ होमिओपॅथी दवाखाना सुरू करण्यात आला असून विविध सामाजिक उपक्रमांद्वारे सुरू असलेले सेवा कार्य प्रशंसनीय असल्याचे राजू बुडकले यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे चेअरमन डॉ. किशोर मालोकार यांच्या नेतृत्वाखाली मानद सचिव प्रभजीत सिंह बछेर, कपिल रावदेव, अनमोलसिंह बछेर, केदार काजळे, मंगला डोंगरे आदींनी परिश्रम घेतले.

# खिर्डा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी

■ प्रतिनिधी | मालेगाव ■



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त खिर्डा येथे विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून उत्साहपूर्ण वातावरणात जयंती साजरी करण्यात आली. सकाळी ९ वाजता गावातील सैनिक बॉबी वैद्य यांच्या हस्ते धम्मध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून उपस्थितांनी त्रिशरण व पंचशील ग्रहण केले.

यावेळी प्रा. गोविंदराव वैद्य यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनकार्य व भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारांवर मार्गदर्शन केले. तसेच बालाराम खिल्लारे व पवन सदार यांनीही आपले विचार व्यक्त केले. लहान चिमुकल्यांनीही बाबासाहेबांच्या जीवनावर भाषणे सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

१ एप्रिल ते १३ एप्रिल दरम्यान विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांतील विजेत्यांना ट्रस्टचे अध्यक्ष अशोक वैद्य यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. तसेच बॉबी वैद्य, संदीप वैद्य व भारत वैद्य यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

सखाराम कांबळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे चिरंजीव सचिन भास्कर कांबळे यांनी बुद्ध विहाराला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मूर्ती धम्मदान स्वरूपात अर्पण केली. याबद्दल त्यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. दुपारी साडेतीन वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासह भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले. लेझीम पथकाच्या तालावर व बँडच्या गजरात गावातील प्रमुख मार्गाने शांततेत मिरवणूक पार पडली. रात्री कलापथकाचा कार्यक्रम आयोजित करून जयंती उत्सवाचा समारोप करण्यात आला. कार्यक्रमाचे संचालन सत्यदीप वैद्य यांनी केले. या जयंती उत्सवाच्या यशस्वीतेसाठी पवन खिल्लारे, चंद्रशेखर घुगे, आनंद इंगळे, निखिल वैद्य, स्वप्निल इंगळे, अनिकेत इंगळे, आकाश खिल्लारे, सुमेध वैद्य, अनिल वैद्य, चेतन वैद्य, संदेश सरकटे, राहुल गवई, रितेश सरकटे, प्रवीण गवई, मिलिंद गवई, शरद गवई, कैलास डोंगरदिवे, प्रशांत गवई, अरुण गवई, उमेश कांबळे, अशोक कांबळे, धम्मपाल गवई, साहेबराव इंगळे, राजू गवई, अनंत इंगळे, प्रदीप गवई, अभिषेक वैद्य, संतोष इंगळे, नितेश वैद्य, नंदू खिल्लारे, लक्ष्मण खिल्लारे, उमेश सरकटे, अमोल खिल्लारे, सुभाष वैद्य, विलास वैद्य, सुखदेव खिल्लारे, प्रफुल्ल गवई, मनोज वैद्य, सुनील वानखेडे, शुभम गायकवाड, विजय वैद्य, कांचन वैद्य, बेबी वैद्य, करुणा इंगळे आदींनी अथक परिश्रम घेतले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त मनसे महिला असंघटीत कामगार व कर्मचारी सेनेच्या महिलांची बाईक रॅली

■ प्रतिनिधी | वाशिम ■

महामानव विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त महाराष्ट्र नवनिर्माण महिला असंघटीत कामगार व कर्मचारी सेनेच्या महिलांची बाईक रॅली काढून महामानवास अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र नवनिर्माण महिला असंघटीत कामगार/कर्मचारी सेनेच्या राज्य अध्यक्षा संगीता चव्हाण यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेल्या या रॅलीची सुरुवात सकाळी १० वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करुन पाटणी चौक मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे बुध्द वंदना घेतल्यानंतर अभिवादन व मानवंदना देवून रॅलीचा समारोप केला. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानिक हक्कांची आणि महिला सक्षमीकरणाची जाणीव करुन देणे हा या रॅलीचा मुख्य उद्देश होता. असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी एकत्र येऊन सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात आपले



स्थान निर्माण करावे हा संदेश या रॅलीच्या माध्यमातून देण्यात आला.

सदर रॅलीमध्ये संगिता चव्हाण, संगिता ढोले, शिला घुगे, वनिता अतुल पांडे, सोनू भालेराव, प्रमीला शरद पखाले, माधव कोंडजी गायकवाड, मनोरमा माधव गायकवाड, भिमराव पंढरी गायकवाड, संगीता भिमराव गायकवाड, तृप्ती सज्जनराव गवई, कल्याणी अनिल कांबळे, मिलींद सिताराम इंगळे, रितेश सतीष ठाकरे, ज्योती राहूल कांबळे, धम्मपाल इंगळे, समाधान इंगळे, शालीनी रामदास वैद्य, पोर्णिमा नरवाडे, पुरुषोत्तम कांबळे, सविता राऊत, रमा जमधाडे, सत्यशीला शरद पखाले, लिलाबाई सदाशिव कवडे, माया कुंडलीक मोरे, निताश कांबळे, सिता दुतोंडे, संमिक्षा गवई, शुभांगी दुतोंडे, रोहीनी कांबळे, संघपाल कांबळे, दुर्गा वानखेडे, वर्षा अंभोरे, प्रियंका धनंजय कांबळे, गिता धनंजय कांबळे, सविता राऊत, स्नेहा कांबळे, किरण तायडे, कविता तायडे, संगीता खडसे, जयश्री, रुपाली राठोड, रोशनी कांबळे, आम्रपाली अंभोरे, प्रिती पडघाण, हर्षल पडघाण, किशोर पट्टेबहादुर, मोहीनी पट्टेबहादुर, समय्य इंगळे, उज्वल इंगळे, अक्षय कांबळे, मिलींद सोपान गायकवाड, सोनू बबन गायकवाड, विशाल पवार, निलेश मोरे, रमाबाई सुखदेव पखाले यांच्यासह वाशिम शहर व तालुक्यातील महिलांनी या रॅलीत सहभाग घेतला होता.

# विविध मागण्यांसाठी निवेदन सादर

**वाशीम :** राज्यातील समस्त शिक्षकांच्या संतप्त भावना प्रशासनाच्या असंसंविदनशील ते मुळे आणि कर्तव्य कृतीमुळे तीव्र होत चाललीअसून त्याची झळ शिक्षकांना व शिक्षन विभागात काम करणाऱ्या सर्वांनाच सोसावी लागत आहे.

त्यामध्ये शिक्षकांच्या अनेक भावना या निवेदनाद्वारे शासनाकडे पोचविण्याचे दृष्टीने महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने विधानपरिषद सदस्य ज मो अभ्यंकर यांचे नेतृत्वामध्ये संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शिक्षण विभागाने निवेदनाद्वारे महाराष्ट्र राज्यभर आंदोलन करून शिक्षण विभागाला पोहोचविण्यात आल्या.

# राष्ट्रपिता महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आजाद समाज पार्टी कांशीराम, वाशिम जिल्ह्याच्या वतीने राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमास कार्यकर्ते व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमास पक्षाचे राज्य उपाध्यक्ष सिद्धार्थ देवरे, विदर्भ अध्यक्ष उमेश हिवराळे, जिल्हा प्रभारी श्रीराम चवरे, जिल्हाध्यक्ष सुभाष अंभोरे, जिल्हा उपाध्यक्ष तथा डोनर संजय पडघन, तालुका अध्यक्ष किशोर खडसे, कार्यालयीन सचिव प्रवीण खिल्लारे, जिल्हा सचिव केशवराव उचित, मीडिया प्रभारी गोवर्धन राऊत, मार्गदर्शक गोविंद राऊत, अब्दुल अन्सारी, सागर पट्टेबहादूर, अक्षय कांबळे, सार्वजनिक जयंती अध्यक्ष तेजराव वानखडे, अरविंद उचित यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# महात्मा फुले हे जागतिक विचारांची पायाभरणी करणारे पहिले समाजसुधारक - प्रा. अशोक राणा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

## क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले जयंती महोत्सवाचा समारोप

समाजाला जागतिक स्पर्धेत टिकायचे असेल तर जागतिक विचार सुद्धा आत्मसात करावे लागतील. ही बाब हेरून क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांनी जागतिक विचार आत्मसात करत ते भारतात रुजविण्याचे कार्य केले. त्यांनी सत्यशोधनाचा नवा विचार पेरून पिढ्यान, पिढ्यांच्या गुलामगिरीतुन बहुजन समाजाची सुटका केली, असे गौरवोद्गार प्रा. अशोक राणा यांनी काढले.

क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती व द्विशताब्दी जन्मोत्सवी वर्षानिमित्त क्रांतीसुर्य सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने फुले स्मारक परिसरात दि. ११ एप्रिल रोजी आयोजित जाहीर व्याख्यानात प्रा. राणा यांनी सविस्तर मांडणी केली. 'क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले यांचे समाजकार्य आणि आजची सामाजिक स्थिती' या विषयावर बोलताना त्यांनी आजही फुलेंचे विचार कसे लागू पडतात याचे दाखले दिले. यावेळी विचारपीठावर ज्येष्ठ सत्यशोधक विचारवंत डॉ. रवी जाधव, रामप्रभू सोनोने, डॉ. विजय कानडे, माजी



नगराध्यक्ष लक्ष्मणराव इंगोले, प्रल्हाद रंधवे, लिलाबाई रंधवे यांची उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना प्रा. राणा म्हणाले की, जोतीराव फुले यांना बालपणापासूनच शिक्षणाची आवड असल्यामुळे त्यांचे विचार अधिक प्रगल्भ झाले. त्यांनी जगातील सर्व आदर्शत्वांचा अभ्यास केला आणि हा जागतिक विचार आपल्या देशात रुजविण्यासाठी त्यांनी आयुष्यभर कार्य केले.

त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून सत्यशोधनाचा नवा विचार रुजविला. विचारांची शक्ती ही सर्वाधिक प्रबळ असते, त्यामुळे विचारांची पिढी घडविण्याचे काम त्यांनी केले. ते देशातील एक मोठे उद्योगपती होते. त्यांनी आपला वेळ, श्रम आणि पैसा समाजाच्या उत्थानासाठी खर्ची घातला. त्यांनी बालहत्या प्रतिबंधक गृह काढले. स्त्रियांसाठी अनेक शाळा काढल्या. गुलामगिरी या ग्रंथातून त्यांनी समाजाच्या अधोगतीचे कारण मांडले.

येणाऱ्या काळात अनेक पिढ्यांना गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी त्यांना भक्कम साथ दिली. फुले यांनी तत्कालीन विषम समाज व्यवस्थेवर आपल्या लेखणीतून आसूड ओढले. आजही मोठ्या प्रमाणात होत असलेले शिक्षणाचे खाजगीकरण, शेतकऱ्यांचे शोषण आणि बहुजन समाजाला मानसिक गुलामगिरीत लोटण्याचे नवीन प्रयत्न पाहता महात्मा फुले यांचे विचार आजही तेवढेच प्रासंगिक असल्याचे मत प्रा. राणा यांनी व्यक्त केले.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १४२ ■ रविवार, १९ एप्रिल २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# देशात सर्वाधिक तापमानाची नोंद वर्धा येथे ४५°C

## २१ एप्रिलपर्यंत हीटवेव्हचा इशारा; विदर्भात जनजीवन विस्कळीत

**वर्धा जनमाध्यम :** एप्रिल महिन्याच्या मध्यातच उन्हाळ्याने आक्राळविक्राळ रूप धारण केले असून संपूर्ण देश उष्णतेच्या लाटेत होरपळत आहे. उत्तर प्रदेशातील बांदा येथे शुक्रवारी ४५.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाल्यानंतर, शनिवारी देशात सर्वाधिक तापमानाची नोंद वर्धा येथे तब्बल ४५ अंश सेल्सिअस इतकी झाली. त्यामुळे वर्धा जिल्हा अक्षरशः 'अंगार' बनला असून विदर्भात उष्णतेचा कहर शिगेला पोहोचला आहे.

हवामान विभागाने दिलेल्या इशाऱ्यानुसार, २१ एप्रिलपर्यंत उष्णतेच्या लाटेचा प्रभाव कायम राहणार असून नागरिकांनी विशेष सतर्कता बाळगण्याचे आवाहन करण्यात आले आहे. एप्रिलमध्येच 'मे महिन्याची झळ' बसू लागल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. दुपारच्या वेळेत रस्ते ओस पडलेले दिसत असून बाजारपेठांमध्येही शुकशुकाट जाणवत आहे.



विदर्भातील इतर शहरांमध्येही तापमानाने उच्चांकी पातळी गाठली आहे. अमरावती येथे ४४ अंश, नागपूर ४४.२ अंश, अकोला ४३.३ अंश, चंद्रपूर ४३.४ अंश, यवतमाळ ४३.८ अंश, गडचिरोली ४३ अंश अशी तापमानाची नोंद झाली आहे. या सर्व आकडेवारीवरून संपूर्ण विदर्भ उष्णतेच्या विळख्यात सापडल्याचे स्पष्ट होत आहे.




### थोडा दिलासा कधी मिळणार?

हवामान खात्याच्या अंदाजानुसार, उत्तर भारतातील उच्च दाब क्षेत्राचा प्रभाव पुढील दोन दिवसांत काहीसा कमी होऊ शकतो. त्यामुळे तापमानात किंचित घट होण्याची शक्यता असली तरी उकाडा कायम राहणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस नागरिकांसाठी अत्यंत कठीण ठरणार आहेत.

### आरोग्य धोक्यात; रुग्णालयांत गर्दी वाढली

उष्णतेच्या वाढत्या तीव्रतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. उष्माघात, डिहायड्रेशन, चक्कर येणे, अशक्तपणा अशा तक्रारी घेऊन रुग्णालयांत येणाऱ्यांची संख्या वाढली आहे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि दीर्घकालीन आजारांनी ग्रस्त व्यक्तींना अधिक धोका असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले आहे.

### प्रशासनाचे पाऊल; पाणीपुरवठ्यावर भर

उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनानेही उपाययोजना सुरू केल्या आहेत. पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्यावर भर देण्यात येत असून सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांना उष्णतेपासून बचावासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

### सावधान! स्वतःची काळजी घ्या

दुपारी १२ ते ४ या वेळेत घराबाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी व द्रवपदार्थांचे सेवन करावे, हलके व सैल कपडे परिधान करावेत तसेच डोक्यावर टोपी किंवा रुमाल वापरावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

विदर्भात पेटलेल्या या उष्णतेच्या लाटेमुळे एप्रिलमध्येच मेचा तडाखा' नागरिकांना सहन करावा लागत असून, आभाळातून कोसळणाऱ्या या अंगारापासून बचाव करण्यासाठी आता प्रत्येकाने सजग राहणे हीच काळाची गरज बनली आहे.

# दहा वर्षांचा दुष्काळ संपला; सिंदीत दिवसाआड पाणीपुरवठ्याने दिलासा

## सत्ताधारी-विरोधकांची एकजूट ठरली परिणामकारक; तांत्रिक प्रयोगाने बदलले चित्र

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** गेल्या तब्बल दहा वर्षांपासून पाणीटंचाईच्या विळख्यात सापडलेल्या सिंदी शहराला अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. नगरपरिषदेकडून राबविण्यात आलेल्या विशेष उपाययोजनांमुळे प्रथमच भर उन्हाळ्यात शहरात दिवसाआड नियमित व मुबलक पाणीपुरवठा सुरू झाला आहे. त्यामुळे नागरिकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले असून, आता तरी पाण्यासाठीची धावपळ थांबली, अशी भावना व्यक्त होत आहे.

शहरातील पाणीप्रश्न मागील अनेक वर्षांपासून बिकट बनला होता. पाच-पाच दिवसांनी होणारा पाणीपुरवठा, मध्येच तांत्रिक बिघाडामुळे आठवडाभर खंड, आणि त्यानंतर टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ या सर्वांमुळे नागरिक त्रस्त झाले होते. विशेषतः महिलांना पाण्यासाठी तासन्तास रांगेत उभे राहावे लागत होते. या पार्श्वभूमीवर नुकत्याच झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत 'पाणी' हा प्रमुख मुद्दा ठरला. नव्याने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी पाणीप्रश्न सोडविण्याचा निर्धार केला.

नगरपरिषदेकडून विशेष सभा बोलावून विविध पर्यायांवर सखोल चर्चा करण्यात आली. या बैठकीत सत्ताधारी आणि विरोधी गटांनी







एकमताने निर्णय घेतल्याने कामाला गती मिळाली. पाणीपुरवठ्यातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे जलकुंभ भरण्यास लागणारा तब्बल दहा तासांचा कालावधी. यावर उपाय म्हणून साडेबारा अश्वशक्तीची नवीन पाणबुडी मोटर बसविण्यात आली. या मोटरीचे पाणी आणि अस्तित्वात असलेल्या २५ अश्वशक्ती मोटरीचे पाणी एकाच पाइपलाइनमधून खेचण्याचा प्रयोग करण्यात आला. पाइपलाइन फुटण्याचा धोका असतानाही हा प्रयोग यशस्वी ठरला आणि जलकुंभ भरण्याचा कालावधी थेट सहा तासांवर आला. शहराचे सहा झोनमध्ये विभाजन करून दररोज तीन झोनमध्ये सकाळ, दुपार आणि सायंकाळ अशा टप्प्यांत पाणीपुरवठा सुरू करण्यात आला. परिणामी, प्रत्येक भागाला दिवसाआड नियमित पाणी मिळू लागले. यामुळे नागरिकांनी अतिरिक्त पाणी साठवण्याची गरज कमी केली आणि पाण्याचा अपव्ययही मोठ्या प्रमाणात आटोक्यात आला.

या उपक्रमामागे नगराध्यक्ष राणी स्नेहल कलोडे आणि उपाध्यक्ष तथा पाणीपुरवठा सभापती अकील शेख यांचे विशेष प्रयत्न राहिले. त्यांच्या निर्णयांना आमदार समीर कुणावार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच जलजीवन प्राधिकरणचे अभियंता दीपक धोटे यांनी दिलेल्या तांत्रिक सल्ल्यामुळे बूस्टर पंपचा प्रयोग यशस्वी ठरला. हा पंप सुरुवातीला विनामोबदला उपलब्ध करून देण्यात आला होता. प्रयोग यशस्वी झाल्यानंतर नगरपरिषदेकडून तो चार महिन्यांसाठी भाड्याने घेण्यात आला आहे. दरम्यान, शहरात दिवसाआड पाणीपुरवठा सुरू झाल्याने विशेषतः महिलांना मोठा दिलासा मिळाला आहे.

**पाणीप्रश्न सोडविणे हेच आमचे प्राधान्य होते**

मी गृहीणी असल्याने पाणी समस्येची तीव्रता मला चांगलीच माहीत होती. उपाध्यक्ष अकील शेख, सर्व नगरसेवक आणि विरोधी गटाच्या सहकार्यामुळे हा प्रश्न सोडविणे शक्य झाले. सर्वांच्या एकजुटीमुळेच हा यशस्वी प्रयोग घडून आला.

**राणी स्नेहल कलोडे,**
नगराध्यक्ष, सिंदी (रेल्वे)

**तांत्रिक बदल आणि नियोजनाचा परिणाम**

पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना आणि योग्य नियोजन आवश्यक होते. सत्ताधारी-विरोधकांच्या एकमतामुळेच हे काम वेगाने पूर्ण झाले.'

**अकील शेख, उपाध्यक्ष**
व पाणीपुरवठा सभापती

# सिंदी (रेल्वे) परिसरात अवैध रेती वाहतूक उघड; ट्रॅक्टरसह ६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** अवैध रेती वाहतुकीवर कारवाई करत सिंदी (रेल्वे) पोलिसांनी नाकाबंदीदरम्यान ट्रॅक्टर, ट्रॉली व रेती असा सुमारे ६ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी एका शेतकऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीस ठाणे सिंदी (रेल्वे) येथे गुन्हा क्रमांक ११८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३०३(२), ४० तसेच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४८(७)(५) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणी पोलीस शिपाई कांचन विजयराव चाफले (ब.क्र. १६५८) यांनी फिर्याद दिली आहे.

आरोपी सुनिल मोतीरामजी गोल्हार (वय ४८, व्यवसाय शेती, रा. पळसगाव, ता. सेलू) याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १७ एप्रिल रोजी दुपारी साडे दोनच्या सुमारास पोलिस पथक पेट्रोलिंग करत असताना खबर मिळाली की, काढलीकडून सिंदीकडे एक लाल रंगाचा ट्रॅक्टर काळी रेती (गौण खनिज) घेऊन येत आहे. या माहितीच्या आधारे मारडा शिवारातील बसथांब्याजवळ नाकाबंदी करण्यात आली. थोड्याच वेळात संशयित ट्रॅक्टर दिसताच पोलिसांनी त्याला अडवून चौकशी केली. चालकाने आपले नाव सुनिल गोल्हार असे सांगितले. वाहनाची तपासणी केली असता ट्रॉलीमध्ये अंदाजे एक ब्रास काळी रेती आढळून आली. पोलिसांनी वाहतुकीसंदर्भात रॉयल्टी पास किंवा परवाना मागितला असता, तो उपलब्ध नसल्याचे चालकाने सांगितले. त्यामुळे पोलिसांनी पंचनामा करून एक महिंद्रा कंपनीचा ५८५ मॉडेलचा लाल रंगाचा ट्रॅक्टर (क्र. एमएच-३२ टीसी-०२५), एक ट्रॉली व त्यातील रेती असा एकूण सुमारे ६,०६,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी आरोपीस वैध कागदपत्रे सादर करण्यासाठी वेळ दिला होता. मात्र तो परवाना सादर करू न शकल्याने शासनाच्या मालकीची रेती चोरी करून वाहतूक केल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले.

या प्रकरणाचा तपास पोलीस कर्मचारी सफी भाऊसाहेब बोचरे करीत आहेत. अवैध रेती वाहतुकीविरुद्ध पोलिसांनी कारवाईची मोहीम अधिक तीव्र केल्याचे दिसून येत आहे.

# मंदिरातील दानपेट्यांवर डल्ला; तिघांना अटक, ४.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील धार्मिक स्थळांना लक्ष्य करून दानपेट्यांमधील रक्कम चोरणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला असून, तिघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत नगदी, मोबाईल फोन आणि दोन दुचाकी असा एकूण ४ लाख ८१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी सेलू पोलीस ठाण्यात ८ एप्रिल रोजी गुन्हा दाखल झाला होता. फिर्यादी आकाश रविंद्र म्हैसकर (वय ३२, रा. टाकळी झडशी, ता. सेलू) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ७ एप्रिल रोजी दुपारी केळझर येथील बुद्ध विहारात अज्ञात व्यक्तींनी प्रवेश करून दानपेटीतील सुमारे २० हजार रुपये चोरून नेले होते. या घटनेचा तपास सुरू असताना स्थानिक गुन्हे शाखेने समांतर तपास हाती घेतला.

घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान आरोपी नागपूर येथील असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर पथकाने नागपूर येथे धाड टाकून तिघांना ताब्यात घेतले.

**अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे पुढीलप्रमाणे आहेत :**

अनिकेत समीर जुगनाके उर्फ बाटकर (वय २१), अमित छन्नुलाल सहरिया (वय २२) आणि पृथ्वी उर्फ विजय कुशिंद्र हत्तीमारे (वय २०), सर्व रा. नागपूर.

चौकशीदरम्यान आरोपींनी केळझर येथील बुद्ध विहारासह रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागठाणा रोडवरील हनुमान मंदिरातील दानपेटी फोडल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपींकडून ११ हजार ५०० रुपये नगदी, ४ अॅन्ड्रॉईड मोबाईल (अंदाजे किंमत ४५ हजार रुपये), केटीएम ड्यूक मोटरसायकल (२.५० लाख रुपये) व पल्सर एनएस १६० मोटरसायकल (१.७५ लाख रुपये) असा एकूण ४.८१ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विनोद चौधरी व त्यांच्या पथकाने केली. आरोपींना पुढील तपासासाठी सेलू पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

# महागाईचा डबल झटका; यूपीआयने वाढवली उधळपट्टी

## 'स्कॅन करा-पेमेंट करा' सवयीने आर्थिक शिस्त कोलमडली

**वर्धा जनमाध्यम :** खिशात रोख नाही, तरी खर्च मात्र बेफाम, महागाईने आधीच कंबर मोडलेल्या सर्वसामान्यांच्या आयुष्यात आता यूपीआयच्या सुलभतेने नवी डोकेदुखी निर्माण केली आहे. 'स्कॅन कराष्ठ पेमेंट कराष्ठ आणि पुढे चला' या डिजिटल मंत्राने व्यवहार वेगवान झाले; पण त्याचवेळी खर्चावरची लगाम सुटून आर्थिक शिस्त कोसळताना दिसत आहे. नकळत वाढणाऱ्या खर्चामुळे लोक कर्जाच्या गर्तेत ढकलले जात असून, बचतीचा पाया हादरत आहे.

गेल्या काही वर्षांत यूपीआयने शहरांसह ग्रामीण भागातही जबरदस्त पाय रोवले आहेत. भाजीवाला, चहा टपरी, किराणा दुकान ते महागड्या शोरूमपर्यंत सर्वत्र एकच नारा 'स्कॅन करा आणि पैसे द्या' मात्र या सुलभ व्यवहाराने पैशाची किंमत'च जणू हरवली आहे. खिशातून नोटा जाताना जाणवणारी टोचणी डिजिटल व्यवहारात नाही. त्यामुळे खर्च करताना विचार करण्याची सवय कमी होत चालली आहे.

महागाईचा भडका उडालेलाच आहे. अन्नधान्य, तेल, डाळी, मसाले यांच्या दरवाढीने घरगुती बजेट आधीच विस्कळीत झाले होते. आता दैनंदिन वापराच्या वस्तूंनीही किमतींचा रस्ता धरला आहे. साबण ३ ते ५ टक्के, शॅम्पू ४ ते ६ टक्क्यांनी महागल्याने 'बाथरूम बजेट' सुद्धा ताणले गेले आहे. म्हणजेच, स्वयंपाकघरापासून बाथरूमपर्यंत



महागाईचा विळखा अधिक घट्ट होत आहे.

अर्थतज्ज्ञांच्या मते, घरगुती बचतीचा दर अनेक दशकांतील खालच्या पातळीवर पोहोचला आहे. दुसरीकडे, वैयक्तिक कर्जाचा आकडा झपाट्याने वाढतो आहे. यामागे केवळ महागाई नाही, तर डिजिटल व्यवहारामुळे वाढलेली अनियंत्रित खर्चाची सवय'ही मोठे कारण मानले जात आहे. 'आज घ्या, उद्या भरा या मानसिकतेने आर्थिक शिस्त धुळीस मिळत आहे.

दररोजच्या छोट्या-छोट्या व्यवहारांचा आकडा किती मोठा होतो, याचा अंदाज अनेकांना नसतो. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती रोज ३०० रुपयांच्या तीन खरेदी करत असेल, तर वर्षभरात हा खर्च एक लाखांच्या घरात पोहोचतो. हा खर्च नकळत होतो, कारण रोख व्यवहारात जशी जाणीव होते, तशी डिजिटल पेमेंटमध्ये होत नाही. परिणामी, महिन्याअखेरीस खिशाला चाट बसते.

यूपीआयने व्यवहार सुलभ केले, यात वाद नाही; पण हीच सोय आता 'उधळपट्टीचा दरवाजा' बनत असल्याची भीती व्यक्त केली जात आहे. खर्चाचा वेग वाढला, पण उत्पन्न त्याच ठिकाणी थांबले अशी विसंगती निर्माण झाली आहे. त्यामुळेच अनेक कुटुंबे कर्जाच्या साखळीत अडकत असून, आर्थिक ताणतणाव वाढत आहेत.

एकूणच, डिजिटल क्रांतीचा हा उजवा हात आता सर्वसामान्यांच्या खिशावर डावा घाव घालत असल्याचे चित्र आहे. यूपीआयच्या सोयीबरोबर आर्थिक शिस्त पाळली नाही, तर ही 'स्कॅन संस्कृती' भविष्यात गंभीर आर्थिक संकटाला आमंत्रण देऊ शकते अशी स्पष्ट इशारा तज्ज्ञ देत आहेत.

# जाममध्ये जातीवाचक शिवीगाळ करत मारहाण; दोघांविरुद्ध अॅट्रॉसिटीचा गुन्हा

**समुद्रपूर जनमाध्यम :** तालुक्यातील जाम येथे किरकोळ वादातून उफाळलेल्या संतापाने गंभीर वळण घेत, एका शेतकऱ्याला जातीवाचक शिवीगाळ करत बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी समुद्रपूर पोलिसांनी दोघांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला असून आरोपी अद्याप फरार आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रमोद पांडुरंग कुडम (वय ३५, रा. तुकडोजी वार्ड, जाम) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून हा गुन्हा नोंदविण्यात आला. शोभराज उर्फ अजय खेडेकर व विजय खेडेकर (दोघेही रा. जाम) अशी आरोपींची नावे आहेत. गुन्हा क्रमांक २४९/२०२६ अंतर्गत भा.न्या.सं. कलम ११७(२), ३(५) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ मधील कलमांनुसार कारवाई करण्यात आली आहे. घटनेपूर्वी १३ एप्रिलच्या रात्री आरोपींच्या ट्रॅक्टरने फिर्यादीच्या घरासमोरील मोकळ्या जागेत रेती टाकल्याने वादाची ठिणगी पडली होती. या प्रकाराला फिर्यादीने विरोध दर्शविला होता. त्यानंतर दुसऱ्या दिवशी (दि. १४ एप्रिल) दुपारी साडेदोनच्या सुमारास फिर्यादी मोटारसायकलने ग्रामपंचायत वाचनालयाकडे जात असताना महाराष्ट्र खानावळीसमोर आरोपींनी त्यांना अडवले. यावेळी आरोपींनी जातीवाचक अपमानास्पद शब्दांचा वापर करत शिवीगाळ केली. काही कळण्याआधीच दोघांनी मिळून फिर्यादीचा कॉलर पकडून लाथाबुक्क्यांनी जबर मारहाण केली. या हल्ल्यात फिर्यादीच्या चेहऱ्यावर गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. घटनेनंतर जखमी अवस्थेत फिर्यादीने समुद्रपूर पोलीस ठाण्यात धाव घेतली. पोलिसांनी त्यांना तातडीने ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. डोक्याला दुखापत असल्याने पुढील तपासणीसाठी हिंगणघाट येथे पाठविण्यात आले. मात्र तेथील सीटी स्कॅन व एक्स-रे यंत्रणा बंद असल्याने अखेर सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात तपासणी करून घेण्यात आली. सीटी स्कॅन अहवाल प्राप्त झाल्यानंतर फिर्यादीने पुन्हा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार नोंदवली.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस हवालदार विनोद बाटे करीत असून उपविभागीय पोलीस अधिकारी, हिंगणघाट यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. दरम्यान, गंभीर कलमांखाली गुन्हा नोंद असूनही आरोपींना अद्याप अटक झालेली नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. पोलिसांकडून आरोपींचा शोध सुरू असून लवकरच त्यांना ताब्यात घेण्यात येईल, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# वासुदेवराव तिमांडे यांचे निधन

**हिंगणघाट जनमाध्यम :** येथील ज्येष्ठ सहकार नेते तथा हिंगणघाट खरेदी-विक्री संघाचे माजी सचिव वासुदेवराव बालाजी तिमांडे (वय ८९) यांचे दि. १७ एप्रिल २०२६ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने सहकार क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.



स्व. तिमांडे हे जय भारती शिक्षण संस्था, हिंगणघाटचे सचिव व माजी आमदार प्रा. राजभाऊ तिमांडे यांचे वडील होत. त्यांनी आपल्या कार्यकाळात सहकार चळवळीत मोलाचे योगदान देत हिंगणघाट परिसरात आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. संघटनेच्या माध्यमातून शेतकरी व सर्वसामान्यांच्या हितासाठी त्यांनी सातत्याने कार्य केले.

त्यांच्या पार्थिवावर शनिवार, दि. १८ एप्रिल रोजी सायंकाळी हिंगणघाट येथील मोक्षधामात वर्धा नदीच्या तीरावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अंत्यसंस्कार प्रसंगी आमदार समीर कुणावार, सहकार नेते सुधीर कोठारी, माजी राज्यमंत्री अशोक शिंदे, किशोर दिघे, पत्रकार इक्राम हुसेन, माजी नगराध्यक्ष प्रेम बसंतानी, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शशांक घोडमारे, लोजपा नेते केशव तितरे, सुभाष निनावे, विलास विरूळकर, नाना ढगे तसेच राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

स्व. तिमांडे यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या निधनाने हिंगणघाट परिसरातील सहकार क्षेत्रातील एक अनुभवी, कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व हरपल्याची भावना व्यक्त केली जात आहे.

# थंड पाण्याच्या थेंबातून अभिवादन... बाबासाहेबांच्या जयंतीला मानवतेचा गारवा

**वर्धा जनमाध्यम :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त वर्धा शहरात मानवतेचा एक सुंदर स्पर्श अनुभवायला मिळाला. स्थानिक मुख्य पोस्ट चौकात शिवसेना (शिंदेगट) व वर्धा जिल्हा व्यापारी संघाच्या वतीने नागरिकांना थंड पाण्याच्या बाटल्यांचे वाटप करून समाजसेवेचा संदेश दिला गेला. या उपक्रमाची सुरुवात अत्यंत आदरपूर्ण वातावरणात झाली. बाबासाहेबांच्या प्रतिमेचे पूजन, माल्यार्पण व दीपप्रज्वलन शिवसेना (शिंदेगट) जिल्हाप्रमुख राजेश सराफ यांच्या हस्ते पार पडले. चौकात उपस्थित नागरिकांच्या मनात बाबासाहेबांविषयी कृतज्ञतेची भावना दाटून आली होती.

यावेळी जिल्हा व्यापारी संघाचे अध्यक्ष संतोष यादव, माजी नगरसेवक शरद आडे, तक्रार निवारण समितीचे प्रमुख सुरेश पट्टेवार, सामाजिक कार्यकर्त्या भारती श्रीवास्तव, अमोल श्रीवास्तव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर समाजसेवेचा समाधानकारक आनंद झळकत होता.

## जाहीरनामा

ज्याअर्थी, विधि व न्याय विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांची दिनांक ११/०८/२०२३ ची अधिसूचना अन्वये जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ चे कलम १३ मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार, ज्या जन्म व मृत्यूच्या नोंदणीबाबत १ वर्षापेक्षा अधिक कालावधीने सूचना प्राप्त होते, अशा प्रकरणात नोंदी घेण्यासाठी कार्यकारी दंडाधिकारी, ज्यांना जिल्हा दंडाधिकारी यांनी प्राधिकृत केले आहे, अशा कार्यक्षेत्रासाठी ज्या ठिकाणी अशा व्यक्तीचा जन्म व मृत्यू झाला आहे, त्याबाबतच्या अचूकतेबाबत खात्री करुन विलंब शुल्क आकारुन अशा नोंदी घेण्याबाबत आदेशित करण्याची सुधारीत तरतूद करण्यात आली आहे. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम, १९६९ मधील कलम १७ व महाराष्ट्र जन्म-मृत्यू नोंदणी नियम, २००० मधील नियम १३ (३) नुसार जन्म-मृत्यू घटना नोंदणी संदर्भातील निबंधक, जन्म व मृत्यू यांनी अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यासंबंधी तरतूद करण्यात आली आहे. तसेच सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक : जमृनों २५२५/ई.ऑ.९९११८१) प्र.क्र.२२/कु.क. दिनांक १२ मार्च, २०२५ मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम, १९६९ व सुधारणा अधिनियम, २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म-मृत्यु नोंदीबाबतची कार्यपध्दती निश्चित केली आहे.

ज्याअर्थी, शेषराव मानाजी हरणखेडे, रा. पाचेगाव ता.आर्वी जि. वर्धा यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत कार्यालय, नांदोरा (काळे) येथे उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या मृत्यू नोंदीचे अनुपलब्धता प्रमाणपत्र, रहीवासाचे पुरावे, मालमत्तेचे पुरावे, ओळखीबाबतचे पुरावे व कौटुंबिक पुराव्यासह सचिव तथा जन्म-मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत कार्यालय, नांदोरा (काळे) ता.आर्वी जि. वर्धा यांनी या कार्यालयास प्रस्ताव सादर केला आहे.

त्याअर्थी, शेषराव मानाजी हरणखेडे, रा. पाचेगाव ता.आर्वी जि. वर्धा यांच्या विलंबाने मृत्युच्या नोंदीबाबत कोणाचे काही आक्षेप / हरकती असल्यास त्या सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत (विहीत मुदतीत) कार्यालयीन कामकाजाचे दिवशी व वेळी लेखी स्वरुपात दाखल कराव्यात. विहीत मुदतीनंतर आक्षेप / हरकतींचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

**(हरीश काळे)**
**तहसिलदार, आर्वी**

जनमाध्यम

e paper - www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठीत सवय

■ रविवार १९ एप्रिल २०२६

# काल जे घडले तो लोकशाहीचा विजय होता

## - प्रियांका वाड्रा





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका वाड्रा यांनी महिला आरक्षणासंदर्भातील घडामोडींवर प्रतिक्रिया देताना याला लोकशाहीचा मोठा विजय म्हटले आहे. त्या म्हणाल्या की, विरोधी पक्षांनी एकजुटीने संघराज्यीय रचना कमकुवत करण्याचा सरकारचा प्रयत्न हाणून पाडला.प्रियांका वाड्रा यांनी एका पत्रकार परिषदेत आरोप केला की, निवडणुकांच्या काळात संसदेचे अधिवेशन घाईघाईने बोलावण्यात आले आणि विधेयकाचा मसुदा केवळ एक दिवस आधी सादर करण्यात आला. त्या म्हणाल्या, 'हा एक हेतुपुरस्सर रचलेला कट होता. सरकारला वाटले की, विधेयक मंजूर झाले तर तो विजय असेल आणि ते नामंजूर झाले तरी तो विजयच असेल.'सरकारने कायमस्वरूपी सत्ता टिकवून ठेवण्यासाठी आणि स्वतःला 'महिलांचा तारणहार' म्हणून सादर करण्यासाठी महिलांना ढाल म्हणून वापरण्याचा प्रयत्न केला, असा आरोप त्यांनी केला. हाथरस, मणिपूर आणि महिला खेळाडूंचे मुद्दे उपस्थित करत प्रियांका वाड्रा म्हणाल्या की, महिला सक्षमीकरणाबाबतचे सरकारचे दावे वास्तवाशी विसंगत आहेत. प्रियंका वाड्रांनी दावा केला की, हा प्रस्ताव वास्तविकपणे महिला आरक्षणाबद्दल नसून मतदारसंघ पुनर्रचनेबद्दल आहे. राजकीय संतुलन बदलण्याचा हा एक प्रयत्न असल्याचे त्या म्हणाल्या. त्या म्हणाल्या, 'विरोधी पक्ष कसे एकत्र येउन सरकारला पराभूत करू शकतात, हे आता स्पष्ट झाले आहे याचा मला आनंद आहे.' 'काळा दिवस' साजरा करण्यासंदर्भात त्या म्हणाल्या की, सरकारला पहिल्यांदाच मोठा राजकीय धक्का बसल्यामुळे हा दिवस पाळला जात आहे. प्रियंका वाड्रा यांनी मागणी केली की, सरकारने २०२३ मध्ये मंजूर झालेले महिला आरक्षण विधेयक तात्काळ लागू करावे, जेणेकरून महिलांना खरे प्रतिनिधित्व मिळू शकेल.

# महिला आरक्षण विधेयक नामंजूर, हा लोकशाहीसाठी दु:खाचा दिवस - प्रियांका चतुर्वेदी



**मुंबई/प्रतिनिधी-**: महिला आरक्षण विधेयक मंजूर न होणे हा भारतीय लोकशाहीसाठी दुःखाचा दिवस आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना ठाकरे गटाच्या माजी खासदार प्रियांका चतुर्वेदी यांनी व्यक्त केली आहे. ज्या महिलांना संसदेत किंवा विधानसभेवर निवडून जाण्याची इच्छा होती, त्यांच्यासाठी महिला आरक्षण विधेयक मंजूर न होणे दुःखद बाब असल्याचेही त्या म्हणाल्या. दरम्यान त्यांच्या या पक्षविरोधी भूमिकेबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे. प्रियांका चतुर्वेदी यांनी हे विधेयक नामंजूर झाल्यानंतर पक्षाच्या विरोधात जाउन विधेयकाचे समर्थन करणारी भूमिका घेतली. त्यांनी हे विधेयक मंजूर न झाल्याबद्दल दुःख व्यक्त केले. माझी भूमिका सातत्याने महिला आरक्षण विधेयकाच्या बाजूने राहिली आहे आणि मी या मुद्द्यावर आवाज उठवतच राहीन. मी स्वत?ला इतरांच्या सोयीनुसार बदलणार नाही जर तुम्हाला मी जशी आहे तसा पचनी पडत नसेल, तर तो तुमचा प्रश्न आहे?.प्रियांका चतुर्वेदी यांच्या या भूमिकेनंतर राजकीय वर्तुळात त्या ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देउन नव्या पक्षात जाणार का, अशी चर्चा होउ लागली आहे.

# गैरमार्गाने विजय मिळवण्यासाठीचे फेररचना विधेयक, राजकीय हेतूने

## आदित्य ठाकरेंचा निशाणा



**मुंबई/प्रतिनिधी-** गेले काही दिवस चर्चेचा विषय ठरलेले महिला आरक्षणाशी संबंधित संविधान (१३१वी दुरुस्ती) विधेयक केंद्र सरकारला लोकसभेत शुक्रवारी मंजूर करून घेता आले नाही. २१ तासांच्या चर्चेनंतर या विधेयकावर झालेल्या मतदानात बाजूने २९८ व विरोधात २३० मते पडली. घटनादुरुस्ती विधेयक संमत होण्यासाठी सभागृहातील सदस्यसंख्येच्या दोन तृतीयांश मते मिळणे आवश्यक होते; पण तो आकडा सत्ताधा-यांना गाठता आला नाही. २०१४ पासूनच्या सत्ताकाळात मोदी सरकारला सभागृहात एखादे विधेयक संमत करता न आल्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. यावरून आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. 'संविधानातील हा हस्तक्षेप भारतातील लोकशाहीसाठी पर्यायाने संविधानाकरिताही मारक ठरला असता, पण हा प्रयत्न विरोधी पक्षाच्या खासदारांच्या एकजुटीमुळे फेटाळण्यात आला' असं म्हटलं आहे. आदित्य ठाकरे यांनी आपल्या ट्विटर अकाउंटवरून याबाबत ट्वीट केलं आहे. 'केंद्र सरकारने राजकीय हेतूने संविधानात दुरुस्ती करून लोकसभा मतदारसंघांची संख्या वाढवणारे, अनेक राज्यांचा आवाज दाबणारे आणि गैरमार्गाने विजय मिळवण्यासाठी मतदारसंघांची फेररचना करण्याचा प्रयत्न करणारे मांडलेले विधेयक, काल संसदेत पराभूत झाले."संविधानातील हा हस्तक्षेप भारतातील लोकशाहीसाठी पर्यायाने संविधानाकरिताही मारक ठरला असता, पण हा प्रयत्न विरोधी पक्षाच्या खासदारांच्या एकजुटीमुळे फेटाळण्यात आला. खरे म्हणजे, महिला आरक्षण कायदा २०२३ मध्ये संसदेत मंजूर झाले असून, त्याची अधिसूचना १६/०४/२०२६ रोजी जारी करण्यात आली होती.' 'आजच्या विधेयकाला 'गैरमार्गाने विजय मिळवण्यासाठीचे फेररचना विधेयक' असे नाव द्यायला हवे होते. खरे तर सध्याच्या जागांमध्येच ३३S महिला आरक्षण लागू करण्याची, आवश्यकता आहे! सरकारची खरीच तशी भूमिका असेल तर २०२९ च्या लोकसभा निवडणुकांसाठी ५४३ जागांमध्ये तसेच देशभरातील सर्व निवडणुकांमध्ये हे आरक्षण प्रभावीपणे लागू करणे आवश्यक आहे' असं आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे.

# तामिळनाडूमध्ये भीषण अपघात; केरळच्या 9 जणांचा मृत्यू

## ■ पंतप्रधान मोदींनी व्यक्त केले दुःख ■



**चेन्नई/वृत्तसंस्था-** तामिळनाडू राज्यातील कोयंबटूर जिल्ह्यातील पोल्लाची परिसरात झालेल्या भीषण रोड अपघातात केरळमधील नउ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. ही घटना त्या वेळी घडली जेव्हा प्रवाशांनी भरलेली टेम्पो ट्रॅव्हलर व्हॅन सुमारे ८०० फूट खोल दरीत कोसळली. या अपघातामुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून मृतांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही व्हॅन केरळमधील अथिरापल्ली येथून पोल्लाचीच्या दिशेने जात होती. वलपराई हिल रोडवरील १३व्या वळणावर चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि व्हॅन रस्त्याच्या कडेला असलेल्या गार्डरेलला धडकून थेट दरीत कोसळली. अपघात इतका भीषण होता की वाहन पूर्णपणे चक्काचूर झाले. या व्हॅनमध्ये केरळमधील मलप्पुरम जिल्ह्यातील पांग परिसरातील पल्लिपरंबा स्कूलचे शिक्षक, विद्यार्थी तसेच काही शिक्षकांचे कुटुंबीय प्रवास करत होते. वलपराई येथे पर्यटन करून हे सर्वजण परत केरळकडे निघाले होते. व्हॅनमध्ये एकूण १६ जण प्रवास करत होते.या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्यांमध्ये स्कूलच्या मुख्याध्यापिका अजिता (५४) यांचा समावेश आहे. त्यांच्यासोबत रामला (५२), सुहारा (४३), आशा (४१), मजीद (४३), सजिता (४५), शकीला (३७) आणि रुकिया (३९) हे शिक्षकही मृत्युमुखी पडले आहेत. याशिवाय व्हॅनचा ड्रायव्हर नौशाद (३९) याचाही मृत्यू झाला आहे. या सर्व मृतांची ओळख पटली असून ते सर्वजण पांग परिसरातील रहिवासी होते. अपघातात जखमी झालेल्या प्रवाशांना तातडीने पोल्लाची येथील गव्हर्नमेंट हास्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. वालपराई पोलीस आणि फायर सर्व्हिसच्या पथकाने घटनास्थळी धाव घेउन बचावकार्य केले आणि मृतदेह बाहेर काढले. कोयंबतूरचे जिल्हाधिकारी पवन कुमार यांनी सांगितले की, बचावकार्य अतिशय वेगाने पार पाडण्यात आले. अपघाताची माहिती मिळताच केरळचे विद्युत मंत्री कृष्णन कुट्टी पोल्लाची येथे दाखल झाले आणि त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांशी चर्चा केल्यानंतर मृतांच्या रकमा भरपाईची घोषणा केली जाईल. या दुर्दैवी घटनेबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही तीव्र दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफार्म एक्सवर पोस्ट करताना म्हटले की, कोयंबटूरमधील या अपघाताची बातमी ऐकून मन अत्यंत व्यथित झाले असून मृतांच्या कुटुंबीयांप्रती त्यांनी मनःपूर्वक संवेदना व्यक्त केल्या आहेत. तसेच जखमी लवकर बरे व्हावेत अशी प्रार्थनाही त्यांनी केली आहे.या भीषण रोड अपघातामुळे वलपराई हिल रोडवरील धोकादायक वळणांबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून अशा ठिकाणी अधिक सुरक्षा उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

# 'माझा मुलगा निर्दोष

## TCS धर्मांतर प्रकरणातील आरोपी दानिशच्या आईचा धक्कादायक दावा




**मुंबई/प्रतिनिधी-** नाशिकमधील TCS कंपनीत महिलांचं लैंगिक शोषण आणि धर्मांतराच्या घटनेने संपूर्ण देश हादरला आहे. या प्रकरणात दररोज नवनवीन खुलासे होत असून अनेकांना अटकही झाली आहे. मात्र मुख्य आरोपी निदा खान अद्याप फरार आहे. अटक टाळण्यासाठी तिने न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला आहे. याच दरम्यान टीसीएस कंपनीच्या व्यवस्थापनाने कठोर पाउल उचलत निदाला निलंबित केलं आहे.निदा खानवर गंभीर आरोप असून तिने मुलींना टार्गेट करणा-या इतर आरोपींना साथ दिल्याचा दावा केला जात आहे. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये दानिश खानही आहे. मात्र आता त्याच्या आईने मुलाला वाचवण्यासाठी समोर येत एक विधान केलं आहे. प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी दावा केला की, 'माझा मुलगा निर्दोष आहे, त्याला खोट्या प्रकरणात अडकवण्यात आलं आहे. माझा मुलगा एक चांगला माणूस असून त्याच्यावर लागलेले सर्व आरोप खोटे आहेत.'

**'माझा मुलगा धर्मांतर करू शकत नाही'**-दानिशचा कोणताही गुन्हेगारी रेकार्ड नाही, तो अभ्यासात आणि कामात नेहमीच अग्रेसर राहिला आहे असा दावा त्याच्या आईने केला. धर्मांतराच्या आरोपांना उत्तर देताना त्या म्हणाल्या की, 'माझा मुलगा कोणाचंही धर्मांतर करू शकत नाही. आमच्या धर्मात अशा प्रकारे धर्मांतर होत नाही, ती प्रक्रिया केवळ धार्मिक नेत्यांच्या माध्यमातूनच पूर्ण होते.' नाशिक कंपनी प्रकरणातील महिलांनी केलेले सर्व आरोप खोटे असल्याचे सांगत त्यांनी मुलाची बाजू सावरून धरली.

**आईने केला मुलाचा बचाव-** दानिशच्या आईने सांगितलं की, 'मला माझ्या मुलाच्या आणि पीडितेच्या संबंधांबाबत कोणतीही कल्पना नव्हती. जर त्यांच्यात काही संवाद झाला असेल, तर तो पूर्णपणे मैत्रीचा होता.' आरोपीच्या आईने स्पष्ट केले की, ती महिला त्याची मैत्रीण होती आणि दानिशने आपल्या पत्नीला या मैत्रीबद्दल आधीच कल्पना दिली होती. जेव्हा त्यांना विचारण्यात आलं की, दानिशची पत्नीने पीडितेशी संपर्क साधून 'तो विवाहित असून त्याला दोन मुले आहेत' असे सांगितले होते का?

**अडकवल्याचा आरोप-** यावर आईने सांगितलं की, कदाचित माझ्या मुलाने आपल्या पत्नीला आधीच सांगितलं असावं की ते फक्त मित्र आहेत. त्याने तिला कधीही घरी आणलं नव्हतं. दानिश खान हा एक हुशार आणि प्रामाणिक व्यक्ती असून त्याची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही, त्याला केवळ अडकवण्यात आलं आहे, असा आरोप त्यांनी केला. इतकेच नाही तर अटक करण्यात आलेला तौसीफ अत्तार हा देखील चांगला असल्याचा आणि निर्दोष असल्याचा दावा दानिशच्या आईने केला आहे.

## इराण-अमेरिका तणाव तीव्र;

# होर्मुझ सामुद्रधुनी बंद करण्याचा इराणचा इशारा

**तेहरान/वृत्तसंस्था-** इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या चर्चांच्या प्रयत्नांदरम्यान दोन्ही देशांतील तणाव अधिकच वाढताना दिसत आहे. इराणच्या संसद अध्यक्ष मोहम्मद बागेर गालिबाफ यांनी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना कठोर इशारा देत, अमेरिकेने नौदल नाकेबंदी सुरू ठेवल्यास होर्मुझ सामुद्रधुनी बंद केली जाईल, असे स्पष्ट केले आहे. गालिबाफ यांनी 'एक्स' वरील पोस्टमध्ये म्हटले की, होर्मुझ सामुद्रधुनीतून होणारी वाहतूक पूर्णपणे इराणी अधिका-यांच्या परवानगीवर अवलंबून असेल. नाकेबंदी कायम राहिल्यास होर्मुझ सामुद्रधुनी खुली राहणार नाही, असे त्यांनी ठामपणे सांगितले. तसेच त्यांनी ट्रम्प यांच्यावर एका तासात सात खोटे दावे केल्याचा आरोपही केला.यापूर्वी इराणने युद्धविरामाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझ सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी खुली करण्याची घोषणा केली होती. मात्र, त्यानंतर लगेचच गालिबाफ यांच्या या वक्तव्यामुळे परिस्थिती पुन्हा तणावपूर्ण झाली आहे.

इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनीही सांगितले की, लेबन?नमधील युद्धविरामाच्या अनुषंगाने आणि समन्वयित मार्गांनुसार सामुद्रधुनी खुली करण्यात आली होती.दरम्यान, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणसोबत करार होईपर्यंत नाकेबंदी कायम राहील, असे स्पष्ट केले आहे. त्यांनी इशाराही दिला की, करार न झाल्यास अमेरिका पुन्हा हवाई हल्ले सुरू करू शकते.होर्मुझ सामुद्रधुनी हा जगातील अत्यंत महत्त्वाचा जलमार्ग मानला जातो, ज्यातून जागतिक तेलपुरवठ्याचा मोठा हिस्सा वाहतो. त्यामुळे या भागातील कोणताही तणाव जागतिक उर्जा बाजारावर गंभीर परिणाम करू शकतो.

# दिवसाढवळ्या बॅंक ऑफ महाराष्ट्र बॅंकवर दरोडा

## गोळीबार करत लाखो रुपये आणि सोनेही पळवले!



**भोपाळ/वृत्तसंस्था-** मध्य प्रदेशातील सिंगरौली जिल्ह्यातून एक अत्यंत धक्कादायक घटना समोर आली. बॅंक ऑफ महाराष्ट्रच्या शाखेवर पाच बंदूकधा-यांनी दिवसाढवळ्या दरोडा टाकला. दरोडेखोरांनी बॅंकेत घुसून दहशत निर्माण करण्यासाठी गोळीबार केला आणि काही मिनिटांतच लाखो रुपयांची रोकड व सोने लुटून पसार झाले. या धाडसी दरोड्यामुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली असून सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.

मिळालेल्या माहितीनुसार, पाच सशस्त्र दरोडेखोर मुखवटे घालून बॅंकेच्या शाखेत घुसले. बॅंकेत प्रवेश करताच त्यांनी कर्मचारी आणि ग्राहकांवर बंदूक रोखून दहशत निर्माण केली. उपस्थितांना घाबरवण्यासाठी आरोपींनी हवेत गोळीबार केल्याचाही आरोप आहे, ज्यामुळे बॅंकेत एकच घबराट पसरली. अवघ्या काही मिनिटांतच दरोडेखोरांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवले आणि बॅंकेतील रोख रक्कम व सोन्याचे दागिने घेउन पोबारा केला. ही संपूर्ण घटना बॅंकेतील सीसीटीव्ही कॅमे-यांमध्ये कैद झाली आहे. व्हायरल होत असलेल्या फुटेजमध्ये मुखवटाधारी व्यक्ती अत्यंत वेगाने हालचाल करताना आणि कर्मचा-यांना धमकावताना दिसत आहेत. दरोड्याचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला असून, दिवसाढवळ्या घडलेल्या या प्रकारामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांची पथके तातडीने घटनास्थळी दाखल झाली. पोलिसांनी बॅंकेची नाकाबंदी करून पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. पोलीस सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवण्याचा प्रयत्न करत आहेत. आरोपी ज्या दिशेने पळाले, त्या मार्गावरील इतर सीसीटीव्ही तपासले जात असून शोधमोहीम तीव्र करण्यात आली आहे. भरवस्तीत आणि वर्दळीच्या वेळी बॅंक लुटल्याच्या या घटनेमुळे बॅंकांच्या सुरक्षा व्यवस्थेवर आता गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

# इराणने उघडली हवाई हद्द

## मायदेशी परतण्याचा मार्ग मोकळा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** मध्य पूर्वेतील टोकाच्या तणावाच्या पार्श्वभूमीवर इराणने शनिवारी आपली हवाई हद्द ट्रान्झिट विमानांसाठी पुन्हा खुली केली आहे. इराणच्या नागरी विमान वाहतूक प्राधिकरणाने देशाच्या पूर्व भागातील मार्ग खुले झाल्याचे जाहीर केले असले, तरी सुरक्षेच्या कारणास्तव आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांनी अद्याप इराणच्या आकाशातून उड्डाण करण्यास धजावलेले नाही.



अमेरिका आणि इस्त्रायलसोबतच्या युद्धामुळे गेल्या अनेक दिवसांपासून इराणचे आकाश आणि समुद्र दोन्ही बंद होते. इराणने आता परिस्थिती सामान्य करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे, मात्र डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ठोस अणुकरार होईपर्यंत नाकेबंदी उठवणार नाही' असा पवित्रा घेतल्याने या संघर्षाचे ढग अद्याप हटलेले नाहीत. हवाई क्षेत्र खुले करण्याचा निर्णय निश्चितच एक सकारात्मक चिन्ह आहे, असे तज्ज्ञांचे मत आहे, पण सध्याच्या परिस्थितीत सुरक्षेची चिंता कायम आहे. यामुळेच, वेळ आणि इंधनाचा खर्च वाढला तरीही, विमान कंपन्या धोके टाळून पर्यायी मार्गांचा वापर करत आहेत. अमेरिका आणि इस्त्रायलसोबत वाढलेल्या तणावामुळे गेल्या काही दिवसांपासून इराणची हवाई हद्द मोठ्या प्रमाणात बंद होती. आता ती अंशतः पुन्हा उघडल्याने, परिस्थिती हळूहळू सामान्य करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे दिसून येते. जागतिक तेल पुरवठ्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जाणारी होर्मुझची सामुद्रधुनी पूर्णपणे खुली करण्याचा दावाही इराणने केला आहे. जगातील सुमारे २०S तेल पुरवठा व्यावसायिक जहाजांसाठी या सामुद्रधुनीतून जातो. या निर्णयाबाबत अनिश्चितता कायम आहे, ते जहाज वाहतुकीवरील आपले नियंत्रण कायम ठेवेल आणि गरज पडल्यास ती पुन्हा बंद करू शकते.

# राज्यातील क्रीडा प्रबोधिनी प्रवेश प्रक्रिया जाहीर; प्रतिभावान खेळाडूंना संधी

**नांदेड** : महाराष्ट्र राज्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडविण्यासाठी क्रीडा व युवक सेवा संचालनालयाच्या अंतर्गत क्रीडा प्रबोधिनी प्रवेश प्रक्रिया २०२६-२७ साठी जाहीर करण्यात आली आहे. प्रतिभावान खेळाडूंना शास्त्रोक्त प्रशिक्षण, निवास, भोजन व अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्याचा या उपक्रमाचा उद्देश आहे. शिवछत्रपती क्रीडापीठ, म्हाळुंगे बालेवाडी, पुणे यांच्या अंतर्गत राज्यातील ९ ठिकाणी क्रीडा प्रबोधिनी कार्यरत असून पुणे, कोल्हापूर, ठाणे, अमरावती, अकोला, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि गडचिरोली येथे प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे.या प्रबोधिनींमध्ये ज्युदो, जिम्नॅस्टिक्स, हाकी, शुटिंग, फुटबाल, जलतरण, अथलेटिक्स, कुस्ती, बॅडमिंटन, आर्चरी, हॅंडबाल, टेबल टेनिस, वेटलिफ्टिंग, ट्रायथलान, सायकलिंग आणि बाक्सिंग अशा १६ क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण दिले जाते. प्रवेश प्रक्रिया दोन टप्प्यांत होणार आहे सरळ प्रवेश (५० ) आणि खेळनिहाय कौशल्य चाचणी (५० ). राज्य व राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी असलेल्या तसेच १९ वर्षांखालील खेळाडूंना सरळ प्रवेशाची संधी मिळणार आहे, तर इतरांसाठी कौशल्य चाचणी घेण्यात येईल. याशिवाय निवड झालेल्या खेळाडूंची वैद्यकीय तपासणीही अनिवार्य असेल.जिल्हास्तरावर नोंदणीची अंतिम तारीख २२ एप्रिल २०२६ असून संबंधित अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, नांदेड येथे सादर करावेत. तसेच ऑनलाइन नोंदणीसाठी २३ एप्रिल २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.

# केंद्रीय कर्मचा-यांसाठी आनंदाची बातमी, डीए वाढला

## मंत्रिमंडळाचे शिक्कामोर्तब, किती वाढणार सॅलरी?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** केंद्रीय कर्मचा-यांसाठी एक आनंदाची बातमी समोर येत आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्रीय सरकारी कर्मचा-यांच्या महागाई भत्त्यात २ टक्क्यांनी वाढ करण्यास मंजुरी देण्यात आली. यापूर्वी ऑक्टोबरमध्ये महागाई भत्ता ५५ टक्क्यांवरून ५८ टक्के करण्यात आला होता. ती वाढ १ जुलै २०२५ पासून लागू करण्यात आली होती आणि नंतर थकबाकीसह त्याची अंमलबजावणी झाली, ज्याचा फायदा कर्मचारी आणि पेन्शनधारकांना मिळाला होता. सरकार कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी डीए आणि डीआर वर्षातून दोनदा, जानेवारी आणि जुलैमध्ये सुधारित करते. महागाईचा प्रभाव कमी करून कर्मचा-यांची क्रयशक्ती आणि राहणीमान टिकवून ठेवणं हा या बदलांचा मुख्य उद्देश असतो. महागाई भत्ता हा वाढत्या किमतींनुसार पगार आणि पेन्शनमध्ये समतोल राखण्यासाठी दिला जाणारा मूळ पगाराचा एक ठराविक हिस्सा असतो.




**८ व्या वेतन आयोगासाठी कर्मचारी संघटनांच्या मागण्या**

महागाई भत्त्यातील ही वाढ अशा वेळी झाली आहे जेव्हा विविध कर्मचारी संघटना प्रस्तावित ८ व्या वेतन आयोगांतर्गत वेतन संरचनेत मोठ्या बदलांची मागणी करत आहेत. 'नॅशनल कौन्सिल-जाइंट कन्सल्टेटिव्ह मशिनरी'नं सादर केलेल्या निवेदनात ३.८३ च्या हायर फिटमेंट फॅक्टरची मागणी केली आहे. यामुळे किमान मूळ वेतन १८,००० रुपयांवरून थेट ६९,००० रुपयांपर्यंत वाढू शकतं.

याव्यतिरिक्त, वेतन गणनेसाठी 'कुटुंब' या व्याख्येचा विस्तार करून त्यात आश्रित पालकांचा समावेश करावा आणि वेतनातील असमानतेवर मर्यादा घालावी, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. तसंच उच्च वेतनवाढ आणि महागाईशी निगडित भत्त्यांचा प्रस्तावही मांडला आहे.

**मंत्रिमंडळानं इतर काही महत्त्वाच्या निर्णयांनाही मंजुरी दिली**

सावरेन मेरिटाइम फंडः भारतीय ध्वज असलेल्या, भारताकडे येणा-या आणि भारतातून जाणा-या जहाजांना स्थिर व परवडणारे विमा संरक्षण देण्यासाठी १३,००० कोटी रुपयांच्या 'सावरेन मेरिटाइम फंड'ला मंजुरी देण्यात आली आहे.

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना ( ही योजना २०२८ पर्यंत वाढवण्यात आली असून त्यासाठी ३,००० कोटी रुपयांची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे.

# वीज दरात झाली वाढ, आता सर्वसामान्यांचे बजेट कोलमडणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** कर्नाटकमध्ये, वीज कंपन्यांना झालेला तोटा भरून काढण्यासाठी सरकारने विजेचे दर वाढवले आहेत. बंगळूरमधील ग्राहकांना याचा सर्वाधिक फटका बसणार आहे, त्यांना प्रति युनिट ५६ पैशांचा अतिरिक्त आकार आकारला जाईल. ही वसुली १ मे २०२६ पासून हप्त्यांमध्ये सुरू होईल. काही शहरांमधील ग्राहकांना थोडाफार दिलासा मिळेल. वीज कंपन्यांचे नुकसान भरून काढण्यासाठी हे सर्व केले जात आहे. आयोगाच्या गणनेनुसार, एकट्या बेस्कामला अंदाजे २,०६८ कोटींचे नुकसान झाले आहे आणि आता हे नुकसान थेट जनतेच्या खिशातून वसूल केले जाईल. दिलासादायक बाब ही आहे की, ही वसुली एकाच वेळी न करता, पुढील वर्षभर मासिक हप्त्यांमध्ये केली जाईल. याचा अर्थ, पुढच्या महिन्यापासून बिलावर 'ट्रू-अप चार्जेस' दिसू लागतील. हे नवीन वीज दर संपूर्ण कर्नाटकात वेगवेगळे आहेत. बंगळूर (बेस्काम) आणि म्हैसूर (सीईएससी) यांच्या अखत्यारीतील भागांमध्ये दर वाढले असले तरी, राज्यातील काही शहरांसाठी दिलासादायक बातमी आहे. जर तुम्ही हेस्क?म, गेस्क?म किंवा मेस्क?मच्या अखत्यारीत राहत असाल, तर तुम्हाला तुमच्या वीज बिलांमध्ये काहीसा दिलासा मिळेल, कारण या कंपन्यांना ग्राहकांना पैसे परत करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे बंगळूर आणि म्हैसूर भागातील ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडणार असला तरी, उत्तर कर्नाटक आणि किनारपट्टी भागातील ग्राहकांना माफक दिलासा मिळेल.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## नामंजूर विधेयक

वरिष्ठ कायदेमंडळात महिलांचे ३३ टक्के प्रतिनिधित्व राखीव ठेवण्यासाठी मांडलेल्या विधेयकाला लोकसभेत बहुमत मिळाले, पण घटनादुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यात कमी पडल्याने ते पुन्हा एकदा बारगळले. महिलांना राज्याच्या आणि देशाच्या कायदेमंडळात ३३ टक्के आरक्षण देऊ करणारे पहिले विधेयक गेल्या शतकात एच. डी. देवेगौडा पंतप्रधान असताना मांडले गेले. त्यानंतरही तसे प्रयत्न झाले. पण, त्यात नेहमीच काही ना काही तांत्रिक कारणे काढून खोडा घातला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०२३ मध्ये मांडलेल्या 'नारीशक्ती वंदन अधिनियम २०२३' या विधेयकाला मात्र एकमताने मंजुरी मिळाली होती. त्या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी यावेळी ही एकत्रित विधेयक मांडली जाणार होती. त्यासाठी सरकारने हे विशेष अधिवेशन बोलावले होते. सरकारने महिला आरक्षण संविधान दुरुस्ती विधेयक आणि मतदार संघ फेररचना, तसेच केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) ही दोन साधी विधेयक परस्परांशी सांगड घालून मांडल्याने विरोधकांचा सरकारच्या या पावलाला विरोध होता. महिलांच्या आरक्षणासंदर्भातील विधेयकाला आमचा विरोध नाही; पण त्याआडून सरकार अन्य दोन विधेयक मांडत आहे. ती मंजूर झाली, तर देशात उत्तर आणि दक्षिण अशी दुफळी तयार होईल. प्रगत राज्यांचा त्यात तोटा होईल. विकसित, अर्ध विकसित किंवा विकासोन्मुख राज्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येत वाढ झाली, तर त्यांचे राज्य विकसित, प्रगत राज्यांवर अधिक घट्ट होईल, अशी भीती विरोधकांकडून मांडली जात होती. महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय धोरणांसोबत राहात असल्याने मोदी सरकारच्या या विधेयकांना महाराष्ट्रातून पक्षीय धोरणातून विरोध झाला; पण राज्य म्हणून कुठेही विरोधाचा सूर उमटला नाही. दक्षिणेत मात्र पक्षांच्या सीमा ओलांडून राज्य म्हणून आक्षेप नोंदवले गेले. जनगणनेच्या आधारावर होणाऱ्या मतदार संघांच्या परिसीमनात आपल्यावर अन्याय होऊ नये, भविष्यात आपला राजकीय तोटा होऊ नये, यासाठी दक्षिणेतल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीत असलेल्या मुख्यमंत्र्यांनीही गेले वर्षभर कुरकुर चालवली होती. चंद्राबाबू नायडू यांनी तर अधिक अपत्य असल्यास विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. दक्षिणेतील पक्ष आणि नेत्यांचा लोकसंख्येवर आधारित परिसीमनाला, जातगणना न झालेल्या २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याला विरोध होता; तर उत्तरेकडील पक्ष, नेत्यांनी २०२६ च्या जातगणनेनंतर महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक आणल्यास मागास, अतिमागास, आदिवासी महिलांना अधिक न्याय मिळेल, असा मुद्दा पुढे केला होता. समाजवादी पार्टीने नेहमीप्रमाणे अल्पसंख्याक; म्हणजे मुस्लीम महिलांचा आरक्षण विधेयकात स्वतंत्र विचार व्हावा, अशी भूमिका मांडली होती. पण, त्याला काही अर्थ नव्हता. कारण, धर्माच्या आधारे आरक्षणाची तरतूद घटनेत नाही, हे त्यांनाही माहीत आहे. आपला मतदार डोळ्यांपुढे ठेऊन केलेली ही मागणी निरर्थक होतीच; पण त्याहीपेक्षा समाजमनात नको ते विष कालवणारी, निषेधार्ह होती. महिला आरक्षणासाठी घटनेत १३१ वी दुरुस्ती सुचवणारे विधेयक दोन तृतीयांश संख्याबळाअभावी पराभूत झाल्यानंतर सरकारने मतदारसंघ फेररचना आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयक मागे घेतली. ती मताला टाकलीच नाहीत. साध्या बहुमताने ती सहज मंजूर झाली असती; पण ती स्वतंत्रपणे मंजूर होण्याला काही अर्थ नव्हता. त्यातून आणखी वादाचे मुद्दे पुढे आले असते. महिलांना ३३ टक्के आरक्षण दिल्यास पुरुष लोकप्रतिनिधींच्या तेवढ्या जागा कमी झाल्या असत्या. या प्रक्रियेत आपल्या जागा जातील, अशी भीती बऱ्याच दिग्गजांना, पुरुषी मानसिकतेच्या राजकीय वर्तुळाला आहे, हे ओळखून त्यांची भीती घालवण्यासाठी सध्याच्या लोकसभेच्या ५४३ जागांत ५० टक्के भर घालून महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्याची शक्कल सरकारने लढवली होती. पण, विरोधकांचा त्यालाही विरोध होता. वास्तविक मुद्द्यांवर विरोध करता येत नाही हे स्पष्ट असल्याने विरोधकांनी सरकारच्या हेतूवर शंका घेऊन नेहमीप्रमाणे काल्पनिक विरोध सुरू केला होता. सरकारच्यावतीने प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात जागांमध्ये कशी वाढ होईल, याचा तपशील आकडेवारीसह दिला गेला होता. पण या ५० टक्के वाढीचा उल्लेख विधेयकाच्या प्रस्तावात स्पष्टपणे नाही, म्हणजे यामागे सरकारची काहीतरी चाल आहे, असा संशय व्यक्त करून विरोधकांनी आपला विरोध कायम ठेवला. लोकसभेतील चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसचे नेते वेणुगोपाल यांना 'मी आत्ताच्या आत्ता सरसकट ५० टक्क्यांचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करतो. तुम्ही सर्व विधेयक मंजूर करण्याची हमी द्या', असे आव्हान दिले, तेव्हा विरोधी बाकांवर भीषण शांतता पसरली होती. काळंबेरे सरकारच्या नाही, विरोधकांच्याच मनात आहे, हे त्यावेळी स्पष्ट झाले! २०११ नंतर देशाच्या लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणावर झाले आहे. त्यामुळे, मतदारसंघांचा तोल पूर्णपणे ढळला आहे. मतदारसंघांतील लोकसंख्येत फार मोठी तफावत असू नये, असे घटनेत नमूद आहे. तरीही १९७१ च्या जनगणनेच्या आधारावरील मतदारसंघांतच आज निवडणुका होत आहेत. महिला आरक्षणाच्या निमित्ताने त्यातही तात्पुरती दुरुस्ती होईल, २०१९ च्या निवडणुका त्या आधारे घेता येतील; त्यानंतरच्या निवडणुका आता सुरू झालेल्या जनगणनेच्या आधारावर घेता येतील. या जनगणनेत जातगणनाही होणार असल्याने २०३४ च्या निवडणुकात या जातगणनेवर आधारित राखीव मतदारसंघ ठरतील. महिला आरक्षण आणि जात आरक्षण या दोन्हींचंही प्रतिबिंब २०३४ च्या निवडणुकीत दिसेल. महिलांच्या आरक्षणाला तोपर्यंत तिष्ठत ठेवण्याऐवजी मतदारसंघांत सरसकट ५० टक्के वाढ करून महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यावे आणि मतदारसंघही थोड्या तरी कमी लोकसंख्येचे करावेत, असा सरकारचा प्रयत्न होता. तो आता मागे पडला आहे. ही विधेयक आणण्यामागे राजकारण होते, असा आरोप विरोधी पक्ष करत आहेत. राजकीय व्यवस्थेत राजकारणच करायचे असते, हे विरोधी पक्षांना कळत नाही आणि जमतही नाही हीच आजची देशासमोरची खरी अडचण आहे.

# असा असतो दिव्याखाली अंधार!

**कसलेही नियोजन न करता अपारंपरिक ऊर्जेविषयी केलेला प्रचार व प्रसार कसा अंगाशी येऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणून वीज नियामक आयोगाच्या नव्या आदेशाकडे बघायला हवे.**

कसलेही नियोजन न करता अपारंपरिक ऊर्जेविषयी केलेला प्रचार व प्रसार कसा अंगाशी येऊ शकतो याचे उत्तम उदाहरण म्हणून वीज नियामक आयोगाच्या नव्या आदेशाकडे बघायला हवे. दिवसाची वीज दिवसाच वापरा, रात्री त्याचा लाभ घेता येणार नाही असे या आदेशाचे स्वरूप. यामुळे जादा वीजदराच्या त्रासाने अपारंपरिक ऊर्जेकडे वळलेल्या राज्यातील उद्योग व अन्य मोठ्या आस्थापनांचे कंबरडेच मोडले जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

ही ऊर्जा वापरण्यासंदर्भात आयोगाने नव्याने ठरवून दिलेले वेळेचे टप्पे तसेच हीच वीज ग्रीडमध्ये सोडण्यासाठी आकारले जाणारे शुल्क या दोन्ही बाबी नको ती अपारंपरिक ऊर्जा. घेतो आम्ही राज्याची महागडी वीज अशीच भावना विविध आस्थापनांमध्ये निर्माण करणाऱ्या. या नव्या नियमावरून राज्य सरकार आयोगाकडे बोट दाखवत असले तरी तो जारी होताना वीज वितरण कंपनी शांत का बसली? त्याला विरोध का केला नाही? आता ओरड सुरू झाल्यावर पुनर्विचार याचिकेची भाषा सरकार का वापरते आहे असे अनेक प्रश्न आता उपस्थित होतात. याचे उत्तर अयोग्य नियोजनात तर दडले आहेच शिवाय वितरण कंपनीचा तोटा कमी करण्याचा हा डाव नाही ना अशी शंकाही ऊर्जा क्षेत्रात घेतली जाते.

उद्योग व मोठ्या आस्थापनांना अतिशय महागड्या दराने व्यावसायिक वापरासाठी वीज विकणारे राज्य अशी महाराष्ट्राची ओळख सध्या देशभरात आहे. त्यावर तोडगा म्हणून सरकारने याच आस्थापनांना आधी अपारंपरिक ऊर्जेकडे वळवले. तुम्हीच तुमची वीज तयार करा व अतिरिक्त आम्हाला द्या असे या योजनेचे ढोबळ स्वरूप होते. सरकार एवढ्यावरच थांबले नाही तर त्यांनी कृषी व घरगुती क्षेत्रातसुद्धा या ऊर्जेचा जोरदार प्रचार केला. अनेक योजना आणल्या. त्यामुळे झाले असे की सौरऊर्जेचा वापर वाढला.

आजघडीला घरगुती क्षेत्रात म्हणजे प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून १९५० मेगावॅट तर कृषी क्षेत्रात मुख्यमंत्री सौर योजनेतून ४९०० मेगावॅट वीजनिर्मिती होते. या तसेच इतर सौर आस्थापनांमधून तयार झालेली १९ हजार मेगावॅट सौरवीज राज्यात वापरली जाते. परिणामी दिवसा भरपूर वीज उपलब्ध असते. याचा परिणाम सरकारच्या पारंपरिक वीजनिर्मितीवर होतो. तो टाळण्यासाठी हे नवे नियम लागू करण्यात आले का हा यातला कळीचा प्रश्न. आयोगाचा हा




आदेश १० किलोवॅट व त्यापेक्षा जास्त सौरऊर्जा तयार करणाऱ्यांसाठीच आहे. यात घरगुती वापर करणारे नाहीत हे खरे पण, या व्यावसायिक ग्राहकांनी महागड्या विजेपासून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी हा मार्ग स्वीकारला. यात त्यांनी केलेल्या गुंतवणुकीचे काय? या नव्या नियमांमुळे आगीतून फुफाट्यात अशी या साऱ्यांची अवस्था झाली आहे.

मोठ्या आस्थापनांमध्ये दिवसापेक्षा रात्री विजेचा वापर जास्त होतो. उद्योग, हॉटेल्स, रुग्णालये ही त्यातली महत्त्वाची ठिकाणे. त्यांना त्यांनीच तयार केलेली वीज रात्री वापरता येणार नसेल, शिवाय ग्रीडशुल्क म्हणून पैसेही मोजावे लागत असतील तर सौरऊर्जेला प्रोत्साहन या सरकारच्या धोरणातील हेतूच विफल होतो. इतर कोणत्याही राज्यात असा उफराटा नियम नाही. गुजरातसारख्या राज्यात तर अधिकाधिक सवलती दिल्या जातात. मग महाराष्ट्रातच हा प्रकार का? मुळात सौरऊर्जेचा प्रचार करताना त्यातून तयार होणारी अतिरिक्त वीज साठवून ठेवण्याची योजनाही सरकारने हाती घ्यायला हवी होती.

ऊर्जा क्षेत्रात याला 'बॅटरी बँक' म्हणतात. हे काम सरकारने खूप उशिरा हाती घेतले. त्यामुळे हा प्रश्न उद्भवला व सरकारने आयोगाच्या माध्यमातून सौरची निर्मिती करणाऱ्यांवरच कुऱ्हाड चालवली असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे. प्रथमदर्शनी तरी ते रास्त वाटते. या नव्या नियमात आखून दिलेले वेळेचे टप्पेही अनेक प्रश्न उपस्थित करणारे. सकाळी नऊ ते पाच हा टप्पा तर सूर्याचे सकाळी लवकर उगवणे, वीजनिर्मिती सकाळी सातपासून सुरू होणे या वास्तवालाच बेदखल करणारा. ही वीज सूर्यप्रकाशावर अवलंबून आहे याचेही भान हे टप्पे पाडताना ठेवले गेले नाही. यामुळे 'वीज स्वस्त पण सरकारी जाच अधिक' अशी अवस्था निर्मितीकर्त्यांची झाली आहे. अनेक चांगल्या धोरणांचा जाचक नियम व अटी लादून बट्ट्याबोळ कसा करायचा यात सरकारे निपुण असतात. त्याचाच प्रत्यय या नव्या नियमावलीमुळे साऱ्यांना आला आहे. परिणामी स्वस्त व प्रदूषणरहित विजेचे स्वप्न बघणाऱ्या अनेकांना धक्का बसला आहेच शिवाय विजेच्या क्षेत्रातले महागडे राज्य असा लौकिकही महाराष्ट्राने कायम राखला आहे. (साभार लोकसत्ता)

## अक्षयतेचा सुवर्णयोग



वैशाख शुद्ध तृतीया, म्हणजेच अक्षय तृतीया. हिंदू संस्कृतीत अत्यंत शुभ, पवित्र आणि चिरंतन फलदायी मानला जाणारा दिवस. 'अक्षय' म्हणजे कधीही न संपणारे. या दिवशी केलेले दान, जप, तप आणि सदाचार हे अखंड पुण्य देणारे मानले जातात.यंदा हा दिवस अधिकच वैशिष्ट्यपूर्ण ठरतो आहे. कारण याच दिवशी भगवान परशुराम यांची जयंती, समतेचे महान विचारवंत महात्मा बसवेश्वर यांची जयंती, तसेच हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची तिथीनुसार जयंतीही (एकत्र) साजरी होत आहे.भगवान परशुराम हे अन्यायाविरुद्ध उभे राहणाऱ्या शक्तीचे प्रतीक मानले जातात. महात्मा बसवेश्वर यांनी समता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाचा दीप प्रज्वलित केला. तर छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य, शौर्य आणि लोककल्याण यांचे अद्वितीय आदर्श निर्माण केले.

अक्षय तृतीया हा केवळ धार्मिक सण नाही, तर तो नवीन सुरुवातीचा, सद्गुणांचा आणि सकारात्मकतेचा संदेश देणारा दिवस आहे. या दिवशी सुवर्णखरेदी, दानधर्म, नवीन उपक्रमांची सुरुवात यांना विशेष महत्त्व आहे. पण त्याहीपलीकडे जाऊन, या दिवसाचा खरा अर्थ आहे- सद्विचार आणि सत्कर्म यांची अखंड परंपरा जपणे.आजच्या धावपळीच्या जीवनात या चारही महान प्रेरणांचा संगम आपल्याला एकच संदेश देतो;धर्म, समता, पराक्रम आणि सदाचार यांच्या मार्गाने चालल्यासच जीवन खऱ्या अर्थाने 'अक्षय' होते.

**- प्रा.व्ही.व्ही.कोष्टी**


## अक्षय्य तृतीयेचे महात्म्य

पावसाळा तोंडावर घेऊन अक्षय्य तृतीया येते. गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीचे मशागत करण्याचे काम अक्षय्य तृतीयेच्या दिवशी पूर्ण करण्याची प्रथा आहे. या दिवशी मशागत केलेल्या जमिनीतील मृत्तिकेबद्दल कृतज्ञ भाव ठेवून काही शेतकरी पूजन केलेल्या मृतिकेमध्ये आळी घालतात. कोकणात या दिवशी शेतात बियाणे पेरण्याची प्रथा आहे. देशावर नाही. अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर बियाणे पेरण्यास सुरुवात केल्यास त्या बियाणांमधून विपुल धान्य पिकणे व कधीही बियाणाला तोटा पडत नाही. अशी धार्मिक समजूत आहे. महाराष्ट्राच्या कोकण भागात पावसाचे प्रमाण जास्त असल्याकारणाने एकदा पावसाला सुरुवात झाली की, सतत पाऊस पडत राहिल्याने सुपीक जमिनीतील चिकट मातीमध्ये आळी करून बियाणे पेरणी करणे शक्य होत नाही. या दिवशी पितरांचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमेचे पूजन करतात. यादिवशी मातीचे घागर आणून, त्यात पाणी भरू त्यात वळा टाकतात. त्याने या पाण्याला सुगंध येतो. पळसाच्या पानांच्या केलेल्या पत्रावळीवर व द्रोणात खीर, आंब्याचे पन्हे किंवा चिंचोणी, पापड, कुरडया इत्यादी वाहतात. सुगंधित पाण्याने भरलेला घट ब्राह्मणाला दान केला जातो. असे केल्याने पितरांचा आत्मा शांत होतो, असे मानले जाते.

**प्रा. मधुकर चुटे**

# गझलसम्राट सुरेश भट स्मारकासाठी कवी विष्णू सोळंके यांचा यशस्वी संघर्ष

मराठी साहित्यविश्वात काही मागण्या या केवळ प्रशासकीय फायली पुरत्या मर्यादित राहत नाहीत तर त्या एका सांस्कृतिक चळवळीचे रूप धारण करतात. गझलसम्राट सुरेश भट यांच्या स्मारकासाठी उभारलेली मागणी ही अशीच एक चळवळ ठरली आणि तिच्या केंद्रस्थानी होते अमरावतीचे साहित्यिक विष्णू सोळंके.





गेल्या सहा वर्षांचा हा प्रवास केवळ निवेदन देऊन भेटण्याचा किंवा पत्रव्यवहाराचा नव्हता तर तो होता कवी साहित्यिक विष्णू सोळंके यांचे या पाठपुराव्यातील सातत्य, या वयातही अंगी असलेली जिद्द आणि सुरेश भटांच्या कलाकृतिमधून त्यांच्या सहवासातून आलेले साहित्यप्रेम यांचा मिलाफ होय .ते सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. तब्येत व शरीरयष्टी नाजूक साजूक आहे तरी त्यांची या वयातील धावपळ नेत्रदीपक आहे.

१८ जानेवारी २०२० रोजी अमरावतीत हनुमान व्यायाम प्रसारक मंडळातील एका जाहीर कार्यक्रमात उपस्थित असलेल्या अनेक साहित्यिकांच्या साक्षीने सुरू झालेली ही लढाई, विविध सत्तांतरांनंतरही थांबली नाही. अमरावती जिल्ह्याच्या तत्कालीन पालकमंत्री यशोमती ठाकूर यांच्यापासून ते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच मंत्री चंद्रकांत पाटील, आमदार रवी राणा, तत्कालीन उपमुख्यमंत्री स्व.अजित पवार,आ. संजय खोडके, आ. सुलभाताई खोडके, माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांच्यापर्यंत ही मागणी सातत्याने पोहोचत राहिली.

या संपूर्ण प्रक्रियेत एक गोष्ट ठळकपणे दिसून येते ती म्हणजे लोकशाही प्रक्रियेत सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्यास, सामान्य माणसाचाही आवाज शासनापर्यंत पोहोचू शकतो. कवी विष्णू सोळंके यांनी नेमके हेच करून दाखवले याचा मी साक्षीदार आहे.त्यांनी केवळ सुरेश भट यांच्या स्मारकाची मागणीच केली नाही, तर १५ एप्रिल हा दिवस 'मराठी गझल दिवस' म्हणून जाहीर करण्याचीही मागणी पुढे नेली. ही मागणी म्हणजे मराठी गझल परंपरेचा सन्मान करण्याचा व्यापक दृष्टिकोन होता.

या सर्व प्रयत्नांचा कळस ११ एप्रिल २०२६ रोजी अमरावतीच्या सांस्कृतिक भवनात पाहायला मिळाला. गझल नवाज भीमराव पांचाळे यांच्या कार्यक्रमात, पालकमंत्री व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुरेश भट यांच्या स्मारकाच्या उभारणीची जाहीर घोषणा केली. ही घोषणा केवळ एक प्रशासकीय निर्णय नव्हता तर ती मराठी साहित्याच्या सन्मानाची अधिकृत नोंद होती. याचे श्रेय देखील अमरावती इलेक्ट्रॉनिक्स मीडियाच्या पत्रकारांना दिल्या गेले पाहिजे कारण त्यांनी हा कार्यक्रम भीमराव पांचाळे यांच्या अमृतमहोत्सवी वर्षात आयोजित केला नसता तर ही मागणी आपसूकच पुढे ढकलल्या गेली असती असे मला वाटते. त्यामुळे त्यांचाही या यशात वाटा आहे असे म्हणावे लागेल.

अमरावती हा जिल्हा साहित्यिक, कवी, कलाकारांचा वारसा जपणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. अशा भूमीत सुरेश भट यांचे स्मारक उभारले जाणे म्हणजे त्या वारशाचे जतन आणि पुढील पिढ्यांसाठी प्रेरणा देणारा ठेवा ठरेल. मात्र, या निर्णयामागील खरी ताकद ओळखणे तितकेच महत्त्वाचे आहे.आज या यशाचे श्रेय घेण्यासाठी अनेक जण पुढे येतील, हे वास्तव नाकारता येणार नाही. पण गेल्या अनेक वर्षांपासून अखंडपणे प्रयत्न करणाऱ्या कवी विष्णू सोळंके यांचे योगदान दुर्लक्षित करता येणार नाही. त्यांच्या सोबत मिशन आय ए एस चे प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, गझलकार प्रा.अरुण सांगोळे यांसारख्या अनेक सहकाऱ्यांची साथही या प्रवासात मोलाची ठरली.

यामध्ये हा प्रसंग एक महत्त्वाचा संदेश देतो की सांस्कृतिक प्रश्नांसाठी समाजाने पुढाकार घेतला, तर शासनालाही निर्णय घ्यावे लागतात. आणि त्या प्रक्रियेत एखादा सामान्य कार्यकर्ता देखील परिवर्तनाचा केंद्रबिंदू ठरू शकतो जो कवी विष्णू सोळंके यांच्या रूपाने केंद्रित झाला.स्व.सुरेश भट यांचे स्मारक उभारण्याचा निर्णय हा निश्चितच स्वागतार्ह आहे. परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे, या निमित्ताने मराठी गझल परंपरेचे जतन, संवर्धन आणि प्रसार यासाठी व्यापक धोरणात्मक पावले उचलली गेली पाहिजेत. ही पावले उचलताना लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासन स्तरावरील विविध समित्या, कार्यगट यांचेमध्ये स्थानिक साहित्यिक, पत्रकार, रसिकजन यांचा समावेश केल्यास सुरेश भटांचे स्मारक अधिक दैदीप्यमान होऊ शकते असे मला वाटते. कोणतेही स्मारक हे केवळ दगड-मातीचे नसते तर ते विचारांचे, संस्कृतीचे आणि प्रेरणेचे प्रतीक असते.

विष्णू सोळंके यांच्या संघर्षाने हे अधोरेखित केले आहे की अंगी सातत्य आणि प्रामाणिकपणा असेल, तर कोणतीही लढाई जिंकता येते.आणि म्हणूनच, हे यश केवळ एका व्यक्तीचे नसून, संपूर्ण मराठी साहित्यविश्वाचे आहे.साहित्यकार,कवी माझे साहित्य मित्र विष्णू सोळंके यांच्या कार्याला सलाम.

**रवींद्र दांडगे**
अमरावती.

## संवाद

### महिला आरक्षण की राजकारणाचा खेळ?

२०२३ मध्ये जेव्हा महिला आरक्षण विधेयक आले, तेव्हा देशभरातून त्याचे स्वागत झाले. सर्व पक्षांनी एकमताने पाठिंबा दिला आणि महिलांना ३३% आरक्षण देण्याचा मार्ग मोकळा झाला. पण,त्याच महिला आरक्षणाच्या नावाखाली मतदारसंघांची फेररचना (delimitation) आणि जागा वाढवण्याचा अजेंडा जोडला गेला.म्हणजे सरळ महिला सक्षमीकरण नव्हे, तर राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न? जर खरंच महिलांना न्याय द्यायचा होता,तर सरळ ३३% आरक्षण लागू का केले नाही? त्यासाठी नवीन अटी, नवीन गणित, आणि नवीन राजकारण का?जनतेला सगळे कळते.महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली सत्ता टिकवण्याचा खेळ चालणार नाही. महिला आरक्षण हवेच पण प्रामाणिकपणे, कोणत्याही राजकीय अटींशिवाय!

**मिलिंद आरोलकर**

### नवीन ट्रेन कधी सुरू होईल?

रेल्वे विभागाने १७६६७/१७६६८ नांदेड एलटीटी नांदेड मार्गे वाशिम अकोला२०२३ मध्ये ही ट्रेन सुरू करण्याची घोषणा केली होती. परंतु काही कारणास्तव ती सुरू झालेली नाही. रेल्वे विभागाने ही ट्रेन लवकरात लवकर सुरू केल्यास हिंगोली आणि वाशिमच्या रहिवाशांसाठी ती खूप उपयुक्त ठरेल. आम्हाला आशा आहे की रेल्वे विभाग प्रवाशांच्या समस्या समजून घेईल आणि ही ट्रेन लवकरच सुरू करेल.

राजेश पी. करिया
अकोला

### राजकीय रणनीती आणि विरोधी पक्षांची कोंडी

नारीशक्ती वंदन अधिनियम म्हणजेच महिला आरक्षण विधेयक हे तत्वतः मान्य झालेले असले, तरी त्याच्या प्रत्यक्ष अंमलबजावणी साठी संसदेत मांडण्यात आलेली प्रक्रिया अत्यंत चर्चेची ठरली आहे. या अधिनियमाशी संबंधित १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक २०२६, सभागृहात चर्चेसाठी मांडण्यात आले होते.सभागृहात यावर प्रदीर्घ चर्चा झाल्यानंतर १३१ व्या संविधान दुरुस्तीवर मतदान घेण्यात आले.एकूण उपस्थित मतदार: ५२८विधेयकाच्या बाजूने (होय): २९८ मतेविधेयकाच्या विरोधात (नाही): २३० मते विधेयकाला एकूण मतदानापैकी ५० टक्क्यांहून अधिक मते मिळाली, तरीही हे घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर झाले. याचे मुख्य तांत्रिक कारण म्हणजे, भारतीय संविधानातील नियमांनुसार कोणतीही घटनादुरुस्ती मंजूर होण्यासाठी सभागृहात उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी २/३ (दोन तृतीयांश) बहुमत मिळणे अनिवार्य असते. ५२८ सदस्य उपस्थित असताना हे विधेयक मंजूर होण्यासाठी ३५२ मतांची आवश्यकता होती, मात्र बाजूने केवळ २९८ मते पडल्याने हे विधेयक लोकसभेत पास होऊ शकले नाही.

वरवर पाहता हे मोदी सरकारसाठी धक्का असल्याचे चित्र निर्माण करण्यात आले असले, तरी यामागील राजकीय रणनीती अत्यंत खोलवर विचार करून आखलेली दिसते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांनी हे विधेयक मांडून विरोधी पक्षांना त्यांची भूमिका लोकांसमोर स्पष्ट करण्यास भाग पाडले. या मतदानातून एक गोष्ट प्रकर्षाने समोर आली की, विरोधी पक्षांना महिलांना आरक्षण देण्याबाबत खरोखरच स्वारस्य नाही.येणाऱ्या निवडणुकीत भाजप हाच मुद्दा जनतेच्या दरबारात घेऊन जाईल.'आम्ही महिलांना अधिकार देऊ इच्छित होतो, पण विरोधकांनी ते रोखले,' असा आक्रमक प्रचार जेव्हा सत्ताधारी पक्षाकडून केला जाईल, तेव्हा त्याला उत्तर देताना विरोधी पक्षांची मोठी पंचाईत होणार आहे. जनतेला तोंड देताना विरोधकांकडे ठोस समर्थनाचा अभाव असेल, हीच या रणनीतीतील सर्वात मोठी जमेची बाजू आहे.

**अविनाश देशपांडे**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखय

# ‘खाकी’च्या छत्राखाली झुलीत जुगारांचा महाबाजार !

## आमदार, एसपींच्या सूचनांनाही ठेंगा!



**जनमाध्यम प्रतिनिधी**

आकपुरीहून स्थलांतर करून ‘झुली’त २४ तासांचा आंतरजिल्हा जुगार अड्डा, स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर संशय

यवतमाळ - जिल्ह्यात अवैध व्यवसायांवर कडक कारवाईचे आदेश देण्यात आले असताना, प्रत्यक्षात मात्र काही ठिकाणी जुगार माफियांना ‘खाकी’चा मूक आशीर्वाद मिळत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. वडगाव जंगल पोलीस ठाण्याच्या हद्दीतील आकपुरी परिसरात सुरू असलेला जुगार अड्डा गावकऱ्यांच्या विरोधानंतर बंद होण्याऐवजी आता झुली येथील शिवारात अधिक ‘भव्य’ स्वरूपात सुरू झाल्याची माहिती समोर आली आहे.

आ. बाळासाहेब मांगूळकर यांनी अवैध व्यवसाय विरोधात पोलीस प्रशासनाकडे तक्रार करून अड्डे बंद करण्याची मागणी केली होती. काही ठिकाणी कारवाई झाली असली तरी झुली-आकपुरी परिसरात मात्र माफियांची मुजोरी, दादागिरी वाढल्याचे दिसून येते. लोकप्रतिनिधींच्या सूचनांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आकपुरीहून झुलीकडे ‘शिफ्ट’; जुगाराला आंतरराज्य स्वरूप आकपुरीतील विरोधानंतर जुगार अड्डा झुली येथील शेतात हलवण्यात आला असून, येथे २४ तास मोठ्या प्रमाणात जुगार सुरू असतो. यवतमाळ, वर्धा, नागपूर, पांढरकवडा, राळेगाव, घाटंजी तसेच तेलंगणातील आदिलाबाद, किनवट येथूनही खेळाडू येथे पोहोचत आहेत. दलाला मार्फत खेळाडू आणून मोठ्या रकमेच्या बोली लावल्या जात असल्याचे समोर आले आहे.दलालांचे जाळे, ‘पॅकेज’सह व्यवस्था प्रत्येक खेळाडू मागे हजारोंचे कमिशन, वाहन व्यवस्था, जेवण, मद्य अशा सर्व सोयी अड्ड्यावर उपलब्ध करून दिल्या जातात. “खेळाडू सुरक्षित” अशी अनधिकृत हमी देत हा व्यवसाय खुलेआम सुरू असल्याने कायद्याची भीती उरलेली नाही, असे चित्र आहे.

### प्रशासन गप्प का? ‘साटेलोटे’चा संशय

जिल्हा पोलीस अधीक्षकांनी अवैध धंद्यां विरोधात कठोर भूमिका घेतली असताना स्थानिक पोलीस आणि एलसीबी पथकाकडून कारवाई होत नसल्याने ‘हतबलता की साटेलोटे?’ असा सवाल उपस्थित होत आहे. पत्रकारांनी या मुद्द्यावर चर्चा करूनही ठोस कारवाई न झाल्याने संताप वाढत आहे. स्थानिक ठाणेदार यांच्याकडे याबाबत माहिती असूनही “पाहतो, सांगतो” अशी भूमिका घेतली जात असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. परिणामी ग्रामीण भागातील तरुण चुकीच्या मार्गाकडे वळत असून गावांची प्रतिमा मलिन होत आहे. आता जिल्हा पोलीस अधीक्षकांनी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

"आमदारांच्या तक्रारी नंतरही जर अड्डे बंद होत नसतील, तर सामान्य नागरिकांनी न्याय कुणाकडे मागायचा? हा प्रकार म्हणजे प्रशासनाचे अपयश आहे." **– संतप्त नागरिक, झुली–आकपुरी परिसर**

# गादी पिंजनालयाला भीषण आग ! लाखोंचे नुकसान

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – शहरातील अप्सरा टॉकीजच्या मागील भागात असलेल्या गादी पिंजनालयाला शनिवारी दुपारी सुमारे २ वाजताच्या सुमारास भीषण आग लागली. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. सदर पिंजनालयाचे मालक अब्दुल नासिर अब्दुल रऊफ असून, पिंजनालयात मोठ्या प्रमाणात रुई (कापूस) आणि मशिनरी साठवलेली होती. त्यामुळे आग अत्यंत वेगाने पसरली आणि काही क्षणांतच तिने रौद्र रूप धारण केले. आगीचा आणि धुराचे मोठे लोट परिसरात पसरल्याने नागरिकांची एकच धावपळ उडाली.

घटनेची माहिती मिळताच नगर परिषदेची अग्निशमन दलाची गाडी घटनास्थळी दाखल झाली.त्यांनी आगीवर नियंत्रण मिळविण्याकरिता सर्व प्रकारचे प्रयत्न सुरू केले. अग्निशमन दलाच्या सर्व कर्मचाऱ्यांनी आगेवर नियंत्रण मिळवले मात्र कारखान्यामध्ये असलेल्या कापूस तथा इतर साहित्य वाचविण्याचा प्रयत्न केला मात्र आज मोठ्या प्रमाणात पसरणे येथील सर्व वस्तूना आगेच्या विळख्यात घेतल्याने मोठे नुकसान झाले. त्यानंतर पाण्याच्या फवाऱ्यांच्या सहाय्याने आग विझवण्याचे प्रयत्न सुरू करण्यात आले. आगीच्या ठिकाणी आजूबाजूला दाट नागरी वस्ती असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली होती. आग इतर घरांपर्यंत पोहोचण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, अग्निशमन दलाने अथक प्रयत्न करत आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने आगीवर नियंत्रण मिळवले. त्यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. या आगीत पिंजनालयातील मशिनरी, रुई,कापड व इतर साहित्य जळून खाक झाले असून, लाखो रुपयांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाल्याची माहिती समोर आलेली नाही. घटनेचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, संबंधित यंत्रणेकडून पुढील तपास सुरू आहे.

# दहावी सीबीएसई परीक्षेत चिन्मयी बावनथडे यशस्वी

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - सेन्ट अलॉयसियस इंग्लिश मिडीयम स्कूल, यवतमाळ येथील विद्यार्थिनी चिन्मयी मनोज बावनथडे हिला सीबीएसई इयत्ता दहावीच्या परीक्षेत ९४% गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

वडिलांच्या निधनानंतर अत्यंत कठीण परिस्थितीतही चिन्मयी नी चिकाटी व जिद्दीजोरावर अभ्यास करून हे यश संपादन केले. तिच्या या यशामुळे ती इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरली आहे. आपल्या यशाचे श्रेय चिन्मयी ने शाळेच्या मुख्याध्यापिका फातिमा फर्नांडिस वर्गशिक्षक तसेच



आपल्या आई संध्या मनोज बावनथडे यांना दिले आहे.

कठीण काळात आईने दिलेल्या प्रेरणा व पाठिंब्याबद्दल तिने विशेष कृतज्ञता व्यक्त केली. तिच्या या यशामुळे कुटुंब व सेन्ट अलॉयसियस इंग्लिश मिडीयम स्कूल, यवतमाळ यांचा अभिमान वाढला आहे.

# • वेचक



## डॉ. बाबासाहेबांना एका समाजापुरते मर्यादित करू नका : प्रा. सैय्यद सलमान

यवतमाळ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 व्या जयंतीनिमित्त समता नगर, यवतमाळ येथे वैचारिक जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कांबळे सर होते, तर मुख्य वक्ते म्हणून पुसद येथील युवा व्याख्याते व संत साहित्याचे अभ्यासक प्रा. सैय्यद सलमान सर उपस्थित होते. “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची कल्याणकारी राज्याची संकल्पना” या विषयावर त्यांनी प्रभावी व्याख्यान दिले. आपल्या भाषणात प्रा. सलमान सर यांनी संत साहित्याचा आधार घेत समाजात बंधुभाव, राष्ट्रीय एकात्मता आणि सद्भावना वाढविण्याची गरज अधोरेखित केली. ते म्हणाले की, “डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना कोणत्याही एका समाजापुरते मर्यादित ठेवणे चुकीचे आहे. त्यांचे कार्य सर्व समाज, सर्व धर्म आणि सर्व घटकांसाठी प्रेरणादायी आहे.” त्यांनी तरुणांना शिक्षण, संघटन आणि संघर्ष या तत्वांवर चालण्याचे आवाहन केले. यावेळी प्रा. सैय्यद सलमान सर यांना त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याबद्दल सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती, समता नगर यांच्या वतीने करण्यात आले होते. या प्रसंगी परिसरातील नागरिक, विद्यार्थी आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये सामाजिक जाणीव व वैचारिक प्रेरणा निर्माण झाली. शेवटी उपस्थितांनी आयोजकांचे आभार मानत अशा प्रकारचे वैचारिक कार्यक्रम सातत्याने आयोजित करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

## बसस्थानक परिसरात युवकावर चाकूहल्ला

यवतमाळ : येथील बसस्थानक परिसरात एका युवकावर चाकू हल्ला केला. ही गंभीर घटना १४ एप्रिल रोजी बसस्थानकाच्या गेट क्रमांक १ जवळ घडली. ओम नितेश उर्वते (२२) रा. मोहदा ता. पांढरकवडा असे या हल्ल्यात जखमी झालेल्या युवकाचे नाव आहे. ओमचा मित्र कुणाल सहारे रा. मोहदा याच्या सोबत शाहू शेलकर रा. पिंपळगाव आणि मंथन खाते रा. पिंपळगाव या दोन तरुणांचा वाद सुरु होता. त्यांचे भांडण मिटविण्याकरिता ओम हा मध्ये गेला.

## संस्कार केंद्रात अभ्यास व रॅलीतून बाबासाहेबांना अभिवादन”

वरूड – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त कला वाणिज्य महाविद्यालय राळेगाव माजी विद्यार्थी संघटना व राष्ट्रीय युवा संघटन संचालित बाल संस्कार केंद्र वरूड (ज) येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात सकाळी तीन तासांचा अभ्यास उपक्रम घेण्यात आला. अभ्यासादरम्यान महाविद्यालयाचे प्रा. डॉ. विशाल दौलतकर, विनोद दादा देवतळे व सुशील दादा दांडदे यांनी संस्कार केंद्रास भेट दिली. “बाबासाहेबांच्या विद्वत्तापूर्ण कार्याचा आदर्श आजच्या युवकाने घेणे गरजेचे आहे,” असे मत डॉ. दौलतकर यांनी व्यक्त केले. सायंकाळी पाच वाजता मुलांनी गावात रॅली काढली. डफडीच्या कडकडाटात व नाऱ्यांच्या जल्लोषात गावकऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. चौकाचौकात मुलांनी लाठीगाठीचे खेळ सादर केले. सहा वाजता रॅलीचा समारोप झाला. त्यानंतर मुलांनी आपले मनोगत व्यक्त करून महामानवाला अभिवादन केले. ओम वाघाडे, प्रेम आडे, पूर्वी राऊत, सुहानी मेश्राम, आराध्या मेश्राम, प्रणाली मडावी यांनी आपले विचार मांडले. प्रमुख वक्ते प्रा. आदिनाथ कडू यांनी बाबासाहेबांचे विचार मुलांमध्ये पेरण्याचा प्रयत्न केला. प्रमुख पाहुण्या ज्योत्स्ना ताई उईके यांनी युवकांनी समाजासाठी एकजुटीने काम करावे, असे प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता मेश्राम यांनी केले तर आभार प्रदर्शन आकांशा आडे यांनी केले. संध्याकाळी सात वाजता मुलांनी “खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे” ही प्रार्थना म्हटली. त्यानंतर खेळ खेळून राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला. संपूर्ण कार्यक्रमाची रूपरेषा संस्कार केंद्र वरूड संचालक प्रा. पंकजभाऊ आत्राम यांनी आखली. कार्यक्रम यशस्वी पार पडावा यासाठी सुमित वाघाडे, अनिकेत मेश्राम, विकास सुरपाम, हर्षल नेहारे, रोहन आडे, ओम पवार, जगदीश नेहारे, राजेश आडे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बुद्ध,भीम गीताच्या सुरेल गायनाने प्रबोधनपर्वाची सुरुवात

## विचारमंचावर उपस्थित मान्यवरांचा भारतीय संविधान देऊन सत्कार!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद : प्रज्ञासूर्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती पुसद प्रबोधन पर्व 2026 यांच्यावतीने गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी गायनाचे व प्रबोधनाचे चार दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पहिले पुष्प दिनांक 16 एप्रिल 2026 रोजी राहुल तायडे प्रस्तुत:भीमगर्जना बुद्ध,भीम गीताचा बहारदार आर्केस्ट्रा अमरावती त्यांच्या गीत गायनाने उद्घाटनाला सुरुवात करण्यात आली. "कष्ट केले त माझ्या भिमाने जाती जाती त वाटू नका रे" अशा बाबासाहेबांच्या जीवनावरील गीत सादर करून स्रोत्याचे व समाज बांधवाचे मन जिंकले. या कार्यक्रमाचे उद्घाटन बुद्धधम्म गुरु भन्ते आर्याजी (बोरी खुर्द) पुसद यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आले. यानंतर विचार मंचावर उपस्थित असलेले आमंत्रित मान्यवर त्यांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सर्वांनी अभिवादन केले. यानंतर सम्राट अशोक महिला मंडळ हर्षी व पारमिता महिला मंडळ महावीर नगर पुसद यांनी संयुक्तपणे बुद्ध वंदना घेऊन पुढील कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रबोधनपर्व समिती 2026 चे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी आपल्या प्रास्ताविकेत म्हटले की आम्ही सर्व जाती,धर्म,पंथाच्या लोकांना घेऊन डॉ.बाबासाहेब आंबेडकर 135 वी जयंती व महात्मा ज्योतिराव फुले यांची 199 वी जयंती साजरी करत आहो या कामाला सर्व सामाजिक संघटना समाज बांधव तसेच चळवळीतील अनेक मान्यवरांनी आम्हाला सहकार्य केले त्यामुळे आम्ही हा कार्यक्रम राबविण्यात यशस्वी झालो तसेच उपस्थित समाज बांधव व विचारमंचावरील मान्यवरांचे आभार सुद्धा व्यक्त करून सर्वांना डॉ बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंतीच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विठ्ठलराव खडसे शिक्षण सभापती न.प.पुसद हे होते. विशेष उपस्थितीमध्ये..डॉ.कल्याण साखरकर, पोलीस निरीक्षक पुसद सेवानंद वानखेडे, प्रा. अनिल काळबांडे ॲड.विश्वास भवरे, इंजिनीयर अन्वर अली अध्यक्ष मिजान अर्बन बिनव्याजी पतसंस्था पुसद, डॉ.प्रशांत वासनिक, राजु दुधे माजी सभापती न.प.पुसद, सुधीर देशमुख प्रदेश कार्याध्यक्ष संभाजी ब्रिगेड, संतोष सुरवाडे राज्य प्रशिक्षक महासचिव बामसेफ, दीपक काळे गटनेता न.प.पुसद, दिलीप कोलेवाड राज्य कार्याध्यक्ष महसूल कर्मचारी संघटना इत्यादी विचारमंचावर उपस्थित मान्यवरांना भारतीय संविधानाची प्रत देऊन सत्कार करण्यात आला.

# पंच परिवर्तनातून आदिवासी विकासाला गती !

## आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी साहित्य

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ – आदिवासी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी ‘पंच परिवर्तन’ ही पाच सूत्रे स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले असून, आगामी शैक्षणिक सत्रापासून सरकारी आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी गणवेश व संपूर्ण शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती आदिवासी विकास मंत्री प्रा.अशोक उइके यांनी दिली.

स्थानिक विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत आदिवासी आघाडीचे प्रदेशाध्यक्ष डॉ.देवराव होली यांनी सांगितले की, १५ नोव्हेंबर रोजी भगवान बिरसा मुंडा यांची १५० वी जयंती ‘आदिवासी अभिमान दिन’ म्हणून देशभरात साजरी करण्यात येणार आहे. या निमित्ताने कुटुंब प्रबोधन, पर्यावरण संरक्षण, सामाजिक सलोखा, नागरिक कर्तव्य आणि आत्म-जागरूकता या ‘पंच परिवर्तन’ सूत्रांवर विशेष भर देण्यात येणार असून, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत हा संदेश पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाईल. यावेळी मंत्री उइके यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आश्रमशाळांमध्ये आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. विद्यार्थिनींच्या आरोग्य तपासणीसाठी एएनएमची नियुक्ती करण्यात येणार असून, शिक्षणाच्या दर्जात सुधारणा करण्यासाठी ५०० आश्रमशाळांमध्ये विविध विषयांचे पदवीधर शिक्षक नेमण्यात आले आहेत. आतापर्यंत एकूण १,७७१ शिक्षकांची नियुक्ती पूर्ण झाली आहे.आगामी सत्रात अधिकारी, कर्मचारी व लोकप्रतिनिधी आश्रमशाळांमध्ये मुक्काम करून विद्यार्थ्यांच्या समस्या प्रत्यक्ष जाणून घेणार असून त्यांचे तत्काळ निराकरण केले जाणार आहे. तसेच भविष्यात ५०० विद्यार्थ्यांसाठी क्रीडा अकादमी स्थापन करण्याच्या योजनेवर ही विभाग विचार करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेला डॉ. आरती फुफाते, राजू पाडगिलवार, योगेश सागर, आकाश माडवी, दिलीप मालाने यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.


# पीक विम्यापासून शेतकरी वंचित राहणार नाहीत : पालकमंत्री संजय राठोड

## कृषी मंत्र्यांशी चर्चा तांत्रिक व प्रशासकीय त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश

**जनमाध्यम प्रतिनिधी**

यवतमाळ - गतवर्षी अतिवृष्टीमुळे सोयाबीन पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पंतप्रधान पीक विमा योजनेतून राज्यभरात १,२१९ कोटी रुपयांची भरपाई जाहीर करण्यात आली आहे. मात्र या यादीत यवतमाळ जिल्ह्याचा समावेश नसल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांनी पुढाकार घेत संबंधित यंत्रणांना तातडीच्या सूचना दिल्या आहेत.

यवतमाळ जिल्ह्यात सुमारे २.५ ते २.६५ लाख हेक्टरवर सोयाबीनची लागवड होते. मोठ्या संख्येने शेतकरी पीक विमा योजनेत सहभागी असूनही भरपाईच्या यादीत जिल्ह्याचे



नाव नसल्याने नाराजी व्यक्त होत आहे. याबाबत स्पष्टीकरण देताना पालकमंत्र्यांनी सांगितले की, काही तांत्रिक कारणांमुळे पोर्टलवर मंजूर रक्कम शून्य दर्शविली जात आहे. जिल्ह्यातील ११० महसूल मंडळांपैकी ७५ मंडळांची नुकसान भरपाईची प्रक्रिया पूर्ण झाली असून, सुमारे २५२ लाख रुपयांची मदत मंजूर झाल्याचे यापूर्वी पोर्टलवर दिसत होते. मात्र, कागदपत्रे अपलोड करताना झालेल्या त्रुटींमुळे ही अडचण निर्माण झाली आहे. उर्वरित ३५ मंडळांची आकडेवारी विमा कंपनीकडे प्रलंबित आहे. या संदर्भात कृषी मंत्री दत्तात्रय भरणे व प्रधान सचिवांशी चर्चा करून सर्व त्रुटी तातडीने दूर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांचे उत्पन्न व नुकसान यांची पुन्हा तपासणी करून पात्र लाभार्थ्यांना लवकरात लवकर भरपाई मिळवून देण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. नुकसान भरपाईसाठी पाठपुरावा सुरू

# “३ तास अभ्यास अभियानातून महामानवाच्या जयंतीनिमित्त अभ्यासाची नवी परंपरा” : डॉ. विशाल दौलतकर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



राळेगाव - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. भास्कर सावरकर यांच्या मार्गदर्शनाखाली कला, वाणिज्य महाविद्यालयाचा इतिहास विभाग, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, राष्ट्रीय युवा संघटन व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने ‘किमान ३ तास अभ्यास’ अभियानाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून एका अनोख्या पद्धतीने महामानवाला अभिवादन करण्यात आले.

अभियान दोन स्तरावर राबविण्यात आले. सामूहिक स्तरावर राळेगाव तालुक्यातील सहा संस्कार केंद्रांमध्ये सामूहिक अभ्यासाचे आयोजन झाले. या स्पर्धेत प्रथम येणाऱ्या केंद्राला रु. १५०० चे बक्षीस जाहीर करण्यात आले. सहाही केंद्रांमध्ये जवळपास १७० विद्यार्थी व नागरिकांनी सहभाग घेतला. वाऱ्हा येथे संचालक सुहानी कुंमरे, सुरज कुंमरे व पवन दांदडे यांनी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षिका ओंकार मॅडम यांच्या सहकार्याने सकाळी ९ ते १२ या वेळेत ४० विद्यार्थ्यांसह अभ्यास अभियान राबवले. रामतीर्थ येथे संचालक लक्ष्मण डोंगरे यांनी आपल्या घरी २५ विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांसह अभ्यास केला. गवारीपुरा येथे संचालक अजय गजबे व अनुष्का होले यांच्या नेतृत्वात बचत गटाच्या महिलांच्या सहकार्याने ४९ विद्यार्थी व १५ महिलांनी सहभाग घेतला. पिंपळखुटी येथे दर्शना मरस्कोल्हे व प्राची मोहिते यांनी जिल्हा परिषद शाळेत २० विद्यार्थ्यांसह अभ्यास केला. वरूड (ज) येथे प्रा. पंकज आत्राम यांच्या नेतृत्वात अभ्यासासोबत चर्चासत्र व भव्य रॅलीचे आयोजन झाले, ज्यात ६० ते ७० विद्यार्थी व युवक सहभागी झाले. जळका येथे पायल बावणे हिने २० विद्यार्थ्यांसह अभ्यासाची व्यवस्था केली. वरध येथे राजकमल कन्नाके हिने २० विद्यार्थ्यांसह घरीच अभ्यास केला. जागजई येथे अनिकेत कांबळे यांनी बुद्ध विहारात १५ ते २० विद्यार्थी व नागरिकांसह अभ्यास केला. झाडगाव येथे भाग्यश्री मासुरकर हिने समाजभवनात २० विद्यार्थ्यांसह अभ्यास केला.

# शहरातील तसेच तालुक्यातील अर्धवट ठेवलेल्या रस्त्यांची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा : अन्यथा आंदोलन

**जनमाध्यम प्रतिनिधी**

उमरखेड - शहरासह तालुक्यातील रस्त्यांची अर्धवट अवस्थेत ठेवलेली कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करा , अन्यथा तिव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी घ्यावी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन जनतेसाठी त्रासदायक ठरलेल्या रस्त्यांच्या कामांची तत्काळ दखल घेण्याची मागणी केली आहे. शिवसेना जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी उपविभागीय अधिकारी, उमरखेड यांच्यामार्फत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनात संबंधित बांधकाम विभागाने उमरखेड शहर आणि तालुक्यात अनेक ठिकाणी रस्ते खोदून ठेवले आहेत.

ज्यामुळे वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत आहे. पुढे पावसाळा तोंडावर आला असताना ही कामे पूर्ण न झाल्यास चिखल आणि खड्ड्यांमध्ये पाणी साचून अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

जीवितहानी झाल्यास त्याला संबंधित बांधकाम विभागाचे अधिकारी जबाबदार राहतील, असा इशाराही यात देण्यात आला आहे.

उमरखेड शहरात आंबेडकर पुतळा ते संजय गांधी चौक रस्ता खोदून सहा महिने लोटले पाऊस पडल्यास तलाव निर्माण होतो . छत्रपती शिवाजी महाराज चौकातही अशीच परिस्थिती आहे , काही सिमेंट रोडच्या बाजूला माती मिश्रित मुरूम टाकला जात असल्याचा आरोपही या पत्रात करण्यात आला असून, यामुळे रस्त्याच्या मजबुतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांनी या विषयात जातीने लक्ष घालून पावसाळ्यापूर्वी शहरातील व तालुक्यातील सर्व प्रलंबित रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे निर्देश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

"जर प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन या समस्या मार्गी लावल्या नाहीत, तर शिवसेना (उबाठा) उमरखेडच्या वतीने रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल," असा इशारा उबाठा सेनेचे जिल्हा समन्वयक संजय पळसकर यांनी उपविभागिय अधिकाऱ्यांमार्फत जिल्हाधिकाऱ्यांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

# मुदापूर रेती घाटावर रात्रीचा ‘काळा खेळ’

## नियमांची पायमल्ली, महसूल प्रशासन मूकदर्शक ?

### ओव्हरलोड ट्रक-ट्रॅक्टरमुळे रस्त्यांचे नुकसान, अपघातांची मालिका ; नागरिकांचा संताप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

राळेगाव - तालुक्यातील मुदापूर-हिरापूर रेती घाटावर रात्रीच्या वेळी अवैध रेती उत्खनन व वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असल्याचे धक्कादायक चित्र समोर येत आहे. सरकारी नियमांना केराची टोपली दाखवत रात्रीच्या अंधारात हा ‘काळा खेळ’ सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगू लागली आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, रात्रीच्या वेळी ट्रक व ट्रॅक्टरद्वारे मोठ्या प्रमाणावर रेतीची वाहतूक केली जात आहे. विशेष म्हणजे, या प्रकाराकडे महसूल प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. आर्थिक देवाण-घेवाणीमुळेच ही वाहतूक सुरळीत सुरू असल्याची शंका नागरिक व्यक्त करत आहेत. दरम्यान, राळेगाव शहरातून यवतमाळ मार्गावर दिवस-



रात्र ओव्हरलोड ट्रक धावत असून, त्यामुळे रस्त्यांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे. सिमेंट व डांबरी रस्त्यावर सांडणाऱ्या रेतीमुळे दुचाकीस्वारांना जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. मागील काही दिवसांत रेतीच्या दोन ट्रक व एका कारचा अपघात झाल्याची घटना घडली, मात्र त्यावर कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आले नाही. येवती ते सावंगी फाटा मार्गासह परिसरातील अनेक रस्त्यांची दुरवस्था झाली असून, अंतरगाव, चिखली, वनोजा, धानोरा, येवती आदी गावांतील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. शेतकऱ्यांना स्वतःच्या गरजेसाठी रेती मिळविण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत असताना, मोठ्या बांधकामांसाठी मात्र मोठ्या प्रमाणावर रेती सहज उपलब्ध होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे. या सर्व प्रकारामागे स्थानिक महसूल कर्मचाऱ्यांची मर्जी असल्याची चर्चा गावागावात सुरू असून, जिल्हाधिकारी व संबंधित प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

रविवार १९ एप्रिल २०२६
E-paper - www.janmadhyam.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## अखेर बोर्डी नाला प्रकल्पग्रस्तांची प्रतीक्षा संपली

# २७.७८ कोटींच्या सानुग्रह अनुदानाचे वाटप सुरू

**आसेगाव पूर्णा/ वार्ताहर**

चांदूर बाजार तालुक्यातील बोर्डी नाला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची दीर्घ प्रतीक्षा अखेर संपुष्टात आली असून, ५३२ खातेधारकांना एकूण २७.७८ कोटी रुपयांच्या विशेष सानुग्रह अनुदानाचे वाटप सुरू झाले आहे. या निर्णयामुळे अनेक वर्षांपासून न्यायाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

बोर्डी नाला प्रकल्पासाठी २००६ ते २०१३ या कालावधीत सरळ खरेदी पद्धतीने अत्यल्प दरात शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात आल्या होत्या. त्यावेळी न्यायालयात जाण्याचा संवैधानिक अधिकारही बाधित झाल्याने शेतकऱ्यांनी न्यायाची अपेक्षा जवळपास सोडून दिली होती. मात्र, मनोज चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेने तब्बल बारा वर्षे सातत्याने लढा देत हा प्रश्न शासन दरबारी पोहोचवला.



बळीराजा प्रकल्पग्रस्त संघर्ष संघटनेच्या लढ्याला यश

या लढ्याची दखल घेत राज्य शासनाने प्रति हेक्टर ५ लाख रुपयांचे विशेष सानुग्रह अनुदान मंजूर केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून विदर्भातील सरळ खरेदी धारक शेतकऱ्यांसाठी एकूण ८३२ कोटी रुपयांच्या अनुदानास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार टप्प्याटप्प्याने निधी वाटप सुरू असून, बोर्डी नाला प्रकल्पातील लाभार्थ्यांना आता प्रत्यक्ष रक्कम मिळू लागली आहे.

मंगलमाता संस्थान येथे झालेल्या कार्यक्रमात आमदार प्रवीण तायडे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुरेखा ठाकरे आणि संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मनोज चव्हाण यांच्या हस्ते धनादेशांचे वितरण करण्यात आले. यावेळी आमदार तायडे यांनी उर्वरित निधीही लवकरात लवकर वितरित करण्याचे निर्देश प्रशासनाला दिले. मनोज चव्हाण यांनी 'ही न्यायाची केवळ सुरुवात असून अजूनही काही मागण्या प्रलंबित आहेत; त्यासाठी प्रकल्पग्रस्तांनी एकजूट कायम ठेवावी,' असे आवाहन केले. सुरेखा ठाकरे यांनीही प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमाला विविध गावांतील प्रकल्पग्रस्त शेतकरी, महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रविंद्र ढेवले यांनी तर आभार प्रदर्शन जलसंपदा विभागाचे अधिकारी डवरे यांनी केले.

## संक्षिप्त

### पोटे पाटील कृषी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची 'पालवी ॲग्रीको' मध्ये निवड


**अमरावती** - पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालया तर्फे आयोजित करण्यात आलेल्या ओपन कॅम्पस ड्राईव्ह मध्ये २५ विद्यार्थ्यांची 'पालवी ॲग्रीको' या कंपनीत कृषी सल्लागार व सेल एक्झिक्यूटिव्ह या पदावर निवड झाली आहे.



महाविद्यालयासाठी ही अभिमानाची बाब असून त्याबद्दल आनंद व्यक्त करण्यात येत आहे. महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलच्या अधिकारी डॉ. अर्चना त्रिपाठी यांचे विद्यार्थ्यांना या संधीसाठी मार्गदर्शन लाभले. पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल ठाकरे, उपप्राचार्य नितेश चौधरी यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### मुलांना मैदानावर आणण्याची जबाबदारी पालकांची-डॉ.चेंडके


**अमरावती** - आजच्या आधुनिक युगात प्रत्येक घरात मुलांच्या हातात मोबाईल दिसत असून, मैदानी खेळांकडे त्यांचा कल कमी होत चालल्याची खंत व्यक्त करत मुलांना पुन्हा मैदानावर आणण्याची जबाबदारी ही पालकांची असल्याचे प्रतिपादन श्री हनुमान व्यायाम प्रसारक



मंडळाचे उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके यांनी केले.ते मंडळाच्या ऐतिहासिक उन्हाळी शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मंडळाचे कोषाध्यक्ष व डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन चे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. दिनानाथ नावाथे, शिबिर संचालक राजेश महात्मे, डॉ. संजय तिरथकर आदी मान्यवर उपस्थित होते.शिबिर संचालक राजेश महात्मे यांनी प्रास्ताविकातून शिबिराची माहिती, मंडळाची वाटचाल व क्रीडा संस्कृतीचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन प्रा. आशिष हटेकर यांनी केले. या उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने विद्यार्थी, खेळाडू आणि पालक उपस्थित होते.

### राज्यस्तरीय स्पर्धेत आरना अढाऊ राज्यातून पाचवी


**अमरावती** - विस्डम एज्युकेशन इन्स्टिट्यूट, पुणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय गणित स्कॉलरशिप परीक्षा २०२५-२६ मध्ये स्थानिक तोमोई प्रायमरी शाळा अमरावती येथील चवथी ची विद्यार्थ्यांनी आरना स्वरूप अढाऊ हिने ९४ टक्के गुण प्राप्त करून महाराष्ट्रातून पाचवे स्थान प्राप्त केले आहे.आरना अढाऊ हिला भरतनाट्यम व चित्रकलेची आवड असून ती आतापासूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करीत



आहे. २६ एप्रिल रोजी होणाऱ्या चवथीच्या स्कॉलरशिप परीक्षा ती देणार आहे. ती आपल्या यशाचे श्रेय आई मिनल,आजी विद्या ,आजोबा शरद अढाऊ तथा शाळेतील शिक्षकांना देते.आरना हिने मिळविलेल्या या घवघवीत यशाबद्दल तिचे सुचिता जवंजाळ, प्राचार्य प्रदीप लढके,प्राचार्य डॉ. संजय खडसे आदिंनी अभिनंदन केले आहे.

### काशिनाथ गजभिये यांचे निधन

**अमरावती** - तालुक्यातील सावर्डी येथील माजी सरपंच काशिनाथ गजभिये वय ८५ वर्षे यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले आहे.रविवार १९ एप्रिल ला ११ वाजता अंत्यसंस्कार सावर्डी येथे करण्यात येणार आहे. त्याच्या पश्चात पत्नी दोन मुले,सुना नातवंडे असा मोठा परिवार आहे.



# अमरावती जिल्हा वकील संघाची निवडणूक ३० एप्रिल रोजी

- १ हजार ५७६ मतदारांची यादी जाहीर
- १ मे रोजी जाहीर होणार निकाल

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती जिल्हा वकील संघाची निवडणूक ३० एप्रिल होऊ घातली आहे. त्यासाठी १ हजार ५७६ वकील मतदारांची अंतिम यादी शुक्रवार, १७ एप्रिल रोजी जाहीर करण्यात आली. २० एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. या निवडणुकीत एक महत्त्वपूर्ण बदल पाहायला मिळणार आहे. पहिल्यांदाच उपाध्यक्ष आणि कार्यकारी समितीच्या पदांसाठी महिला वकिलांना आरक्षण देण्यात आले आहे.अमरावती जिल्हा वकील संघाच्या अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, ग्रंथालय सचिव आणि कार्यकारी सदस्य या पदांसाठी ३० एप्रिल रोजी अमरावती जिल्हा व सत्र न्यायालयाच्या आवारात मतदान होणार आहे. यापूर्वी वकील संघाचा कार्यकाळ एक वर्षाचा होता. परंतु २७ मार्च रोजी झालेल्या बैठकीत हा कार्यकाळ दोन वर्षांपर्यंत वाढविण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार कार्यकारी समितीत ३० टक्के महिला आरक्षण लागू करण्यात आले आहे. यामध्ये महिलांसाठी राखीव असलेल्या एका अतिरिक्त उपाध्यक्ष पदाचा समावेश आहे. आठ सदस्यीय कार्यकारी समितीत आता तीन महिला वकील सदस्य असतील. निवडणूक प्रक्रियेचा भाग म्हणून १० एप्रिल रोजी प्राथमिक मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. शुक्रवारी अंतिम मतदार यादी जाहीर करण्यात आली. २० एप्रिल रोजी नामनिर्देशनपत्रे स्वीकारली जातील आणि त्याच दिवशी दाखल केली जातील. २१ एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी होऊन नामांकन यादीचे प्रकाशन होईल. २२ एप्रिल निवडणूक तक्रार निवारण समितीकडे अपिल दाखल करता येणार असून त्याचदिवशी त्यावर सुनावणी व निर्णय होईल. त्याच दिवशी सायंकाळी अंतिम उमेदवार यादीचे प्रकाशन होईल. ३० एप्रिल सकाळी १० तें ५ या वेळेत मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे. त्यानंतर १ मे रोजी सकाळी १०.३० वाजतापासून मतमोजणीला सुरुवात होऊन निकाल जाहीर करण्यात येईल.

# आयुक्तांकडून छत्रीतलाव आणि वडाळी उद्यानांच्या सौंदर्यीकरणावर भर

## स्वच्छतेसाठी जनसहभागाचे आवाहन

**अमरावती/ का.प्र.**

अमरावती शहराचा चेहरा मोहरा बदलण्यासाठी आणि नागरी सुविधांचा दर्जा अधिक उंचावण्यासाठी महानगरपालिका प्रशासनाने आता विकासात्मक पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज सकाळी शहरातील अनेक परिसरातील विविध भागांचा प्रत्यक्ष दौरा करून सुरू असलेल्या कामांची पाहणी केली.



शहर स्वच्छ, सुंदर आणि प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचना आयुक्तांनी यावेळी दिल्या.दस्तूर नगर येथील झोन क्रमांक ३ येथील कचरा संकलन केंद्राची पाहणी करून, संपूर्ण केंद्र स्वच्छ व सुस्थितीत ठेवण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. शहराचे आरोग्य उत्तम राहण्यासाठी कचरा संकलन केंद्रे सुस्थितीत ठेवण्याला महानगरपालिकेचे प्राधान्य असून, त्यादृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत. तसेच ऐतिहासिक छत्रीतलाव परिसरला भेट देऊन, त्यांचा विकास करून त्याला पर्यटन स्थळाचे स्वरूप देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

तसेच,वडाळी उद्याना भेट देऊन त्याचे पूर्वीचे वैभव परत मिळवण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करण्यात येत आहे, असे आयुक्त म्हणाल्या, या प्रकल्पांना गती देऊन शहराच्या वैभवात भर घालण्यासाठी प्रशासन सकारात्मक पावले उचलत आहे. काँग्रेस नगर परिसरातील नाल्यांच्या पाहणीदरम्यान, नाल्यात हॉकर्स व काही नागरिकांकडून कचरा टाकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. यावर कठोर भूमिका घेत नाल्यात कचरा टाकल्या जाणार नाही व नाल्याची नियमित साफसफाई केली जावी, असे निर्देश देण्यात आले. यावेळी नाल्यांमध्ये गाळ साचणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच ऑक्सिजन पार्क परिसरात पाहणी वेळी रस्त्याच्या कडेला असलेले बांधकाम साहित्य हटवण्याबाबत नागरिकांना आणि व्यावसायिकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले. पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, भुषण पुसतकर, मंगेश कडू, उद्यान अधिक्षक अजय विंचुरकर, अतिक्रमण पथक प्रमुख श्याम चावरे, उद्यान निरीक्षक मुकेश खारकर, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, अमरावती शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षक, कंत्राटदार प्रतिनिधी, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# देशाच्या सुखसमृद्धीसाठी खालसांची पदयात्रा

## गौमाता रक्षण अन् सनातनी धर्माचा जागर

**अमरावती/ का.प्र.**

राष्ट्रहित, गौमाता संरक्षण आणि सनातन धर्माच्या प्रसाराचा ध्यास घेऊन भोपाळ येथून तख्त सचखंड श्री हुजूर साहेब अबचल नगर नांदेडकडे निघालेल्या ऐतिहासिक धार्मिक पदयात्रेचे अमरावतीत जल्लोषात स्वागत करण्यात आले.



भगवा पार्टीचे राष्ट्रीय संघटन सरचिटणीस रामस्वरूप सिंह खालसा यांच्या नेतृत्वात ही यात्रा निघाली असून, अमरावतीच्या मातीत या सनातनी विचारांचे स्वागत करण्यासाठी कार्यकर्त्यांची मोठी मांदियाळी जमली होती. देशात सुख, शांती आणि समृद्धी नांदावी या पवित्र उद्देशाने निघालेल्या या उपक्रमाचे सर्वत्र मोठे कौतुक होत आहे.

भोपाळ येथून ६ एप्रिल रोजी प्रस्थान झालेली ही पदयात्रा गुरुनगरी अमरावतीत पोहोचताच संपूर्ण परिसर भगवेमय झाला होता. यावेळी प्रदेश संघटन मंत्री राजेश राऊत यांनी रामस्वरूप सिंह खालसा यांचे हार घालून स्वागत केले. त्याचप्रमाणे जिल्हा प्रदेश सचिव प्रकाश दिवे, सहसचिव अजय सिंग ठाकूर आणि प्रदेश माध्यम प्रमुख संदीप बाजड यांनी पुष्पगुच्छ देऊन यात्रेचे स्वागत केले.

स्वागतानंतर सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी गुरुद्वारात जाऊन माथा टेकला आणि मोठ्या जयघोषात ही पदयात्रा पुढील मुक्कामाकडे रवाना झाली. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी संदीप रोडे, विजयानंद महाराज, प्रकाश दिवे, राकेश मालवीय, विजय नागले, राजेंद्र तिवारी, सुनील तावरे आणि इतर सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामस्वरूप सिंह खालसा यांच्या या अनवाणी पदयात्रेने अमरावतीकरांचे लक्ष वेधून घेतले असून, सनातनी परंपरा आणि राष्ट्रभक्तीचा हा अनोखा मेळ नांदेडच्या पावन भूमीकडे मार्गस्थ होत आहे. कार्यकर्त्यांनी यात्रेच्या यशासाठी ईश्वराकडे प्रार्थना केली.

# जी. एच. रायसोनी विद्यापीठात आंतरराष्ट्रीय परिषद

**अमरावती/ का.प्र.**

जी. एच. रायसोनी विद्यापीठ, अमरावती येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद 'मल्टिडिसिप्लिनरी इनोव्हेशन्स फॉर ग्लोबल सस्टेनेबिलिटी अँड डेव्हलपमेंट' चे उद्घाटन करण्यात आले.रायसोनी एज्युकेशनचे अध्यक्ष, सुनील रायसोनी आणि कार्यकारी संचालक श्रेयस रायसोनी यांच्या मार्गदर्शनाखाली ही परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेच्या अध्यक्षस्थानी डॉ. विनायक देशपांडे होते. उद्घाटन सत्रात डॉ. स्नेहल शिंदे यांच्यासह डॉ. रोशन बोडिले, एनआयटी जालंधर यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. त्यांनी बहुशाखीय नवकल्पना आणि जागतिक शाश्वतता व विकासातील त्यांच्या भूमिकेवर मौलिक विचार मांडले.



विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता डॉ. प्रशांत अवचट, कुलसचिव डॉ. स्नेहिल जायस्वाल आणि डीन स्कूल ऑफ इंजिनिअरिंग डॉ. अमित गायकवाड यांनीही उपस्थित राहून चर्चेला अधिक समृद्ध केले.ही परिषद संशोधक, प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांसाठी एक गतिमान व्यासपीठ उपलब्ध करून देते.येथे संशोधन निष्कर्ष सादर करणे, कल्पना आदान-प्रदान करणे आणि जागतिक आव्हानांसाठी नाविन्यपूर्ण उपायांची चर्चा करण्यात येते.यामध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्य निकेशन, फार्मसी, कायदे, मेकॅनिकल इंजिनिअरिंग, फॉरेन्सिक सायन्स, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स, केमिस्ट्री आणि फिजिक्स या विषयांचा समावेश होता. या सत्रांमध्ये संशोधक, प्राध्यापक आणि उद्योग तज्ज्ञांनी सक्रिय सहभाग घेतला आणि ज्ञानाची देवाण-घेवाण केली.

परिषदेचे संयोजक म्हणून डॉ. महिप एम. बरतेरे आणि डॉ. गिरीश एस. भावेकर तर सह-संयोजक म्हणून डॉ. विनय ए. राजगुरे आणि डॉ. प्रतिक्षा चाफळे यांनी आपल्या समर्पित प्रयत्नांनी कार्यक्रम यशस्वी केला.ही परिषद जी. एच. रायसोनी विद्यापीठाच्या बहुशाखीय संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी शाश्वत भविष्य घडवण्याच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे.

# भीमगीतांच्या कार्यक्रमातून घडले समाज प्रबोधन

**अमरावती/ का.प्र.**

समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावतीच्या वतीने महात्मा ज्योतिबा फुले व विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्य समतापर्वचे आयोजन करण्यात आले. पाचदिवसीय समता पर्व कार्यक्रमात वेशभूषा स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा , सांस्कृतिक कार्यक्रम सामाजिक प्रबोधन, परिवर्तन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाले. तसेच संदीपपाल महाराज यांचा बुद्ध-भीम गीतांचा कार्यक्रमातुन नागरिकांमध्ये उत्साहाची लाट उसळली होती. संदीपपाल महाराज यांनी आपल्या मुखवाणीतून अंधश्रद्धा, भोंदूपणा,जाती प्रथा अशा विषयांवर घणाघात करून सामाजिक समरसतेचा संदेश दिला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात राजेंद्र खोरगडे, देवेंद्र पवार ,गौतम वानखडे, रवी वानखडे ,नरेंद्र गुलदेवकर, सुधीर गाडे, नरेंद्र वानखडे राहुल खंडारे, दिनेश वानखडे, गजानन मनोहरे,वनिता धावणे ,वैशाली खंडारे,रंजना हरले,अर्चना मनोहरे, गुंफा उके ,सोनू वंजारी, रीना वानखडे, आदींसह समता महिला मंडळ तपोवन अमरावती व गोदावरी हाऊसिंग सोसायटी योगीराज नगर अमरावती येथील महिला -पुरुष व युवक बांधवानी अथक परिश्रम घेतले.

# भाजपा मारडा सर्कल प्रमुख युवा प्रविण बडकस यांचे अपघातात मृत्यू

**कुऱ्हा/ वार्ताहर**

तिवसा विधानसभा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे यांचे कट्टर निकटवर्तीय तथा भाजपाचे मारडा सर्कल प्रमुख युवा कार्यकर्ता प्रविण ओंकारराव बडकस (वय ४०) यांचा १७ एप्रिलला रात्री नऊ वाजता सुमारास मारडाहून दुचाकीने कुऱ्ह्याकडे येत असताना कुऱ्हा पासून एक किलो मिटर अंतरावर इलेक्ट्रिक पोलवर दुचाकी आदळली व प्रविण बडकस यांचा जागीच मृत्यू झाला.अंत्यविधी मारडा येथील हिंदू स्मशानात पार पडला.



यावेळी राजेश वानखडे आमदार, रविराज देशमुख अध्यक्ष भाजपा जिल्हा ग्रामीण तसेच तालुक्यातील पदाधिकारी व पंचक्रोशीतील जनसमुदाय उपस्थित होता.

# उष्माघातापासून सावध रहा..

**आ**पण सगळेच उन्हात फिरतो. पण काही जणांचाच उन्हात गेल्यामुळे अचानक मृत्यू का होतो? याची कारणे....

आपल्या शरीराचे तापमान नेहमी ३७ष्ट अंश सेल्सियस असते, या तापमानातच शरीरातले सर्व अवयव नीट काम करू शकतात.घामाच्या रुपाने पाणी बाहेर काढून शरीर ३७ष्ट अंश सेल्सियस तापमान कायम राखते, सतत घाम निघत असताना पाणी पीत राहाणे अत्यंत गरजेचे आणि अत्यावश्यक आहे.नपाणी शरीरात इतरही अधिक महत्त्वाची काम करते, त्यामुळे शरीरातला पाण्याचा साठा कमी झाला, तर शरीर घामाच्या रूपाने पाणी बाहेर टाकणे टाळते.

जेव्हा बाहेरचे तापमान ४५ष्ट अंशाच्या पुढे जाते आणि शरीरातली कुलिंग व्यवस्था पाण्याच्या अभावाने ठप्प होते, तेव्हा शरीराचे तापमान ३७ष्टच्या पुढे जाऊ लागते.शरीराचे तापमान जेव्हा ४२ष्ट डिग्री सेल्सियसपर्यंत पोहोचते, तेव्हा रक्त तापू लागते आणि रक्तातले प्रोटिन अक्षरशः शिजू लागते. स्नायू कडक होऊ लागतात, त्यात श्वास घेण्यासाठी लागणारे स्नायू ही निकामी होतात.रक्तातले



पाणी कमी झाल्या मुळे रक्त घट्ट होते, ब्लडप्रेशर अत्यंत कमी होते, महत्त्वाच्या अवयवांना (विशेषतः मेंदूला) रक्त पुरवठा थांबतो.

माणूस कोमात जातो आणि त्याचे एक-एक अवयव अवघ्या काही क्षणांत बंद पडतात आणि त्याचा मृत्यू ओढावतो.उन्हाळ्यात असे अनर्थ टाळण्यासाठी सतत थोडे थोडे पाणी पित रहावे, व आपल्या शरीराचे तापमान ३७ष्ट अंशच कसे राहिल याकडे लक्ष द्यावे..

**उष्माघात टाळा**

उन्हाचा पारा चढत आहे.त्यामुळे उष्माघात टाळण्या साठी खालील उपाययोजना करा..

शेतातील कामे सकाळी ६ ते ११ व दुपारी ४ते ६.३० या कालावधीत करा. काम करत असताना मध्ये मध्ये थोडावेळ थांबुन पाणी प्या.शक्यतो सुती (कॉटन) व पांढऱ्या रंगाचे कपडे वापरा.डोक्यावर रुमाल टोपी इत्यादीचा वापर करा.आहारात ताक दही इत्यादीचा वापर करा. तिखट, तेलकट, मसालेदार पदार्थ, मद्यपान व मांसाहार टाळा.कोल्ड्रींक ऐवजी लिंबु सरबत, नारळपाणी याचा वापर करा.

दुपारी ११ ते ४ पर्यंत काम, प्रवास टाळा.लहान मुलांना, गरोदर मातांना, आजारी व्यक्तींना दुपारच्या वेळी बाहेर पडु देऊ नका.अशक्तपणा,थकवा, ताप-उलट्या इ. लक्षणे आढळल्यास तत्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**डॉ प्रमोद पोतदार**
वैद्यकीय अधीक्षक
उपजिल्हा रुग्णालय, मोर्शी

# नारीशक्तीचे अनमोल योगदान

**नारी शक्ती वंदन अधिनियम (महिला आरक्षण विधेयक) अंतर्गत लोकसभा आणि विधानसभेमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाचा निर्णय हा देशाच्या धोरणात्मक निर्णयामध्ये महिलांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. यासाठी नवी दिल्ली येथील विज्ञान भावनात आयोजित नारी शक्ती वंदन संमेलनात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संबोधित केले. त्यांच्या भाषणाचा हा संपादित भाग..**

भारताच्या नारी शक्तीने त्यांचे अथक परिश्रम, धैर्य आणि आत्मविश्वासाच्या जोरावर यशाची नवीन उंची गाठली आहे, आता आपण सर्वांनी त्यांना सक्षम करण्यासाठी संधींचे क्षितिज विस्तारण्याच्या उद्देशाने एकत्र आलेच पाहिजे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्लीच्या विज्ञान भवन येथे नारी शक्ती वंदन कार्यक्रमाला संबोधित केले. बैसाखी आणि देशातील विविध भागांमध्ये आगामी नववर्ष सोहळ्याचा उल्लेख करुन प्रधानमंत्र्यांनी जालियानवाला बाग हत्याकांडातील शहिदांना आदरांजली वाहिली. भारत एकविसाव्या शतकातील एक मोठा निर्णय घेण्यासाठी सज्ज असून हा निर्णय नारी शक्तीला समर्पित आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले.

हा क्षण ऐतिहासिक असल्याचे सांगत प्रधानमंत्री म्हणाले की देशाची संसद भूतकाळातील दूरदृष्टी आणि भविष्यातील संकल्प पूर्ण करणारा एक नवीन इतिहास घडवण्याच्या उंबरठ्यावर आहे. सामाजिक न्यायाचे महत्त्व विशद करताना त्यांनी सांगितले की देश एका अशा समतावादी भारताची कल्पना करत आहे जिथे सामाजिक न्याय ही केवळ एक घोषणा नाही तर कार्यसंस्कृतीचा अविभाज्य घटक आहे. राज्य विधानसभांपासून ते देशाच्या संसदेपर्यंतची दशकांची प्रतीक्षा आता संपत आली आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले.

वर्ष २०२३ मध्ये नवीन संसद भवनात नारी शक्ती वंदन विधेयक संमत झाल्याचे स्मरण करताना प्रधानमंत्र्यांनी सांगितले की हे विधेयक एकमताने संमत झाले होते आणि कोणत्याही परिस्थितीत २०२९ पर्यंत त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, यावर सर्व पक्ष देखील सहमत होते. आपल्या लोकशाहीला अधिक बळकट करण्यासाठी नारी शक्ती वंदन विधेयकाची अंमलबजावणी वेळेवर झालीच पाहिजे आणि त्यासाठीच येत्या १६ एप्रिल पासून संसदेचे विशेष अधिवेशन सुरु होणार आहे, हे कार्य संवाद, सहकार्य आणि सहभाग या त्रिसूत्रीच्या पूर्ततेसह पूर्णत्वाला जावे ज्यामुळे संसदेच्या प्रतिष्ठेत वृद्धी होईल यासाठी आम्ही प्रयत्न करत आहोत आणि त्याला आम्ही प्राधान्य दिले आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले.

याबाबत देशभरातील महिलांमध्ये मोठा उत्साह दिसून येत आहे, असे निरीक्षण नोंदवत प्रधानमंत्री म्हणाले की देशभरातील महिला विधानसभा आणि लोकसभेत पोहोचण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा व्यक्त करत आहेत. त्यांच्या स्वप्नांना नवे पंख मिळाले असून देशभरात एक सकारात्मक वातावरण तयार झाले आहे.'मी सर्व महिलांना आवाहन करतो की, त्यांनी या संपूर्ण प्रक्रियेत आपला सक्रिय सहभाग कायम ठेवावा आणि आपले दृष्टिकोन आणि अपेक्षा खासदारांसमोर मांडाव्यात,' असे आवाहन प्रधानमंत्र्यांनी केले.भारताच्या स्वातंत्र्य लढ्यापासून ते संविधान सभेपर्यंत महिलांनी दिलेल्या योगदानाविषयी बोलताना प्रधानमंत्र्यांनी स्वतंत्र भारताचा पाया रचण्यात नारी शक्तीने बजावलेली महत्त्वपूर्ण भूमिका अधोरेखित केली. ज्या महिलांना प्रतिनिधित्त्व करण्याची संधी मिळाली त्यांनी राष्ट्रासाठी उत्कृष्ट कार्य केल्याचे त्यांनी सांगितले. अगदी आज सुद्धा आपल्या देशात राष्ट्रपतींपासून वित्तमंत्र्यांपर्यंत महिला अतिशय महत्त्वाच्या जागा सांभाळत आहेत. राष्ट्रपतींपासून ते प्रधानमंत्र्यापर्यंत,जिथे जिथे महिला पोहोचल्या आहेत, तिथे त्यांनी आपला स्वतःचा वारसा निर्माण केला आहे, असे ते म्हणाले.

पंचायत राज संस्था म्हणजे महिला नेतृत्त्वाचे उत्तम उदाहरण असल्याचे सांगत प्रधानमंत्री म्हणाले की १४ लाखांहून अधिक महिला स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये यशस्वीपणे कार्य करत आहेत. सुमारे २१ राज्यांमध्ये पंचायतींमधील त्यांचा सहभाग जवळपास ५० टक्क्यांपर्यंत पोहोचला आहे. राजकारण आणि सामाजिक जीवनातील लाखो महिलांचा हा सक्रिय सहभाग जगातील आघाडीच्या नेत्यांना आणि राजकीय तज्ज्ञांनाही आश्चर्यचकित करतो आणि भारताचा अभिमान वाढवतो असे प्रधानमंत्री म्हणाले.

विविध अभ्यासांचा दाखला देत प्रधानमंत्र्यांनी सांगितले की जेव्हा महिलांचा निर्णय घेण्याच्या प्रक्रियेतील सहभाग वाढतो तेव्हा यंत्रणांमध्ये संवेदनशीलता येते. यामुळे पाणी, शिक्षण, आरोग्य आणि पोषण यांसारख्या मुद्द्यांवर आणखी समर्पितपणे काम होते. जल जीवन मिशनचे यश हे अशाच प्रकारचे उदाहरण आहे जिथे महिलांच्या पंचायत पातळीवरील सहभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले.स्थानिक स्वराज्य संस्था आणि संघटनांमध्ये अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या लाखो महिलांकडे आता दांडगा अनुभव असून, त्या मोठ्या भूमिकांसाठी सज्ज आणि उत्सुक आहेत, यावर जोर देत प्रधानमंत्री म्हणाले की नारी शक्ती वंदन कायद्याची अंमलबजावणी अशा सर्व महिलांच्या जीवनात एक मोठी संधी ठरेल. 'पंचायत ते संसद हा प्रवास अधिक सुलभ होणार आहे,' असे प्रधानमंत्र्यानी ठामपणे सांगितले.

विकसित भारताच्या प्रवासातील महिलांच्या महत्त्वपूर्ण भूमिकेबद्दल बोलताना केंद्र सरकारने २०१४ पासून महिलांच्या आयुष्यातील प्रत्येक टप्प्यासाठी तयार केलेल्या योजनांबद्दल प्रधानमंत्र्यांनी समाधान व्यक्त केले. पहिल्या श्वासापासून ते अंतिम श्वासापर्यंत केंद्र सरकार विविध योजनांच्या माध्यमातून आपल्या भगिनी आणि मुलींच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले. स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी आम्ही 'बेटी बचाव-बेटी पढाओ' मोहिम सुरू केली, गरोदरपणात योग्य पोषण मिळावे म्हणून मातृ वंदन योजनेअंतर्गत ५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली आणि मुलींच्या शिक्षणाला आधार देण्यासाठी उच्च व्याजदर असलेली सुकन्या समृद्धी योजना सुरू केली, असे मोदी यांनी सांगितले.




सर्वसमावेशक मदत प्रणालीची माहिती देताना प्रधानमंत्री पुढे म्हणाले की, वेळेवर लसीकरणासाठी मिशन इंद्रधनुष, स्वच्छ भारत अभियानाअंतर्गत शौचालये, अत्यल्प दरात सॅनिटरी नॅपकिन्स, खेलो इंडिया योजनेअंतर्गत आर्थिक मदत आणि सैनिक शाळा तसेच राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनीची दारे मुलींसाठी खुली करण्यात आली आहेत. जीवनाच्या पुढील टप्प्यांसाठी, उज्ज्वला योजनेमधून कोट्यवधी गॅस जोडण्या दिल्या,'हर घर नल से जल' मोहिमेने घराघरात पाणी पोहोचवले,मोफत रेशन योजनेने अन्न सुरक्षा सुनिश्चित केली आणि आयुष्मान योजनेने ५ लाख रुपयांपर्यंतचा आरोग्य विमा दिला. औषधांवर ८० टक्क्यांपर्यंत सूट देणाऱ्या जन औषधी केंद्रांसह या सर्व उपक्रमांचा प्रामुख्याने आपल्या भगिनींना आणि मुलींना फायदा झाला आहे, असे प्रधानमंत्र्यानी नमूद केले.

महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांचा आर्थिक सहभाग वाढवण्याच्या आवश्यकतेवर भर देत प्रधानमंत्री म्हणाले की, प्रत्येक निर्णय आणि योजनेत या पैलूला प्राधान्य देण्यात आले आहे. पूर्वी कुटुंबातील मालमत्ता प्रामुख्याने पुरुषांच्या नावे नोंदवली जात असे, परंतु पीएम आवास योजनेअंतर्गत घरांची नोंदणी प्राधान्याने महिलांच्या नावे करण्यात आली. गेल्या ११ वर्षांत, ३ कोटींहून अधिक महिलांना या निर्णयाचा लाभ झाला असून त्या आपल्या घराच्या मालक बनल्या आहेत, ज्यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत, असे मोदी यांनी नमूद केले.आर्थिक समावेशनाबद्दल बोलताना प्रधानमंत्र्यानी आठवण करून दिली की, २०१४ मध्ये कोट्यवधी महिलांनी बँकेचा उंबरठाही पाहिला नव्हता. जन धन योजनेमुळे ३२ कोटींहून अधिक महिलांची बँक खाती उघडली गेली. आज आपल्या मुली नवीन व्यवसायांमध्ये स्वतःची ओळख निर्माण करत आहेत; मुद्रा योजनेअंतर्गत देण्यात आलेल्या कर्जांपैकी ६० टक्क्यांहून अधिक कर्जे महिलांनी घेतली आहेत, असे प्रधानमंत्री म्हणाले.

स्टार्टअप क्रांतीमधील महिलांच्या नेतृत्वाचा गौरव करताना प्रधानमंत्री म्हणाले की, नोंदणीकृत स्टार्टअप्सपैकी ४५ टक्क्यांहून अधिक स्टार्टअप्समध्ये किमान एक महिला संचालक म्हणून काम पाहत आहे. महिलांच्या कारकिर्दीवर परिणाम होऊ नये, यासाठी प्रसूती रजा २६ आठवड्यांपर्यंत वाढवण्यात आली आहे. मोदी पुढे म्हणाले की, काही वर्षांपूर्वी सुरू केलेल्या स्किल इंडिया मिशनचे परिणाम आता दिसत असून तंत्रज्ञानाच्या माध्यमातून आधुनिक शेतीचे शिक्षण देऊन हजारो ड्रोन दीदी कृषी क्षेत्रात क्रांती घडवून आणत आहेत.महत्त्वपूर्ण यशाची माहिती देताना प्रधानमंत्र्यांनी सांगितले की, गेल्या ११ वर्षांत जवळपास १० कोटी महिला बचत गटांमध्ये सामील झाल्या आहेत. ग्रामीण अर्थव्यवस्थेशी जोडलेल्या ६ कोटी भगिनींना लखपती दीदी बनवण्याचे उद्दिष्ट सरकारने ठेवले असून, त्यापैकी ३ कोटींहून अधिक महिलांनी आधीच हा टप्पा गाठला आहे. या महिला आता व्होकल फॉर लोकलच्या ब्रँड ॲम्बेसेडर बनत आहेत, असे प्रधानमंत्री मोदी यांनी नमूद केले.

महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाच्या संकल्पनेने जुन्या विचारसरणीला आव्हान दिले असल्याचे अधोरेखित करत प्रधानमंत्री म्हणाले की, एकेकाळी पुरुषांचे वर्चस्व मानल्या जाणाऱ्या क्षेत्रांमध्ये आज महिला उत्तुंग शिखरे सर करत आहेत. भारताच्या लेकी आता फायटर पायलट बनून आकाशाला गवसणी घालत आहेत. जगातील इतर कोणत्याही देशाच्या तुलनेत भारतात महिला वैमानिकांची टक्केवारी सर्वाधिक आहे, असे मोदी यांनी नमूद केले.
शैक्षणिक क्षेत्रातील यशाचा गौरव करताना प्रधानमंत्र्यांनी नमूद केले की, २०१४ च्या तुलनेत मुलींच्या पीएचडी नोंदणीमध्ये दुप्पट वाढ झाली असून, उच्च शिक्षण आणि संशोधनातील निम्म्यापर्यंत सहभाग महिलांचा आहे. गणित आणि विज्ञान विषयांच्या शिक्षणातही मुलींचे प्रमाण सुमारे ४३ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. हे यश आपल्या लेकींसाठी उपलब्ध होत असलेल्या संधींच्या बदलत्या स्वरूपाचे दर्शन घडवते, असा विश्वास प्रधानमंत्र्यांनी व्यक्त केला.

समाजापुढील मोठे आव्हान असलेल्या महिला सुरक्षा विषयावर बोलताना प्रधानमंत्री म्हणाले की, सरकारने या दिशेने कठोर पावले उचलली आहेत. कायदेशीर सुधारणा करण्यात आल्या असून, न्यायव्यवस्था अधिक संवेदनशील करण्यासाठी आणि जलद निर्णयांसाठी 'फास्ट-ट्रॅक' विशेष न्यायालये स्थापन करण्यात आली आहेत. भारतीय न्याय संहितेमध्ये महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्यात आले आहे. एफआयआर नोंदवण्याची प्रक्रिया सुलभ करण्यात आली असून, कोणत्याही ठिकाणाहून ई-एफआयआर किंवा झिरो-एफआयआर नोंदवण्याची सुविधा देण्यात आली आहे. तसेच पीडितेचा जबाब दृक- श्राव्य माध्यमातून नोंदवण्याची तरतूदही करण्यात आली आहे, असे मोदी यांनी सविस्तरपणे सांगितले.

प्रधानमंत्र्यांनी देशातील प्रत्येक माता, भगिनी आणि कन्यांना आश्वासन दिले की, राष्ट्र त्यांच्या आकांक्षा समजून घेत आहे आणि त्यांची स्वप्ने साकार करण्यासाठी आवश्यक पावले उचलत आहे. कष्ट, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर देशाच्या नारी शक्तीने नवी शिखरे सर केली आहेत. आपल्याला एकत्रितपणे या शक्तीला नवी ऊर्जा द्यायची आहे आणि त्यांच्यासाठी संधींचा विस्तार करायचा आहे, असे प्रधानमंत्री म्हणाले. एक विशेष आवाहन करताना प्रधानमंत्र्यांनी महिलांना विनंती केली की, त्यांनी नारी शक्ती वंदन कार्यक्रमातील चर्चा वैयक्तिक भेटी आणि समाज माध्यमांच्या माध्यमातून देशातील कानाकोपऱ्यात, प्रत्येक गावापर्यंत पोहोचवावी. या महत्त्वपूर्ण निर्णयाबद्दल प्रत्येक महिलेला जागरूक करणे आवश्यक आहे, जेणेकरून त्यांना स्वतःची शक्ती समजेल, आपली भूमिका उमजेल आणि भविष्यात राज्यांपासून देशाच्या संसदेपर्यंत आपला ठसा उमटवण्याचे स्वप्न त्या उघडपणे पाहू शकतील. आपण सर्वांनी मिळून हा संकल्प करूया की, नारी शक्तीला त्यांचे हक्क मिळतील आणि त्या निर्णय प्रक्रियेत पूर्ण सहभागी होतील, हीच आपल्या उज्ज्वल भविष्याची सर्वात मोठी गॅरंटी आहे, असे म्हणत प्रधानमंत्री मोदी यांनी भाषणाचा समारोप केला.

**अनिल आलुरकर**
उपसंचालक
(माहिती)
विभागीय
माहिती कार्यालय,अमरावती.

# डॉ.देवीसिंह शेखावत

## अमरावतीच्या विकासाचे शिल्पकार, शिक्षण आणि शेतीचे मार्गदर्शक

**१९** एप्रिल १९३४ रोजी अमरावतीच्या सुपीक भूमीवर जन्मलेले डॉ. देवीसिंह रामसिंह शेखावत यांचा आज १९ एप्रिल रोजी जन्मदिन आपण अभिमानाने साजरा करत आहोत. त्यांचे जीवन केवळ वैयक्तिक यशाची कहाणी नव्हते, तर अमरावती आणि संपूर्ण विदर्भाच्या सामाजिक, शैक्षणिक, कृषी आणि राजकीय प्रगतीचे एक प्रेरक अध्याय होते.



**अमरावतीला आधुनिक स्वरूप देणारे पहिले महापौर**-डॉ. शेखावत यांनी अमरावतीचे प्रथम महापौर म्हणून जबाबदारी सांभाळताना शहराच्या भविष्याची नीट योजना आखली. पायाभूत सुविधा, रस्त्यांचे जाळे, पाणीपुरवठा आणि नियोजनबद्ध विकास यात त्यांचा मोलाचा वाटा होता.
अप्पर वर्धा प्रकल्प सारख्या महत्त्वाच्या योजनांमध्ये त्यांचे सक्रिय योगदान आजही विदर्भाच्या शेतीला पाठबळ देत आहे.

**वाढदिवसानिमित्त**

**शिक्षण क्षेत्रातील अथक सेवक**-शिक्षण हा त्यांच्या जीवनाचा आत्मा होता.विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष म्हणून त्यांनी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची एक मजबूत प्रणाली उभी केली. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ उभारणीत त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. ग्रामीण भागातील मुलांना उच्च शिक्षणाची संधी मिळावी यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. आजही त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो विद्यार्थी लाभ घेत आहेत.

**शेतकऱ्यांचा खरा मित्र**-स्वतः शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या डॉ. शेखावत यांना शेतकऱ्यांच्या समस्या नेहमीच जवळच्या वाटत. दुर्गापूर (बडनेरा) येथील कृषी विज्ञान केंद्राचे प्रकल्प संचालक म्हणून त्यांनी शेतकऱ्यांसाठी आधुनिक, संशोधन आधारित आणि व्यावहारिक योजना राबवल्या. औद्योगिक प्रगतीसोबत कृषी विकास घडवण्याची त्यांची संकल्पना खरोखर दूरदर्शी होती.

**कामगार हक्कांचे निर्भय आवाज**-१९८९ च्या नागपूर अधिवेशनात मोसीकॉल कामगारांच्या न्यायासाठी त्यांनी ठाम भूमिका घेतली आणि त्यांच्या हक्कांसाठी बुलंद आवाज उठवला. मोसिकॉल कारखान्याचा आणखी विस्तार करण्यासाठी त्यांनी गुजरातमध्ये आनंद येथे जाऊन भारतातील श्वेत क्रांतीचे जनक पद्मविभूषण डॉ. वर्गीस कुरियन यांची सुध्दा त्यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन चर्चा केली.ते पदासाठी नव्हे, तर जनतेच्या वेदना दूर करण्यासाठी राजकारणात आले होते.

**राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे सहचर**-माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांचे जीवनसाथी म्हणून त्यांनी राष्ट्रपती भवनातही अमरावतीच्या विकासासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांमुळे अमरावतीला राष्ट्रीय स्तरावर अधिक मान्यता मिळाली.

**बहुआयामी व्यक्तिमत्त्व**-डॉ. शेखावत हे विद्याभारती शैक्षणिक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष,अमरावतीचे १९८४ ते १९८९ पर्यंत आमदार,सन १९९२ मध्ये अमरावती चे प्रथम महापौर आणि अमरावती विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू तसेच महाराष्ट्र शिक्षण संस्था महामंडळाचे अध्यक्ष म्हणून यशस्वीपणे कारभार सांभाळला.एक साधा शेतकरी, उत्कृष्ट शिक्षणतज्ज्ञ, कुशल प्रशासक, संवेदनशील सामाजिक कार्यकर्ता, दूरदर्शी राजकारणी आणि प्रेमळ पती अशा अनेक भूमिका त्यांनी पूर्ण निष्ठेने आणि निस्वार्थपणे पार पाडल्या.

आज त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचा केवळ गौरव करत नाही, तर त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प करतो. त्यांनी दाखवलेला मार्ग निष्ठा, प्रामाणिकपणा आणि समाजहित हाच आपल्या पुढील वाटचालीचा आधार असावा.त्यांच्या स्मृतींचा प्रकाश प्रत्येक मनात प्रेरणेची ज्योत प्रज्वलित करत राहो, हीच खरी आदरांजली.

**संतोष देशमुख**
मो.७०२०६६०५३४

# समतावादी क्रांतीसूर्य श्री महात्मा बसवेश्वर

कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्हयातील बागेवाडी गावात इ.स. ११०५ मधील वैशाख शुद्ध तृतीया, रोहीणी नक्षत्रावर अक्षय तृतीयेच्या शुभदिवशी धार्मिक सात्वीक शैव ब्राम्हण कुटुंबात मादलांबीकेला पुत्ररत्न प्राप्त झाले. वडीलांचे नाव मादीराज होते.मुलाचे नाव त्यांनी बसव ठेवले. त्यांच्या मोठ्या भावाचे नाव देवराज व बहिणींचे नाव नागलांबिका होते. त्यांचे प्राथमिक शिक्षण बागेवाडीत झाले.वयाच्या चौथ्या वर्षीच कुशाग्र बुद्धीचे बसवेश्वर यांनी पुराणे, रामायण, महाभारत,वेद व आगमही वाचायला लागला. बालपणापासूनच ते अत्यंत संवेदनशील, बुद्धीमान व मृदभाषी होते. त्याकाळी समाज अशिक्षित, अंधश्रद्धाळू, उच्च-निचता व कार्यकांडात गुरफटलेला होता.स्त्रीया व



अस्पृष्यांना शिक्षणाचे द्वारे खुली नव्हती,त्यांचे पुढील शिक्षण कुडलसंगम येथे कृष्णा-मलप्रभा संगमावरील इशान्य गुरुंच्या आश्रमात झाले, शिव या एकाच देवाचे अधीष्ठान मानून त्याची एकाग्रतेने भक्ती करावी व गळयात इष्ट लिंग बांधला. व्रतबंध संस्कारासाठी त्यांनी विरोध केला. त्यांचा विवाह माया बलदेव मंत्री यांची कन्या गंगाबिके सोबत मंगळवेढात झाला, मंत्री बलदेवांना भाच्याची बुद्धी व कर्तृत्वाची यथोचित कल्पना होतीच त्यांचे भविष्य लक्षात घेऊन त्यांनी बसवेश्वरांना कोषागार खात्याची जबाबदारी दिली व ती त्यांनी प्रामाणिकपणे पार पाडली.

अखंड ईश्वरप्रेम म्हणजे भक्ती, लोकांच्या विचारात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी त्यांची क्रांती केली.त्यासाठी त्यांनी अनुभव मंडप या नावाचे धर्मपीठ निर्माण केले. या अनुभव मंडपात एकूण ७०० शरण व ७० शरण रोज एकत्र येऊन आपले आध्यात्मिक अनुभव वचन स्वरूपात लिहून ठेवत. या अनुभव मंडपाचे अध्यक्ष श्री अस्लमप्रभूदेव लिंगायत सर्व एकच. सर्व माझे म्हणणारा महात्मा बसवेश्वर म्हणजे १२ व्या शतकातील भारतात समाजवादाचा पाया घालणारा पहिला युगपुरुष. कायकवे कैलास म्हणजे उद्योग हाच कैलास. या उक्ती नुसार अनुभव मंडपातील सर्व इष्टलींगधारी लोकांनी शेती, नोकरी, व्यवसाय प्रत्येकाने करावा हेच कायक तक होय. व्यवसाय समान व पवित्र आहे.

म.बासवेश्वरांच्या लोकाभिमुख, उदारमतवादी वृत्तीमुळे समानतेच्या तत्वाचे अनुसरण करण्याचा मौलीक विचार त्यांनी समाजात रुजविला. त्या काळात त्यांनी चांभाराचा मुलगा व ब्राम्हणाची मुलगी यांचा विवाह लावून दिला. त्यानंतर कल्याण क्रांती होऊन त्यांनी महामंत्रीपदाचा त्याग करुन कुडल संगमाकडे जीवनाची ध्येयवाद गवसलेल्या इशान्य गुरुंच्या आश्रमाकडे प्रस्थान केले. लोकांच्या हृदयीचा राजा समतेचो वाद व चंदनासारखे समर्पित जीवन, कृष्णा मलप्रभेच्या कुशीत चिरनिद्रीस्त झाले होते. खऱ्या अर्थाने लिंगाग सामरस्य होते. ते श्रावण शुद्ध पंचमी ११६७ साली अनुभव मंडपाचा तेजस्वी दिपस्तंभ उन्मळून पडला होता. भारताच्या जुन्या संसदेच्या समोर श्री. म. बसवेश्वरांच्या अश्वारुढ पुतळा तत्कालीन कर्नाटक सरकारच्या सहयोगाने सोनिया गांधी, राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लंडन येथे म.बसवेश्वरांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केले आहे, अशा थोर महात्म्यास माझा कोटी कोटी प्रणाम.

**सुभाष ग. मोतेवार**
वर्धा.मो.९९२२७०४४२

# एकल महिलांसाठी सोनम रोल मॉडेलच!

**अचलपूरची सोनम गाठे ही तरुणी सर्व एकल महिलांसाठी एक रोल मॉडेल बनली आहे. अचलपूरमध्ये युनियन बँकेसमोर सोनम बीसी पॉइंट व सेतू केंद्र झेरॉक्स दुकान चालवते. अतिशय आत्मविश्वासाने महिन्याला ५० ते ६० हजार रुपये ती कमावते.**

अमरावती जिल्ह्यातील सोनमची कहाणी मोठी विलक्षण आहे. तिच्या पतीचा कॅन्सरमध्ये मृत्यू झाला. औषधोपचारासाठी बराच खर्च करावा लागला. पतीचा मृत्यू झाल्यावर दोन लहान मुली पदरात होत्या. अशा वेळी ती काही काळ नैराश्यात गेली. त्यानंतर अनेक दिवस दुसऱ्याच्या शेतात मजुरीला जात होती. मजुरी करतानाच तिला बचत गट माहीत झाले. बचत गटाच्या माध्यमातून तिला बीसी पॉइंट मिळाला. बँकेचे पैसे घेणे आणि देणे हे व्यवहार ही गावांमध्ये करू लागली. तिला अनेक खाते उघडण्याचे काम करावे लागले. सोनम सांगते आतापर्यंत ७००० बँकेचे खाते तिने उघडले आहेत. अनेकांच्या पेन्शनची कामे करून दिली आहेत. तिची बोलण्याची पद्धत व घरी जाऊन काम करून देण्यामध्ये तिला मोठ्या प्रमाणात लोकांचा प्रतिसाद मिळतो. आज हजारांचे व्यवहार ती करते. आता तिला 'आपले सरकार'मधील सेतू केंद्र मिळाले आहे. त्यातून ती उद्योग आधार, जात प्रमाणपत्र, क्रिमिलेयर काढून देते. झेरॉक्स दुकानातही तिला रोज पन्नास रुपये मिळतात. या सर्वांतून महिन्याला पन्नास ते साठ हजार रुपये तिला मिळतात.

सोनम सांगते मातीच्या आणि कुडाच्याएका खोलीत मी अनेक वर्षे काढली. एकेकाळी हातामध्ये मजुरीवरच्या कामाची टोकरी होती.आज तिच्या हातात कॉम्प्युटरचा माउस आहे. स्टॅण्डवरून पायी शहरांमध्ये यायची. आता स्वतःच्या स्कुटीवर गावाकडून बीसी पॉइंटपर्यंत येते, हा बदल आणि आत्मविश्वास तिच्यामध्ये निर्माण झाला आहे. छोट्या गावात एकटी राहताना काय अडचणी आल्या असे विचारल्यावर ती म्हणाली, की पूर्वी लोक पाठीमागे कुजबूज करायचे की कुठे जाते, आता मोठ्या कौतुकाने लोक तिचे काम, प्रगती बघतात तरुण मुलींसाठी ती एक रोल मॉडेल आहे. दुःखावर मात करून आत्मविश्वासाने कसे जगावे, याचा मार्ग सोनमने अनेक एकल महिलांना दाखविला आहे.

**हेरंब कुलकर्णी**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# पाढरीतील दलित वस्तीत अन्याय सहन केला जाणार नाही

## मालमत्ता हस्तांतरणात अडथळा आणणा–यांवर कारवाईची मागणी; नगरसेविका फाटकर आक्रमक

■ *प्रतिनिधी | तेल्हारा* ■

*शहरात नव्याने समाविष्ट झालेल्या प्रभाग क्रमांक १ मधील पाढरी या शंभर टक्के दलित वस्तीत राहणाऱ्या नागरिकांच्या मालमत्ता हस्तांतरणाच्या कामात अडथळे निर्माण होत असल्याचा गंभीर आरोप करत, हा अन्याय खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा नगरसेविका कान्होपात्रा रामभाऊ फाटकर यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपरिषदेच्या अध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे.*



फाटकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, हद्दवाढीनंतर पाढरी भागाचा समावेश तेल्हारा नगरपरिषद हद्दीत करण्यात येऊन तो प्रभाग क्रमांक १ मध्ये अंतर्भूत करण्यात आला आहे. मात्र, अद्यापही या भागातील मालमत्ता नोंदी कोठा ग्रामपंचायतीकडून नगरपरिषदेकडे विधिवत हस्तांतरित झालेल्या नाहीत. परिणामी, नागरिकांना मालमत्ता कर नोंदणी, नाव फेरफार, बांधकाम परवानगी तसेच घरकुल व इतर शासकीय योजनांचा लाभ घेता येत नसल्याने त्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नगरपरिषद प्रशासनाने मालमत्ता हस्तांतरणासाठी कर्मचाऱ्यांना पाढरी येथे पाठवले असताना, काही अज्ञात व्यक्तींनी कामात अडथळा निर्माण करून संबंधित कर्मचाऱ्यांना परत पाठविल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून, नागरिकांची कामे होऊ नयेत यासाठी जाणीवपूर्वक षडयंत्र रचले जात असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, पाढरी भागातील नागरिकांना मूलभूत सुविधांचाही अभाव भासत आहे. सार्वजनिक शौचालय, स्मशानभूमी, नाल्या, रस्ते, गटारी, स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अंगणवाडी, बुद्ध विहार, सभागृह आदी सुविधा तातडीने उपलब्ध करून देण्याची मागणीही फाटकर यांनी केली आहे.

या संपूर्ण प्रकरणात नगरपरिषदेच्या अध्यक्षा व मुख्याधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष घालून संबंधितांवर कारवाई करावी व मालमत्ता हस्तांतरण प्रक्रिया तात्काळ पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणी प्रशासन काय निर्णय घेते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# वारी हनुमान परिसरात वाघाचा शिरकाव

## गाढवाची शिकार, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

■ **प्रतिनिधी | हिवरखेड** ■

अकोला जिल्ह्यातील हिवरखेड नजीकच्या वारखेड परिसरात गेल्या महिनाभरापासून वाघाचा वाढता वावर नागरिकांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. अनेक पाळीव प्राण्यांची शिकार केल्यानंतर आता या वाघाने थेट वारी हनुमान येथील मानवी वस्तीत शिरकाव केल्याने भीतीचे वातावरण अधिकच गडद झाले आहे.

शनिवार (दि. १८ एप्रिल) रोजी पहाटे वाघाने एका पाळीव गाढवाची निर्दयी शिकार केल्याची घटना उघडकीस आली. या घटनेमुळे स्थानिक शेतकरी, शेतमजूर आणि नागरिकांमध्ये प्रचंड दहशत निर्माण झाली आहे. यापूर्वी वारखेड-सौंदळा शिवारात धुमाकूळ घालणाऱ्या वाघाची मजल आता मानवी वस्तीपर्यंत पोहोचल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

स्थानिकांच्या मते, वाघाचा वाढता धोका लक्षात घेऊनही वन विभागाकडून अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. पिंजरा लावून वाघाला जेरबंद करण्याबाबत प्रस्ताव पाठवूनही वरिष्ठ स्तरावरून मान्यता न मिळाल्याने संताप व्यक्त केला जात आहे. 'मानवी जीवितहानी झाल्यानंतरच कारवाई होणार का?' असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत. दरम्यान, वन विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. 'मेळघाट बफर झोनमध्ये वाघाचा वावर वाढला आहे. वाघाला पकडण्यासाठी वरिष्ठ स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात आला असून मान्यता मिळताच आवश्यक ती कारवाई करण्यात येईल,' अशी माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी सुधीर आंबेकर यांनी दिली. दरम्यान, वाघाचा बंदोबस्त तातडीने करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.



### भाविकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

वारी हनुमान परिसरात दररोज मोठ्या संख्येने भाविक व पर्यटकांची वर्दळ असते. अशा परिस्थितीत वाघाचा वावर वाढल्याने त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न ऐरणीवर आला आहे. शेतकरी व नागरिकांसह भाविकांचा जीव धोक्यात असल्याची भावना व्यक्त होत आहे.

# नागरिकांना महानगरात 'सनकुल' औषधाचे मोफत वितरण



■ **प्रतिनिधी | अकोला** ■

पर्यावरण संवर्धन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या रानमित्र' संघटना व 'चव्हाण होमिओपॅथिक क्लिनिक' यांच्या संयुक्त विद्यमाने नागरिकांचे उन्हापासून रक्षण व्हावे यासाठी महानगरात 'सनकुल' औषधाचे मोफत वितरण करण्यात आले.अकोल्याचा वाढता भीषण उन्हाळा लक्षात घेता अकोलेकरांना तो सुसह्य व्हावा यासाठी पावले रानमित्र संघटना व चव्हाण होमिओपॅथिक क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. रानमित्र संघटनाच्या अध्यक्ष डॉ. पल्लवी दिवेकर यांच्या नेतृत्वात जठार पेठ चौक येथे आयोजित या वितरण उपक्रमात होमिओपॅथिक तज्ञ डॉ. योगिता चव्हाण यांनी या औषधीची उपयुक्तता प्रतिपादीत केली. हे औषध लहान बाळांपासून ते वरिष्ठ नागरिक कोणालाही चालते व याने उन्हामुळे होणाऱ्या त्रासांपासून बचाव होतो व याचे कोणतेही साईड इफेक्ट्स नाहीत हे स्पष्ट केले.जागतिक होमिओपॅथी दिनचे औचित्य साधून चव्हाण होमिओपॅथिक क्लिनिकच्या डॉ. योगिता चव्हाण व रानमित्रच्या पदाधिकाऱ्यांच्या हस्ते हे औषध वितरित करण्यात आले. यावेळी सुमारे ३०० नागरिकांनी याचा लाभ घेतला. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी रानमित्र संघटनेच्या श्रीमती सुनयनादेवी गोयनका, दीप्ती अग्रवाल, माधवी तायडे, हरसिमरन कौर जनेजा, किरण हिरानंदानी, राणी ठाकूर, दिपाली माथने, सौरभ पोफळी, महादेव मेहंगे, विठ्ठल नाकट यांनी विशेष मेहनत घेतली.

## राजेश मिश्रावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करा

**अकोला :** जातीवाचक व आक्षेपार्ह विधान करणाऱ्या राजेश मिश्रावर प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे समाजवादी पार्टीचे अकोला महानगर अध्यक्ष इब्राहिम खालीक यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे. राजेश मिश्रा द्वारा मुस्लिम समाजाच्या विरोधात आक्षेपार्ह विधान करुन ते व्हिडीओ रेकॉर्डींग करुन समाज माध्यमाद्वारे प्रसारित केल्यामुळे शहरातील शांतता व सुव्यवस्था भंग करण्याचा प्रयत्न या माध्यामातून होत आहे.

# तेल्हाऱ्यात उष्माघाताचा धोका वाढतोय; 'उष्माघात कक्ष' अद्यापही कागदावरच

### अर्धा उन्हाळा उलटला तरी उपाययोजनांचा अभाव; नागरिकांत संताप

**तेल्हारा :** तालुक्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका तीव्र होत असताना प्रशासनाची उदासीनता समोर येत आहे. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उभारला जाणारा 'उष्माघात कक्ष' अद्यापही प्रत्यक्षात सुरू झालेला नसून ही बाब चिंतेचा विषय ठरत आहे.

एप्रिल महिना संपत आला असून उन्हाळ्याचा अर्धा कालावधी उलटून गेला आहे. तापमानाने ४० अंश सेल्सिअसचा टप्पा पार केला असतानाही शहरातील मुख्य शासकीय रुग्णालये तसेच ग्रामीण आरोग्य केंद्रांमध्ये उष्माघातग्रस्त रुग्णांसाठी स्वतंत्र कक्ष उभारण्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसत नाही. ग्रामीण भागातील परिस्थिती अधिकच गंभीर आहे. शेतकरी, शेतमजूर आणि रोजंदारीवर काम करणारे नागरिक दिवसभर कडक उन्हात काम करत असून त्यांना उष्माघाताचा सर्वाधिक धोका निर्माण झाला आहे. मात्र प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये थंड पाण्याची व्यवस्था, आवश्यक औषधे आणि प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव असल्याचे वास्तव समोर येत आहे. दरवर्षी उन्हाळ्यापूर्वीच उष्माघात प्रतिबंधक उपाययोजना सुरू करणे अपेक्षित असताना यंदा मात्र प्रशासनाची तयारी अपुरी ठरत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. 'घटना घडल्यानंतरच प्रशासन जागे होणार का?' असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, आरोग्य विभागाने तातडीने प्रत्येक शासकीय रुग्णालय व ग्रामीण आरोग्य केंद्रात स्वतंत्र उष्माघात कक्ष सुरू करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी जोर धरत आहे. अन्यथा वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर एखादी गंभीर घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे.ष्उन्हाळ्याची तीव्रता वाढत असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याचे चित्र असून वेळेत उपाययोजना न झाल्यास परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

## गरजूंना मोफत घागर वितरण उपक्रम

**अकोला :** सामाजिक सेवाभावी कार्यात सदा सक्रिय असणाऱ्या अग्रनारी प्रांतीय महिला असो. अग्रवाल महिला मंडळ तथा अ भा अग्रवाल महासभाच्या महिला पदाधिकाऱ्यांनी गरजू महिलांना मोफत पाण्याच्या घागरी व पादत्राणे वितरित केलीत.स्थानीय रामदेवबाबा-श्यामबाबा मंदिर परिसरात आयोजित कार्यक्रमात गरजू महिलांनी एकच गर्दी करीत या उपक्रमाच्या लाभ घेतला.

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५८८/२०२६ — प्रोसेस नं.५२६९/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. राजेश काशीराम भटकर रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला. मो. क्र. ९६०४३४१४३५ २. रेखाबाई गणेश बायस्कर रा. व्याळा, ता. बाळापूर, जि. अकोला. ३. भारती समाधान चोपडे रा. कापशी, ता. जि. अकोला. ४. सूर्यकांता गणेश वाघ रा. उकळी बाजार, ता. तेल्हारा, जि. अकोला. ५. मंगला राजेश जवंजाळ रा. साईनाथ नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ६. काशिराम मोतीराम भटकर रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लिलाबाई काशिराम भटकर
**पत्ता :-** रा. डोंगरगाव, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लिलाबाई काशिराम भटकर यांचे दि. ०४/०८/२००७ रोजी राहत्या घरी डोंगरगाव, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीस व्दारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे मंगेश जगदेव वावकर यांचे मालकीचे प्लॉट चे साखळी चे मूळ रजी. खरेदी खत क्र. १०८२ दिनांक २०/०३/२००२ या क्रमाकाचे मूळ खरेदी खत दि. १५/०४/२०२६ रोजी चांदूर ते खदान परिसर अकोला येथून हरवले आहे त्याबाबत मंगेश जगदेव वावकर यांनी दि. १६/०४/२०२६ रोजी online तक्रार दाखल केली आहे, त्याचे तक्रार क्र. १९३७३०३००७२६००१०७ असा आहे.

तरी सदरहु वरील क्रमांकाचे मुळ खरेदी बाबत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, गहाण, बोजा, बक्षीस, अधिकार संबंध, तसेच न्यायालयीन प्रकरणे अथवा इतर अधिकार इत्यादी असल्यास त्यांनी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १४ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर लेखी कागदपत्रांसह आक्षेप नोंदवावा. विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप न आल्यास कोणाचाही आक्षेप नाही असे गृहीत धरण्यात येईल व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही. सदरहु वरील वर्णनाचे मुळ खरेदी खत कोणासही मिळाल्यास खालील नमुद पत्यावर १४ दिवसाचे आत आणुन देण्यात यावे याची नोंद घ्यावी. तरी सदरहु वृत्तपत्रामध्ये संबंधीत जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात यावी, ही विनंती करीता ही जाहीर नोटीस.

ठिकाण :-
दिनांक १७/०४/२०२६

**ॲड. अजय. वा. गोडे**
शॉप क्र. २३ - ए, दुसरा माळा, शाकंभरी स्क्वेअर, दुर्गा चौक, अकोला, ता. जि. अकोला,
मो.क्र. ९१७५८३८२४२

जनमाध्यम — जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १३५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४७७/२०२५ — जा. क्र. ११४९/२०२६
ने.ता. १५/०५/२०२६ — दिनांक : १३/०४/२०२६
**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** राहुल सदाशिव वानखडे व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र . २) चंदन विक्रम वानखडे रा. साईकृपा सोसायटी, मते लेआउट, लक्ष्मी नगर, उमरी, अकोला ता. जि. अकोला क्र. ३) आशुतोष स्वरुपराव महाजन रा. मालोदे किराणा जवळ, गजानन नगर, डाबकी रोड, उमरी, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. ९९,४९१/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही.

वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. १५ माहे मे, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतफी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. १३ माहे एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शितकंयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### चौकशीची जाहिर नोटीस

**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**

जा.क्र/१०२८/ २०२६ — दि. १८/०४/२०२६
अर्ज क्र. ३६/२०२६ कलम -१९

**सार्वजनिक न्यासाचे नाव :** मरी माता मंदिर संस्थान ट्रस्ट, बाळापुर जि. अकोला
**अर्जदार :-** श्री अनिल सुरेंद्र धनोकार रा. कासारखेड बाळापुर ता. बाळापुर जि. अकोला

सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त अकोला विभाग अकोला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय? २) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन) :-** ५०५/- रुपये अनिल सुरेंद्र धनोकार यांचे जवळ जमा.
**(आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त - १, अकोला यांच्या शिक्कयानीशी आज दिनांक-१६/०४/२०२६ रोजी दिली.

शिक्का
**अधिक्षक**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
अकोला विभाग अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५९१/२०२६ — प्रोसेस नं.५१९३/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ — दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** विलास रामकृष्ण मेहरे रा. सिद्धार्थ नगर, हरिहरपेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ८९७५६७८४९५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : राजाराम मारोती मेहरे
**पत्ता :-** रा. सिद्धार्थ नगर, हरिहरपेठ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत राजाराम मारोती मेहरे यांचे दि. ०१/०२/२००१ रोजी राहत्या घरी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४७६/२०२५ — जा. क्र. ११४८/२०२६
ने.ता. १५/०५/२०२६ — दिनांक : १३/०४/२०२६
**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** प्रियंका राहुल वानखडे व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र . २) चंदन विक्रम वानखडे
रा. साईकृपा सोसायटी, मते लेआउट, लक्ष्मी नगर, उमरी, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२६,६६८/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्सं देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी दि. १५ माहे मे, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे.

उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. १३ माहे एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५४५/२०२६ — प्रोसेस नं.४९३७/२०२६
चौ.ता. ०६/०५/२०२६ — दिनांक : ०९/०४/२०२६

**अर्जदार :** १. पुष्पा रमेश रत्नपारखी रा. वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. उज्वल रमेश रत्नपारखी रा. फडके नगर, चितोडे किराणा दुकानाजवळ, डाबकी रोड, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ३. उषा अशोक पगुलवे रा. ६६- पाटील पुरा, आगर, ता. जि. अकोला. ४. मुकेश रमेश रत्नपारखी रा. वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ५. युवराज रमेश रत्नपारखी रा. फडके नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ६. मनिषा रमेश रत्नपारखी रा. वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रमेश तुळशीराम रत्नपारखी
**पत्ता :-** रा. वानखडे नगर, डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रमेश तुळशीराम रत्नपारखी यांचे दि. ११/०७/२०२४ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०६/०५/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०९/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५१७/२०२६ — प्रोसेस नं.५१९८/२०२६
चौ.ता. १८/०६/२०२६ — दिनांक : १६/०४/२०२६

**अर्जदार :** १. अनिता कमल तिवारी २. रोहित कमल तिवारी दोघेही रा. किल्ल्याजवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : कमल गोपालप्रसाद तिवारी
**पत्ता :-** रा. किल्ल्याजवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत कमल गोपालप्रसाद तिवारी यांचे दि. ०८/०९/२०१० रोजी मिडास हॉस्पिटल, नागपूर येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १८/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर समन्स

**मा. न्यायाधीश, सहकार न्यायालय, अकोला यांचे न्यायालयात**

दावा क्र. ४७८/२०२५ — जा. क्र. ११५१/२०२६
ने.ता. १५/०५/२०२६ — दिनांक : १३/०४/२०२६
**वादी :-** भारतीय सिंधु सहकारी पतसंस्था मर्या. अकोला

**विरुद्ध**

**प्रतिवादी :-** शेख लुकमान शेख रहेमान व इतर
प्रति,
प्रतिवादी क्र. १) शेख लुकमान शेख रहेमान
रा. लक्ष्मी नगर, मक्का मसजीद जवळ जुने शहर अकोला ता. जि. अकोला क्र. ३) सुमय्या परवीन शेख लुकमान रा. पाकीजा टेलर, लक्ष्मी नगर, मक्का मसजीद जवळ, जुने शहर, अकोला ता. जि. अकोला

ज्याअर्थी वादी यांनी तुमच्याविरुध्द कर्ज रक्कम रु. १,२३,५२३/- वसुलीबाबत दावा दाखल केला आहे. सदर दाव्यात दिलेल्या पत्त्यावर वारंवार समन्स पाठवुनसुद्धा समन्स तमिल होऊ शकला नाही. वादीकडे तुमचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदर जाहीर समन्स देण्यात येत आहे. तुम्हाला याद्वारे सदर दाव्याचा जबाब देण्यासाठी १५ माहे मे, २०२६ रोजी मध्यान्ही ११.०० वाजता सहकारी न्यायालय, अकोला या न्यायालयात जातीने हजर राहण्याचे सुचित करण्यात येत आहे व आपल्या बचावाच्या पुष्ठयर्थ तुम्ही आधार घेऊ इच्छिता, असे सर्व दस्तऐवज त्यादिवशी रुजु (पेश) करण्याचा तुम्हाला आदेश देण्यात येत आहे. उपरोक्त दिवशी तुम्ही हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत दाव्याची / वादाची एकतर्फी सुनावणी होऊन निर्णय देण्यात येईल, याची दखल घ्यावी. आज दि. १३ माहे एप्रिल, २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी प्रस्तुत केला असे. मा. न्यायाधीश यांचे आदेशान्वये.

शिक्का
**(ए. डब्ल्यू. इंगळे)**
न्यायालयीन लिपीक,
सहकार न्यायालय, अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५७९/२०२६ — प्रोसेस नं.५१२४/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : १५/०४/२०२६

**अर्जदार :** १. नसीम बानो शरीफोद्यीन २. मोहम्मद अजहरोद्यीन मोहम्मद शरीफुद्दीन ३. सायमा अंजुम शरीफोधीन सर्व रा. हजीरा नगर, अमरावती. ता. जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शरीफोद्यीन अफसरोद्यीन
**पत्ता :-** रा. व्दारा सलाउद्दीन अफसरोद्यीन अगरवेस, भिम नगर चौक, सेवा मेडिकल समोर, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शरीफोद्यीन अफसरोद्यीन यांचे दि. १२/११/२०२४ रोजी निधन झाले आहे. वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ५१८/२०२६ — प्रोसेस नं.५१३७/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : १५/०४/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती अनिता कमल तिवारी २. रोहित कमल तिवारी क्र. १ ब २ रा. किल्ल्याजवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला. ३. विजय गोपालप्रसाद तिवारी रा. गोरगांव खुर्द, ता. जि. अकोला. ४. प्रदिपकुमार गोपालप्रसाद तिवारी रा. किल्ल्याजवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गोपालप्रसाद कामताप्रसाद तिवारी
**पत्ता :-** रा. किल्ल्याजवळ, जुने शहर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गोपालप्रसाद कामताप्रसाद तिवारी यांचे दि. ०७/०६/१९८८ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १७/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# आज उजळणार समतेचा दीप

## क्रांतीसूर्य महात्मा बसवेश्वर जयंती



**वर्धा/जनमाध्यम**


समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश देणारे महात्मा बसवेश्वर यांची ८९५ वी जयंती आज, अक्षय तृतीया (दि. १९ एप्रिल २०२६) रोजी वर्धा येथे उत्साहात साजरी होत आहे. वीरशैव सेवा मंडळ, वर्धा यांच्या वतीने रामनगर येथील शिवमंदिर सभागृहात या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.आज सकाळी ९ वाजता प्रा. डॉ. राजेंद्र गंजीवाले यांच्या हस्ते महात्मा बसवेश्वरांच्या पुतळ्याचे पूजन व हारार्पण करण्यात येणार आहे. त्यानंतर आयोजित प्रबोधनपर कार्यक्रमात श्री विजयराव माजरखेडे आणि श्रीधर धामणकर हे मान्यवर बसवेश्वरांच्या जीवनकार्यावर आपले विचार मांडणार आहेत.समाजातील विषमता, अंधश्रद्धा आणि अन्यायाविरुद्ध लढा देत समानतेची शिकवण देणाऱ्या बसवेश्वरांच्या जयंतीनिमित्त आज वर्ध्यात सामाजिक ऐक्याचे दर्शन घडणार आहे.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रसाद वितरण करण्यात येणार असून, या सोहळ्यास वीरशैव लिंगायत समाजातील बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# ‘सुपर हॉट’ वर्धा; पारा ४४.०४ वर

## राष्ट्रपतींच्या दौऱ्यासाठीच का ‘उन्हाची ढाल’? पालकांचा आरोप; उष्णतेत विद्यार्थ्यांची कसरत सुरूच

### ४४° ला सुट्टी शाळेला, आता मात्र प्रशासनाची चुप्पी



**वर्धा/जनमाध्यम**

उन्हाचा पारा ४४ अंशांवर गेला की शाळांना सुट्टी पण ४४.४ अंशांवर मात्र वर्ग सुरूच वर्धा जिल्ह्यातील पालक वर्गाने प्रशासनाच्या या ‘दुहेरी निकषां’वर जोरदार प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. १६ एप्रिल रोजी ४४ अंश सेल्सिअस तापमानाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी यांनी सर्व शाळांना सुट्टी जाहीर केली होती. मात्र, त्यानंतर दुसऱ्याच दिवशी तापमान आणखी वाढून ४४.४ अंशांवर पोहोचले असताना शाळा सुरू ठेवण्याचा निर्णय घेतल्याने पालक संतप्त झाले आहेत.

याच पार्श्वभूमीवर एक गंभीर चर्चा रंगू लागली आहे, खरंच सुट्टी उष्णतेमुळे होती का, की राष्ट्रपतींच्या दौऱ्यामुळे कारण १६ एप्रिल रोजी देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा जिल्हा दौरा नियोजित होता. त्यांच्या दौऱ्यामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर वाहतूक निर्बंध लावण्यात आले होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना होणारा त्रास टाळण्यासाठी शाळा बंद ठेवण्यात आल्या, अशीही चर्चा पालकांमध्ये रंगू लागली आहे.

पालकांचा मुद्दा सरळ आहे, जर रस्ते बंद असल्यामुळे आणि सुरक्षा कारणास्तव सुट्टी देण्यात आली असेल, तर ते स्पष्ट सांगावे. आणि जर खरोखरच उष्णतेमुळेच निर्णय घेतला असेल, तर १७ एप्रिल रोजी तापमान अधिक असतानाही शाळा का सुरू ठेवल्या या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर अद्याप मिळालेले नाही. दरम्यान, हवामान खात्याने पुढील दोन-तीन दिवसांत तापमान ४५ ते ४६ अंश सेल्सिअसपर्यंत जाण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. त्यामुळे परिस्थिती आणखी गंभीर होण्याची शक्यता आहे. अशा वेळी लहान मुलांच्या आरोग्याचा विचार करून प्रशासनाने तातडीने स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी पालक वर्गातून जोर धरू लागली आहे.उष्णतेच्या या प्रखर लाटेत विद्यार्थ्यांना शाळेत पाठवणे धोकादायक ठरू शकते, असे तज्ज्ञांचेही मत आहे. त्यामुळे सुट्टीचा निर्णय नेमका कशावर आधारित हा प्रश्न आता वर्ध्यात चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे.एकूणच, तापमानाच्या वाढत्या पाऱ्यासोबतच प्रशासनावरील प्रश्नांचाही ‘पारा’ चढताना दिसत आहे.

# बैलजोडी मागे, ट्रॅक्टर पुढे; पण शेतकऱ्यांच्या खिशाला चटका

**साहूर-** खरीप हंगामाची चाहूल लागलेली असताना रब्बी हंगामाचा शेवट होताच साहूर परिसरात उन्हाळी मशागतींना वेग आला आहे. शेतशिवारात नांगरणी, वखरणीची लगबग सुरू झाली असली तरी या हालचालींमागे एक कटू वास्तव उभं आहे, मजुरांची तीव्र टंचाई आणि वाढतं यांत्रिकीकरण! एकेकाळी बैलजोडीच्या टापांनी दणाणणारी शिवारं आज ट्रॅक्टरच्या घरघरीने दुमदुमू लागली आहेत. मजूर मिळेनासे झाल्यामुळे शेतकऱ्यांनी ट्रॅक्टरकडे वळण घेतले आहे. पण ही सोय आता महागडी ठरू लागली आहे. इंधन दरवाढीचा फटका बसताच ट्रॅक्टरधारकांनी नांगरणी-वखरणीचे दर वाढवले आहेत, आणि त्याचा थेट परिणाम शेतकऱ्यांच्या खिशावर होत आहे.पूर्वी प्रत्येक शेतकऱ्याच्या अंगणात गाय, बैल, म्हैस अशी पशुधनाची रेलचेल असायची. आज मात्र चाऱ्याच्या टंचाईमुळे आणि देखभालीच्या वाढत्या खर्चामुळे अनेकांनी आपली जनावरे विक्रीस काढली आहेत. परिणामी, ग्रामीण भागातील पशुधनाची संख्या दिवसेंदिवस घटताना दिसते आहे.शेतीसाठी सालदार गडी मिळेनासे झाल्याने पारंपरिक शेती पद्धती आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहेत. बैलजोडीने होणारी मशागत आता दुर्मिळ होत चालली असून, ट्रॅक्टरशिवाय पर्याय उरलेला नाही. मात्र या यांत्रिकीकरणाचा खर्च वाढत चालल्याने शेतकरी आर्थिक कात्रीत सापडत आहे.ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मानला जाणारा शेतकरी आज दुहेरी संकटात सापडला आहे, एकीकडे मजुरांची कमतरता, तर दुसरीकडे वाढते इंधन व मशागत खच. ‘पारंपरिक शेतीची ओळख असलेली बैलजोडी आता हळूहळू अदृश्य होत आहे.

## संक्षिप्त

### पैशाच्या वादातून भावाकडून मारहाण

**सेलू-** तालुक्यातील अंतरगाव येथे पैशाच्या कारणावरून दोन भावांमध्ये वाद होऊन मारहाणीची घटना घडली. चानू शिंदे (३५) हे पत्नीसमवेत घरी जेवण करत असताना त्यांचा मोठा भाऊ मन्ना शिंदे घरी आला. उसनवारी दिलेल्या पैशाच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वाद वाढताच मन्ना शिंदे याने चानू व त्यांच्या पत्नीला मारहाण केली. या घटनेत दोघे जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी दाखल करण्यात आले. घटनेनंतर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणी सेलू पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे. कौटुंबिक वादाचे हिंसक रूप धारण झाल्याने चिंता व्यक्त होत आहे.

### स्लॅबवरून पडून वृद्धाचा मृत्यू

**पुलगाव-** शहरातील गौरक्षण फैल परिसरात एका वृद्धाचा स्लॅबवरून पडून मृत्यू झाला. रामराव फुंडे (७५) असे मृताचे नाव आहे. ते घराच्या स्लॅबवर काम करत असताना तोल जाऊन खाली पडले. या घटनेत ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. अपघातानंतर नागरिकांनी सुरक्षेची काळजी घेण्याची गरज व्यक्त केली आहे. या प्रकरणी पोलिसांनी गुन्हा नोंद केला असून पुढील तपास सुरू आहे.

### युवकाची कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या

**अल्लीपूर -** परिसरातील खानगाव येथे एका युवकाने कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मनोज फुसाटे असे मृताचे नाव आहे. तो दारूच्या व्यसनाधीन होता, अशी माहिती समोर आली आहे. घटनेपूर्वी तो घरी आला असता कुटुंबीयांशी वाद झाला. त्यानंतर तो घरातून निघून गेला. काही वेळाने शेतात त्याने विषारी औषध प्राशन केले. ही बाब उघड होताच त्याला उपचारासाठी नेण्यात आले, मात्र त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. अल्लीपूर पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

# घरफोडीच्या सत्राला पोलिसांचा ‘कडक’ ब्रेक

## सराईत चोरट्यांना बेड्या; कारंजा पोलिसांची धडाकेबाज कारवाई



**कारंजा (घा.)/जनमाध्यम**

गेल्या काही दिवसांपासून शहरात घरफोडीच्या घटनांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असताना, कारंजा पोलिसांनी तातडीची मोहीम राबवत या सत्राला जोरदार ब्रेक लावला आहे. तीन सराईत आरोपींना अटक करत पोलिसांनी अनेक घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणले असून शहरवासीयांनी दिलासा घेतला आहे.

ठाणेदार प्रल्हाद मदन यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथक विना नंबर प्लेटच्या दुचाकींवर लक्ष ठेवून होते. १७ एप्रिल रोजी पेट्रोलिंगदरम्यान मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बिहाडी रोड परिसरात नाकाबंदी केली. विना नंबर प्लेटच्या दुचाकीवरून जाणाऱ्या तीन संशयितांना अडवून ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपींनी उडवाउडवीची उत्तरे दिली, मात्र पोलिसांनी कसून तपास करताच त्यांच्या ताब्यातून घरफोडीसाठी वापरले जाणारे दोन लोखंडी रॉड जप्त करण्यात आले.अटक आरोपींमध्ये आशिष उर्फ ‘दसचक्का’ नारायण कुशवाहा (२६), सुरज नारायण कुशवाहा (२२) आणि एका विधीसंघर्षित बालकाचा समावेश आहे. आशिषवर नागपूर जिल्ह्यात घरफोडीचे तब्बल २० ते २५ गुन्हे दाखल असून तो यापूर्वी झांशी येथून तडीपार होता. सुरजवर काटोल व मध्य प्रदेशात चार गुन्ह्यांची नोंद आहे. तिन्ही आरोपी मरामाय नगर, काटोल (जि. नागपूर) येथील रहिवासी आहेत.पोलिसी खाक्या दाखवताच आरोपींनी गुन्ह्यांची कबुली दिली.

१४ एप्रिल रोजी बिहाडी रोडवरील घरफोडी तसेच कारंज्यातील वॉर्ड क्रमांक १६, राजा भोज कॉलनी आणि जगदंबा कॉलनीतील चोरीचे प्रकार त्यांनी कबूल केले. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून दोन मोटारसायकली, घरफोडीचे साहित्य आणि दोन मोबाईल जप्त केले आहेत.ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार प्रल्हाद मदन व त्यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली. सध्या आरोपींची सखोल चौकशी सुरू असून, या गुन्हेगारी साखळीतील आणखी धागेदोरे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. कारंजा पोलिसांच्या या कारवाईमुळे शहरात कायद्याचा धाक पुन्हा प्रस्थापित झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# वर्धा जिल्ह्यात प्रथम येणाऱ्या यथार्थ जनईकरचा सत्कार



**हिंगणघाट/जनमाध्यम**

मेहनत, जिद्द आणि अभ्यासातील सातत्य यांची सांगड घालत सीबीएसई दहावी परीक्षेत तब्बल ९९.४० टक्के गुण मिळवत वर्धा जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावणाऱ्या यथार्थ कौस्तुभ जनईकर याचा नारायण सेवा मित्र परिवार, हिंगणघाट यांच्या वतीने उत्साहात सत्कार करण्यात आला.

भारतीय विद्या भवनचा विद्यार्थी असलेल्या यथार्थने आपल्या यशाने केवळ कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण जिल्ह्याचे नाव उज्ज्वल केले आहे. त्याच्या या उल्लेखनीय यशाबद्दल मित्र परिवाराने थेट त्याच्या निवासस्थानी भेट देत शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव केला. या प्रसंगी त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी यथार्थची आजी, जी.बी.एम.एम. कनिष्ठ महाविद्यालयाच्या माजी प्राचार्य लतिका बेलेकर तसेच आई डॉ. नमिता जनईकर यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. यथार्थच्या यशामागे कुटुंबीयांचे मार्गदर्शन आणि पाठबळ महत्त्वाचे ठरल्याचे उपस्थितांनी नमूद केले.सत्कारानंतर बोलताना यथार्थने भविष्यात शास्त्रज्ञ होण्याची महत्त्वाकांक्षा व्यक्त केली. ज्ञानाच्या बळावर समाजासाठी काहीतरी मोठें करायचे आहे, असे त्याचे ठाम मत यावेळी उमटले.

या कार्यक्रमाला नारायण सेवा मित्र परिवाराचे अध्यक्ष महेश अग्रवाल, सचिव पराग मुडे यांच्यासह दुर्गाप्रसाद यादव, प्रा. किरण वैद्य, रामदास खाडगी, नेताजी लाजूरकर, रवी दुशेट्टीवार, त्र्यंबक एटीवार, बबीता जोशी, कंचन खिवसरा, अनुराधा मोटवानी, विजया लाजूरकर, किरण अग्रवाल, वीरश्री मुडे, डॉ. दिपाली बोंडे, भाग्यश्री खियाणी, नंदिनी जवादे, शुभांगी वैद्य आदी पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. यथार्थच्या या झळाळत्या यशाने हिंगणघाट परिसरात अभिमानाची भावना निर्माण झाली असून, त्याच्या पुढील वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# दुचाकी अपघातात तिघे जखमी

वर्धा-शहरातील देवळी नाका परिसरात दोन दुचाकींच्या धडकेत तिघे जखमी झाले. प्रवीण कैथवास (३६) रा. भीमनगर वार्ड हे मुलगा श्रेयांशू (७) व पुतणी जान्हवी (१०) यांना घेऊन दुचाकीने घरी जात होते. जेठवा यांच्या दुकानाजवळ मागून आलेल्या दुसऱ्या दुचाकीने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. या अपघातात तिघांनाही दुखापत झाली असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. अपघातानंतर परिसरात काही काळ गर्दी झाली होती. वाहतुकीचा वेग आणि निष्काळजीपणा हे अपघाताचे प्रमुख कारण असल्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

# पांदण रस्त्याला अखेर मोकळा श्वास

## २५ वर्षांच्या प्रतीक्षेला पूर्णविराम; महसूल यंत्रणेची धडक कारवाई



**वर्धा/जनमाध्यम**

तालुक्यातील पवनूर येथील शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी घटना घडली असून, अनेक वर्षांपासून अतिक्रमणाच्या विळख्यात अडकलेला पांदण रस्ता अखेर पूर्णतः मोकळा करण्यात आला. बुधवारी झालेल्या या कारवाईमुळे सुमारे ७० ते ८० एकर शेतीची वहिवाट पुन्हा सुरळीत झाली आहे.

गेल्या २५ ते ३० वर्षांपासून हा रस्ता विविध कारणांनी प्रलंबित होता. अतिक्रमणामुळे शेतकऱ्यांना शेतात जाणे, पिकांची वाहतूक करणे कठीण झाले होते. त्यामुळे शेतकरी अक्षरशः हवालदिल झाले होते. अखेर मुख्यमंत्री बळीराजा पांदण रस्ता योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी दीपक करंडे व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे अर्ज सादर केला होता. त्याची दखल घेत महसूल प्रशासनाने तातडीने कारवाई करत हा रस्ता मोकळा केला.या मोहिमेत आंजी (मोठी) मंडळाच्या मंडळ अधिकारी प्रतिभा जवंजाळ, तलाठी प्रशांत धोटे, महसूल सेवक राजेश चौधरी तसेच पोलीस पाटील हेमलता गवळी पाटणकर यांनी सक्रिय सहभाग घेतला. अतिक्रमण करणाऱ्या किसन कोंढणकर यांना ताकीद देत रस्त्याचे सीमांकन करण्यात आले. या कारवाईवेळी श्रीराम कडू, मेघराज चौधरी, सुरेश चौधरी, सुरेश भगत, बाबाराव चौधरी, गुणवंत तुरणकर, सदानंद काटोले आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रस्ता मोकळा झाल्याने आता शेतमालाची ने-आण सुलभ होणार असून दळणवळणाच्या दृष्टीनेही हा मार्ग अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा मानला जातो. अशा परिस्थितीत त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. महसूल विभागाने केलेल्या या धडक कारवाईमुळे पवनूर परिसरातील शेतकऱ्यांना नवसंजीवनी मिळाली असून, त्यांनी प्रशासनाचे मनापासून आभार मानले आहेत.

# वायफड सर्कलमध्ये ‘आमदार आपल्या दारी’ उपक्रम

## नागरिकांच्या समस्या जागीच मार्गी



**देवळी/जनमाध्यम**

महसूल व वन विभागाच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान आमदार आपल्या दारी’ या उपक्रमांतर्गत वायफड सर्कलमध्ये नागरिकांशी थेट संवाद साधण्याचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमातून विविध विभागांशी संबंधित तक्रारी ऐकून त्यांचे तात्काळ निराकरण करण्यावर भर देण्यात आला.

या वेळी आमदार राजेश बकाने यांनी नागरिकांच्या अडचणी प्रत्यक्ष जाणून घेतल्या. महसूल, वन, आरोग्य, ग्रामविकास आदी विभागांशी निगडित अनेक प्रश्न नागरिकांनी मांडले.

त्यापैकी काही तक्रारींचे जागीच निराकरण करण्यात आले, तर उर्वरित प्रकरणांवर तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. शासनाच्या योजना लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रशासनाने गावपातळीवर जाणे गरजेचे आहे. नागरिकांचा वेळ व खर्च वाचवून त्यांना त्वरित सेवा देणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे, असे आमदार बकाने यांनी सांगितले.कार्यक्रमाला देवळी नगरपरिषद उपाध्यक्ष राहुल चोपडा, तहसीलदार संदीप पुंडेकर, गटविकास अधिकारी शेवाळे, भूमिलेख अधिकारी बंग, तालुका आरोग्य अधिकारी दिघीकर, नायब तहसीलदार धर्माधिकारी व चीनावर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच भाजपा सेवाग्राम मंडळाचे अध्यक्ष गौरव गावंडे, जिल्हा सचिव नंदकिशोर झोटिंग आणि इतर पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी विविध शासकीय सेवांचा लाभ मिळाल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. प्रशासन व लोकप्रतिनिधी यांच्यातील समन्वयातून नागरिकांच्या समस्या अधिक वेगाने सोडविण्यासाठी अशा उपक्रमांना पुढेही प्राधान्य दिले जाणार असल्याचे सांगण्यात आले.

# सौर कृषीपंपधारकांसाठी महावितरणची विशेष शिबीर

## तक्रारींचे तात्काळ निवारण



**वर्धा/जनमाध्यम**

वर्धा जिल्ह्यातील सौर कृषीपंपधारक शेतकऱ्यांच्या तक्रारी आणि तांत्रिक अडचणींचे त्वरित निवारण करण्यासाठी महावितरणतर्फे विभागनिहाय विशेष तक्रार निवारण शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या २१, २२ आणि २३ एप्रिल २०२६ रोजी ही शिबिरे पार पडणार असून, शेतकऱ्यांना थेट दिलासा देण्याचा प्रयत्न यामागे आहे.

राज्य सरकारच्या ‘मागेल त्याला सौर कृषीपंप’ योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा सिंचनाची सुविधा उपलब्ध झाली आहे. यामुळे रात्रीच्या धोकादायक सिंचनापासून सुटका झाली असली, तरी काही ठिकाणी तांत्रिक बिघाड, पंप बंद पडणे, पाणी उचलण्याची क्षमता कमी होणे अशा समस्या समोर येत आहेत. तसेच माकड व पक्ष्यांचा उपद्रव, नैसर्गिक आपत्तीमुळे सौर पॅनेलचे नुकसान, तसेच काही ठिकाणी संच चोरीच्या घटनाही नोंदविण्यात आल्या आहेत. याशिवाय, पूर्ण रक्कम भरूनही पंप बसवण्यात विलंब झालेल्या तक्रारींनाही या शिबिरात प्राधान्याने हाताळले जाणार आहे.महावितरणच्या वर्धा मंडळाच्या अधीक्षक अभियंता स्मिता पारखी यांनी सांगितले की, शेतकऱ्यांच्या अडचणी तातडीने सोडवणे ही आमची प्राथमिकता आहे. या शिबिरांमध्ये वरिष्ठ अभियंते, तांत्रिक कर्मचारी आणि सौर पंप बसवणाऱ्या एजन्सींचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे बहुतांश तक्रारी जागेवरच निकाली काढल्या जातील.

शिबिरांचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे आहे, २१ एप्रिल रोजी वर्धा येथील महावितरण विभागीय कार्यालय, ट्रेनिंग सेंटर येथे, २२ एप्रिल रोजी आर्वी येथील गोकुलकुंज, रेल्वे स्टेशन रोड येथे, तर २३ एप्रिल रोजी हिंगणघाट येथील फिल्टर युनिट, विभागीय कार्यालय येथे सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत शिबिरे होणार आहेत.महावितरणच्या या पुढाकारामुळे केवळ प्रलंबित तक्रारीच सुटणार नाहीत, तर सौर पंपांच्या देखभाल-दुरुस्तीबाबत शेतकऱ्यांच्या मनात असलेल्या शंकांचेही निरसन होणार आहे. वर्धा जिल्ह्यातील सर्व सौर कृषीपंपधारक शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या तक्रारींचे निवारण करून घ्यावे, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात आले आहे. या शिबिरामुळे जिल्ह्यातील कृषी सिंचन व्यवस्थेला अधिक बळकटी मिळेल, असा विश्वास देखील स्मीता पारखी यांनी व्यक्त केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १४२**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

## संक्षिप्त



### भिमजयंती उत्साहात,गुणवंतांचा सत्कार

**अंजनगाव बारी -** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त टिमटाळा येथे दिवसभर विविध कार्यक्रम झाले. सम्राट फाउंडेशन तर्फे राष्ट्रीय चित्रकला स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती अंजली करवाडे व भारतीय रेल्वेचे वरिष्ठ सेक्शन इंजिनीअर श्रीकांत कोटांगळे यांचा सत्कार करण्यात आला. ढोल-ताशांच्या गजरात निघालेल्या रैलीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला. रेल्वे स्टेशनवर कर्मचाऱ्यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला अभिवादन करून मसालेभात, मठ्ठा व गोड पदार्थांचे वाटप केले. तसेच एससी-एसटी रेल्वे कर्मचाऱ्यांकडून प्रवाशांना थंड शरबताचे वाटप करण्यात आले.

### मोहम्मद शहेजाद सौदागर यांची निवड

**चांदूर रेल्वे-**सामाजिक व राजकीय क्षेत्रात सक्रिय कार्य करणारे



चांदूर रेल्वे येथील मोहम्मद शहेजाद अब्दुल मजीद सौदागर यांची सकल मुस्लिम युवक महाराष्ट्र संघटनाच्या अमरावती जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील युवकांना संघटित करून समाजहिताचे विविध उपक्रम राबविण्याचा संकल्प शहेजाद सौदागर यांनी व्यक्त केला.

## जिल्ह्यात महावितरणच्या भरारी पथकाची कारवाई

# ५.८५ कोटींची वीज चोरी उघड, ३२० प्रकरणांचा भांडाफोड

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील वीज चोरी रोखण्यासाठी महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाच्या भरारी पथकाने वर्षभरात प्रभावी कारवाई करत ३२० वीज चोरी प्रकरणांचा भांडाफोड केला आहे. उपकार्यकारी अभियंता श्रीकांत तळेगावकर यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक अभियंता शंकर राऊत व सहकाऱ्यांनी ही मोहीम यशस्वीपणे राबवली.

जिल्ह्यात महावितरणच्या भरारी पथकाने विविध ठिकाणी धाडी मारत केलेल्या कारवाईत ३३ लाख २५ हजार ६०३ युनिट वीज चोरी झाल्याचे उघड झाले असून, त्याची किंमत सुमारे ५ कोटी ८४ लाख ६७ हजार रुपये इतकी आहे. महावितरणसाठी हा मोठा आर्थिक तोटा ठरू शकला असता, मात्र भरारी पथकाच्या सतर्कतेमुळे हे प्रकार वेळेत उघडकीस आले. महावितरणने ३२० पैकी २९८ प्रकरणांमध्ये तडजोडीची संधी देत ५ कोटी ४ लाख रुपयांची वसुली केली आहे. मात्र अद्याप २२ प्रकरणांमध्ये ८१ लाख ६३ हजार रुपयांची वसुली बाकी असून ती वसूल करण्यासाठी पुढील कारवाई सुरू आहे.या मोहिमेत ३२ प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्यात आले असून, विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. तसेच



कलम १२६ आणि इतर तरतुदींनुसार ९१ प्रकरणांवरही कारवाई करण्यात आली आहे.भरारी पथकाने जिल्ह्यात संशयासस्पद ठिकाणी छापे टाकले असता २२९ ठिकाणी थेट वीज चोरी होत असल्याचे आढळले. तपासादरम्यान वीज चोरीचे अनेक प्रकार उघड झाले. यामध्ये मीटरमधील वायर कापणे, मीटर बंद करणे, फ्लॅश प्रणाली निष्क्रिय करणे, मीटरला छिद्र पाडून त्यामध्ये रोधक निर्माण करणे तसेच मीटर बायपास करून थेट वीज वापरणे अशा पद्धतींचा समावेश आहे.

वीज चोरीमुळे महावितरणला मोठा आर्थीक फटका बसतो, शिवाय वितरण हानीत वाढ होते. तसेच वीज चोरीमुळे वीज यंत्रणेवर अनाधिकृत भार वाढून अखंडित वीज पुरवठ्याला अडथळा निर्माण होतो.

त्यामुळे आगामी काळात भविष्यात महावितरणची वीज चोरी विरोधात मोहिम अधिक आक्रमकपणे राबविण्यात येणार आहे, असे अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांनी स्पष्ट केले. तसेच महावितरणने वीज ग्राहकांना आवाहन केले आहे की, वीज चोरी हा कायद्याने दंडनीय गुन्हा असून दोषींना दंडासह तीन वर्षांपर्यंत कारावासाची शिक्षा होऊ शकते. त्यामुळे ग्राहकांनी प्रामाणिकपणे वीज वापर करून कायद्याचे पालन करावे.

## गरिबांच्या कामात दिरंगाई खपवून घेणार नाही-आ.प्रवीण तायडे

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

जनसामान्यांच्या अडचणी त्वरित मार्गी लावून त्यांना शासकीय सेवांचा सुलभ लाभ मिळावा, या उद्देशाने शासनाकडून राबविण्यात येणारे 'महाराजस्व अभियान' हे लोकाभिमुख उपक्रम असल्याचे प्रतिपादन आ.प्रवीण तायडे यांनी केले. गरिबांची कामे ठरलेल्या वेळेतच पूर्ण झाली पाहिजेत, अन्यथा कामातील दिरंगाई सहन केली जाणार नाही, असा ठाम इशाराही त्यांनी प्रशासनाला दिला. आसेगाव पूर्णा येथील सूर्यकांता मंगल कार्यालयात आयोजित 'श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.



या वेळी अचलपूरचे उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव, चांदूरबाजारच्या तहसीलदार सोनल सूर्यवंशी, गटविकास अधिकारी वानखडे, आसेगाव पोलीस ठाण्याचे ठाणेदार सुरज तेलगोटे, नायब तहसीलदार मनोज सोनारकर, मंडळ अधिकारी भारत पर्वतकर, महसूल अधिकारी कैलास गुळसुंदरे यांच्यासह विविध विभागांचे तालुकास्तरीय अधिकारी उपस्थित होते. कामात पारदर्शकता आणि वेगावर भर आ.तायडे यांनी प्रशासनाला स्पष्ट शब्दांत सांगितले की, नागरिकांच्या समस्या सोडवताना कोणतीही तडजोड सहन केली जाणार नाही. कामात पारदर्शकता ठेवत तातडीने निर्णय घेण्यावर त्यांनी विशेष भर दिला.'एकाच छताखाली' सेवा उपलब्ध या अभियानाच्या माध्यमातून महसूल, कृषी, पंचायत समिती आदी विविध विभागांच्या सेवा नागरिकांना एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या.शेकडो अर्जांवर जागेवरच निकाल या उपक्रमात शेकडो नागरिकांनी आपले अर्ज सादर केले असून अनेक प्रकरणांमध्ये तत्काळ निर्णय देण्यात आले. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांच्या समन्वयातून राबविण्यात आलेल्या या अभियानाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी विलास ढोले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी विपुल ठाकरे, मोहन पाखरे, मेहेर कपूर,प्रमोद खैरकर, रूपाली गावंडे, दीक्षा बेठेकर, महसूल अधिकारी सुमित सोनवणे, अंकुश काळे तसेच महसूल सेवक केतन भालेराव व आशिष वैराळे, प्रमोद इंगळे यांनी परिश्रम घेतले.

## 'समता पर्व २०२६' उत्साहात साजरा



**अंजनगाव बारी -** येथे सत्यशोधक माळी समाज मंडळ व नवयुवक सिद्धार्थ मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने 'समता पर्व २०२६ – वर्ष १ ले' मोठ्या उत्साहात पार पडले. क्रांतीसूर्य महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व जागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पहिल्या दिवशी प्रा. सुशीलदत्त बागडे यांचा 'मी जोतीराव फुले बोलतोय' हा एकपात्री नाट्यप्रयोग सादर झाला. दुसऱ्या दिवशी प्रबोधन व्याख्यानमालेत प्रमुख पाहुणे गणेश शिंदे (उपायुक्त) यांनी मार्गदर्शन केले. प्रेमकुमार बोकें व अँड. चंद्रकांत कराळे यांच्या प्रभावी व्याख्यानांना उपस्थितांचा भरघोस प्रतिसाद मिळाला.या संपूर्ण कार्यक्रमात गावातील नागरिक, युवक आणि सर्व समाजबांधवांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समता, बंधुता आणि सामाजिक ऐक्याचा संदेश दृढ केला.'समता पर्व २०२६' हा केवळ जयंती सोहळा न ठरता समाजप्रबोधनाचा प्रभावी मंच ठरल्याचे चित्र अंजनगाव बारीत पाहायला मिळाले.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात करियर कॉन्सिलिंग सेंटर अंतर्गत व्याख्यान

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक अस्मिता शिक्षण मंडळ द्वारा संचालित महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या करिअर कौन्सिलिंग सेल अंतर्गत खासदारांची ज्ञानगंगा या उपक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांच्या भविष्यातील रोजगाराच्या संधी आणि दिशा या विषयावर नुकतेच अतिथी व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. मीनल भोंडे या तर प्रमुख अतिथी सुजित तट्टे, संचालक, लक्ष अकॅडमी,अमरावती.प्रा.डॉ. जगन्नाथ इंगोले,समन्वयक करिअर समुपदेशन केंद्र,महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय अमरावती हे व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रमुख अतिथी सुजित तट्टे यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थी जीवनात लक्ष निर्धारण किती महत्त्वाचे आहे हे पटवून दिले. जोपर्यंत आपले लक्ष्य किंवा ध्येय निश्चित होत नाही तोपर्यंत आपले जीवन दिशाहीन असते त्यासाठी लक्ष्य निर्धारण करणे अत्यंत आवश्यक आहे. एकदा लक्ष्य निश्चीत झाले की लक्ष्य गाठण्यासाठी आवश्यक दिशा,पोहोचण्याचे मार्ग आणि त्यासाठी वापरावयाची साधने ठरविता येतात. योग्य नियोजन, कठोर परिश्रम, अभ्यासातील सातत्य आणि अद्ययावतता ही चार सूत्रे विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना लक्षात ठेवणे आवश्यक आहे. रोजगाराच्या भरपूर संधी उपलब्ध असतानाही योग्य माहिती अभावी आपण दिशाहीन होतो त्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रथम लक्ष्य, नंतर नियोजन, तदनंतर अभ्यास अत्यंत आवश्यक आहे.आज माहिती सहज उपलब्ध होते पण त्यासाठी इंटरनेट,चाट



जीपीटी, ए आय, याचे ज्ञान व त्यावरून माहिती कशी उपलब्ध करून घ्यावी हे विद्यार्थ्यांना माहिती असणे अत्यंत आवश्यक आहे.ते शिकून घेण्याचे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. अध्यक्षीय मनोगतातून प्राचार्य डॉ. मीनल भोंडे यांनी विद्यार्थ्यांनी या व्याख्यानाचा पुरेपूर उपयोग करून घ्यावा असे प्रतिपादन केले. आज पदवी स्तरावरचे शिक्षण पूर्ण केल्यावर सहज नोकरी उपलब्ध होत नाही पण या पदवी स्तरावरील शिक्षणाचा पाया म्हणून उपयोग करून पुढील करिअरच्या संधी मात्र प्राप्त करता येऊ शकतात त्यासाठी पदवी स्तरावरच्या मौलिक ज्ञानाचा उपयोग विद्यार्थ्यांनी करून घ्यावा. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्ये कौशल्य प्रधान शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे त्यामुळे पदवी स्तरावरचे शिक्षण पूर्ण करताना आपल्यातील कौशल्य ओळखून त्या आधारावरही आपण आपल्या करिअरचा मार्ग निवडू शकतो म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्यातील कौशल्य ओळखावीत असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. कार्यक्रमाचे आयोजन सूत्रसंचालन आणि उपस्थित यांचे आभार प्रा. डॉ. जगन्नाथ इंगोले, समन्वयक, करियर समुपदेशन केंद्र यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूलमध्ये उन्हाळी प्रशिक्षण

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश बहूउद्देशीय शिक्षण संस्था,



नागपूर द्वारा संचालित श्रीमती कमलाबाई ब. टावरी इंग्लिश स्कूल, घुईखेड येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासा करिता उन्हाळी प्रशिक्षण शिबिराला सुरुवात झाली आहे. या शिबिरा मध्ये प्रामुख्याने ज्युडो – कराटे , कुराश, आत्म संरक्षण, धनुर्विद्या, टेबल टेनिस, स्केटिंग, बॅट मिंटन या सारखे मैदाणी आणि मैदाना आतील खेळ शिकविण्यात येत आहे. सदर उन्हाळी शिबिराचे नियोजन शाळा प्रमुख रूपेश भोयर तथा शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश मिरासे यांनी केले आहे. सदर शिबीर चांदूर रेल्वे येथील कुराश अॅकडमी चे संस्थापक शारीरिक शिक्षक संदीप देशमुख यांच्या नेतृत्वामध्ये सदर प्रशिक्षण देण्यात येत आहे. ग्रामीण भागामधील विद्यार्थी यांना खेळाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा ध्यास आहे.सदर उन्हाळी प्रशिक्षण शिबिर ५ मे पर्यंत आयोजित केले असून या शिबिरामध्ये एकूण ५२ विद्यार्थी सहभागी आहे. विद्यार्थी यांना सकाळ पहिल्या सत्रा मध्ये संदीप देशमुख यांचे मार्फत जुडो-कराटे, कुराश तथा आत्मसंरक्षनाचे प्रशिक्षण दिले जाते तर सकाळ दुसऱ्या सत्रा मध्ये अजिंक्य मदन यांच्या मार्फत धनुर्विद्या, टेबल टेनिस, स्केटिंग, बॅट मिंटन या खेळाचे प्रशिक्षण दिले जाते. संस्थेच्या या उपक्रमा द्वारे पालक वर्गांनी आनंद व्यक्त केला असून या सारखे नव-नवीन खेळ तथा प्रशिक्षण ग्रामीण भागातील विद्यार्थ्या करिता अविरत सुरू ठेवण्याबाबत संस्थाप्रमुख कृष्णकुमारजी टावरी यांना पालक विनंती केली आहे.

## पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अमरावती/का.प्र**

पी. आर. पोटे पाटील इंटरनॅशनल स्कूल अमरावती येथे दहावी सीबीएससी परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात त्यांच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि समर्पणाचे विशेष कौतुक करण्यात आले. समारंभाला संस्थेचे अध्यक्ष प्रविण पोटे पाटील तसेच श्रेयशदादा पोटे पाटील प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना शाल व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. यावेळी



उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करत त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.यावेळी अध्यक्ष प्रविण पोटे पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, 'यश हे एका दिवसात मिळत नाही, त्यामागे सातत्यपूर्ण परिश्रम, जिद्द आणि योग्य मार्गदर्शन आवश्यक असते.

विद्यार्थ्यांनी अपयशाला घाबरू नये, तर त्यातून शिकून पुढे जाण्याची वृत्ती ठेवावी. आजचा सन्मान हा त्यांच्या मेहनतीचा पहिला टप्पा असून, भविष्यात त्यांनी आणखी मोठी उद्दिष्टे गाठावीत,' असे आवाहन त्यांनी केले.या प्रसंगी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यश मिळवण्यासाठी सातत्य, कठोर परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोन यांचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.कार्यक्रमाला शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, पालक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण समारंभ आनंददायी व प्रेरणादायी वातावरणात झाला.

## धानोरा पूर्णा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

**आसेगाव पूर्णा-**धानोरा पूर्णा येथील ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयातर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास गावातील नागरिक, महिला, युवक तसेच वाचनालयाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात वाचनालयाचे अध्यक्ष गोपाल भालेराव यांच्या हस्ते डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी बोलताना त्यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत शिक्षण, समानता व सामाजिक न्याय यांचे महत्त्व अधोरेखित केले. 'शिक्षण हेच परिवर्तनाचे प्रभावी साधन असून युवकांनी ज्ञान, संघटन व संघर्ष या तत्त्वांचा स्वीकार करावा,' असे त्यांनी सांगितले.उपस्थित मान्यवरांनी फुले-आंबेडकर यांच्या विचारांचा गौरव करत समाजातील समता, शिक्षण व सामाजिक सुधारणा यांची गरज अधोरेखित



केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रंथपाल राधा लांडे यांनी केले, तर सचिव केतन भालेराव यांनी आभार मानले.हा कार्यक्रम केवळ जयंतीपुरता मर्यादित न राहता समाजप्रबोधनाचा संदेश देणारा ठरला.

## महाराजस्व समाधान शिबिर

# आ.राजेश वानखडे यांच्या हस्ते प्रमाणपत्रे वितरण

**शिराळा-**येथील के.आर. देशमुख मंगल कार्यालयात आयोजित छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात पार पडले.यावेळी तिवसा मतदार संघाचे आ.राजेश वानखडे यांच्या हस्ते विविध प्रमाणपत्रे वितरण करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना आ.राजेश वानखडे यांनी शासनाच्या विविध योजना आणि सेवा, ग्रामीण भागातील शेवटच्या घटकांपर्यंत पोहोचणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन केले.

शिबिराला उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, तहशिलदार अमरावती विजय लोखंडे,भाजपचे तालुकाध्यक्ष राजु गंधे,प्रदीप गौरखेडे जयंत आमले,



निलेश म्हस्के,भाजपचे तालुकाध्यक्ष विरेंद्र लंगडे,तालुका उपाध्यक्ष आशिष खैरकर, सरचिटणीस संदीप पाचघरे, ऋषिकेश चांगोल, युवा मोर्चा अध्यक्ष विजय भुयार,अतुल केतकर,संतोषभाऊ घुल, मनोज ठाकर, अक्षय जवंजाळ, अंकुश नावंदर, आदेश जवंजाळ तसेच शिराळा राजस्व मंडळाचे अधिकारी सांगळे त्यांची सर्व टिम, प्राथमिक आरोग्य केंद्र शिराळा डॉ हर्षा गोहत्रे सर्व कर्मचारी, सहाय्यक कृषी अधिकारी मारोती जाधव, अंगणवाडी पर्यवेक्षिका चिकटे मॅडम सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस, पत्रकार डीआर वानखडे, शिराळा ग्रामपंचायत कर्मचारी,व गावातील नागरिक व भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## अक्षय तृतीया व विवाह महोत्सवानिमित्त पूनम इलेक्ट्रॉनिक्समध्ये ग्राहकांसाठी खास ऑफस

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्रात अक्षय तृतीया या सणाला विशेष महत्त्व आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस अत्यंत शुभ मानला जातो. त्यामुळे या मुहूर्तावर घर, ऑफिस, दुकान, फर्निचर, वाहने, सोने-नाणे किंवा दागिने यांसारख्या वस्तूंची खरेदी करण्याकडे ग्राहकांचा विशेष कल असतो

दरम्यान, एप्रिल, मे आणि जून हे महिने विवाह सोहळ्यांचे मानले जात असल्याने सध्या बाजारपेठेत लग्नसराईच्या खरेदीला मोठी उसळी आली आहे. विशेषतः फर्निचर आणि इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंची मागणी वाढली आहे.अशा परिस्थितीत, पूनम इलेक्ट्रॉनिक्स हे प्रतिष्ठान ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्स




घेऊन आले आहे. अनेक वर्षांपासून उत्कृष्ट दर्जाच्या वस्तू आणि परवडणाऱ्या किमतीमुळे पूनम इलेक्ट्रॉनिक्स ग्राहकांची पहिली पसंती ठरले आहे. सध्या येथे एअर कंडिशनर, टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीन तसेच उन्हाळ्यासाठी फायबर कुलर्सची संपूर्ण रेंज उपलब्ध आहे. गोदरेज, हायर आणि सॅमसंग यांसारख्या लोकप्रिय ब्रँड्सचे एसी उपलब्ध असून मायक्रोवेव्ह ओव्हनचाही पर्याय आहे. विशेष म्हणजे गोदरेज उत्पादनांवर ५ वर्षांची कॉम्प्रिहेन्सिव्ह वॉरंटी दिली जात आहे.ग्राहकांच्या सोयीसाठी बजाज फायनान्समार्फत हप्त्यांवर वस्तू खरेदी करण्याची सुविधा उपलब्ध आहे. तसेच काही निवडक उत्पादनांवर एक्सचेंज ऑफरही देण्यात येत आहे. 'फायदा हवा, थोडे दूर या' हा पूनम इलेक्ट्रॉनिक्सचा लोकप्रिय स्लोगन येथे प्रत्यक्ष अनुभवता येतो.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांकडून एक्वागार्ड व केंट कंपनीच्या वॉटर प्युरिफायर आणि आरओ सिस्टीमला मोठी मागणी आहे. पूनम इलेक्ट्रॉनिक्समध्ये या सर्व उत्पादनांचा रेडी स्टॉक माफक दरात उपलब्ध आहे.

याशिवाय, वोल्टास कंपनीचे एसी तसेच ४३ इंच आणि ५५ इंच स्मार्ट एलईडी टीव्ही मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. फर्निचर विभागात कपाटे, बेडरूम सेट आणि इतर अनेक वस्तूंचीही विविधता पाहायला मिळते.

ग्राहकांनी या सर्व ऑफर्सचा लाभ घ्यावा आणि आपला आनंद द्विगुणित करावा, असे आवाहन संचालक अनिल अग्रवाल, अमित अग्रवाल आणि किरण अग्रवाल यांनी केले आहे.

# परतवाडा प्रकरणाची सखोल चौकशी करणार - पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे

## बयाण, पुरावे देण्यासाठी पिडीतांनी पुढे यावे

**अमरावती/प्रतिनिधीः-** परतवाडा येथील एका युवकाने महिलांशी गैरवर्तन करून त्याचे व्हिडिओ समाज माध्यमांवर प्रसारित केले आहे. याबाबत पोलिसांनी पुढाकार घेऊन गुन्हा नोंदवला आहे. यामध्ये पिडितांनी बयाण आणि पुरावे देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

पालकमंत्री बावनकुळे यांनी आज (दि.१८) जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयाला भेट देऊन याप्रकरणी सविस्तर माहिती जाणून घेतली. यावेळी पोलीस आयुक्त राकेश ओला, जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद आदी उपस्थित होते.



पालकमंत्री बावनकुळे यांनी सांगितले, याप्रकरणी अद्यापपर्यंत आठ आरोपींना अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडून सात मोबाईल, एक टॅब, लॅपटॉप, हार्ड डिस्क ताब्यात घेतली आहे. याची फॉरेन्सिक तपासणीसाठी करण्यात येत आहे. आरोपींनी सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल केली आहेत. त्यांचे प्रसारण थांबवण्यासाठी पोलिसांकडून कारवाई करण्यात येत आहे.

याप्रकरणी एक पंधरा वर्षीय पिडीत मुलगी बयाण देण्यासाठी पुढे आली आहे. याबाबत योग्य ती कारवाई करण्यात येत आहे. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस आणि विशेष तपास पथक काळजीपूर्वक तपास करीत आहे. याबाबत जिल्हा आणि राज्यस्तरावर दैनंदिन आढावा घेण्यात येत आहे. पोलिसांनीही गुन्ह्याचे सर्व पैलू ☞(पान २ वर)

# एनडीपीएस प्रकरणातील १२ वर्षापासून फरार आरोपी जेरबंद



## -गुन्हे शाखेची यशस्वी कामगिरी
## -दोघे आंध्र प्रदेश पोलिसांच्या ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** एनडीपीएस प्रकरणात गेल्या बारा वर्षापासून फरार असलेल्या आरोपींना अटक करण्यात गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले आहे. अफसर खान मुक्तार खान (वय ५०, तारखेडा), शेख राजू शेख शेखजी (वय ५२, रहमत नगर ), महेश नारायण साहू (वय ५०, मनपा शाळा क्रमांक २ मसानगंज), शेख शेसजाद उर्फ साजिद शेख रुस्तम (वय २८,मुजफ्फरपुरा),अकरम शहा उर्फ बाबा सलीम शहा (वय ३१,अकबर नगर) ओ अटक आरोपींची नावे आहे.

माहिती नुसार, एनडीपीएस प्रकरणात आरोपींवर २०१४ पासून आंध्र प्रदेश येथील चित्तूर मध्ये गुन्हे दाखल होते. तेव्हा पासून आरोपी न्यायालयात हजर होत नसल्याने☞(पान २ वर)

# मुलींच्या सन्मानासाठी बजरंग दल मैदानात

## राजकमल चौकात विकृत मानसिकतेच्या विरोधात निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधीः-** विश्व हिंदू परिषद, बजरंग दल , मातृशक्ती, दुर्गा वाहिनीच्या वतीने आज शनिवार १८ एप्रिल रोजी विकृत मानसिकता, लव जिहादच्या विरोधात राजकमल चौकात जोरदार निर्दशने दिली. जिल्हाधिकारी मार्फत राष्ट्रपतीला दिलेल्या निवेदन देण्यात आले. विकृत मानसिकता असणाऱ्या लोकांवर कठोर कार्यवाही करण्यात यावी, सार्वजनिक आणि शासकीय भूमी अतिक्रमण करणाऱ्यांना हटवा, लव जिहाद आणि धर्मांतरणासाठी प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही



करून केंद्रीय कायदा लागू करावा, जनजातीय क्षेत्रात होणारे शोषण थांबवावे, सुरक्षा तंत्र विकसित करण्यात येण्यासह इतर मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहे. भर उन्हात आंदोलनकांनी मुलींच्या सन्मानासाठी जोरदार निर्दशने दिली. आंदोलन करणाऱ्यांमध्ये बंटी पारवानी, विजय शर्मा, सिद्धू सोळंकी, अनिल साहू, विजय खडसे, त्रिदेव डेंडवाल, गुरुदयाल बावरी, निखिल विश्वकर्मा, निशाद जोध ,राजेश मिश्रा, हेमंत मालवीय ,डॉ. सुनील, सुधीर बोपुलकर, नीरंजन दुबे, निलेश टवलारे, संगम गुप्ता सुमित साहू ,☞(पान २ वर)

# दक्षिण आशियातील सर्वात मोठे एफटिओ अमरावतीत

## १० जूनला शुभारंभ, पीएम मोदीच्या हस्ते उद्घाटन होणार

**अमरावती/प्रतिनिधीः-** बेलोरा विमानतळाजवळ साकारत असलेल्या दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण केंद्राचे (एफटिओ) उद्घाटन लवकरच होणार आहे. सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार उद्घाटन येत्या १० जून रोजी होण्याची शक्यता आहे. या ऐतिहासिक सोहळयासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना आमंत्रित करण्यात येत आहे. जर प्रधानमंत्री अमरावतीत आले तर हा प्रसंग जिल्ह्यासाठी एक



ऐतिहासिक आणि अभिमानास्पद यश मानला जाईल. एअर इंडिया आणि महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने अमरावती मध्ये दक्षिण आशियातील सर्वात मोठ्या उड्डाण प्रशिक्षण केंद्राची घोषणा केली होती. हे एफटिओ टाटा ग्रुपची विमान कंपनी एअर इंडिया द्वारा विकसित केले जात, असून औपचारिक शुभारंभ १० जून रोजी होणार ☞(पान २ वर)

### ■ ३१ सिंगल इंजिन आणि तीन ट्वीन विमाने

एअर इंडियाच्या या एफयु मध्ये प्रशिक्षणासाठी विमाने ३१ सिंगल इंजिन आणि ३ ट्वीन इंजिन उपलब्ध असतील. अशी माहिती आहे. एखाद्या भारतीय विमान कंपनी द्वारे देशात सुरू करण्यात येणारे हे अशा प्रकारचे पहिले मोठे एफटिओ आहे. एमआरडीसी ने एअर इंडिया ला पुढील तीन वर्षासाठी अमरावती मधील हे डीजीसीए मान्यताप्राप्त एफटिओ विकसित आणि संचालित करण्याचे कंत्राट दिले आहे.

# जिल्हा ग्रामीण काँग्रेस अध्यक्षपदासाठी प्रकाश साबळे यांचा दावा

## 'प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' समजणाऱ्या प्रवृत्तींपासून पक्षाला वाचवा

**अमरावती/प्रतिनिधीः-** आक्रमक आणि शेतकऱ्यांचे लढवय्ये नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाश साबळे यांनी अमरावती जिल्हा ग्रामीण काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदासाठी आपली प्रबळ दावेदारी सादर केली आहे. शुक्रवारी (दि.१७) त्यांनी अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे निरीक्षक आफताब अहमद यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपला अधिकृत अर्ज दाखल केला.

या भेटीदरम्यान साबळे यांनी पक्ष संघटनेच्या सद्यस्थितीवर निरीक्षकांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी स्थानिक नेतृत्वावर टीकास्त्र सोडत, काँग्रेसला 'प्रायव्हेट लिमिटेड कंपनी' समजणाऱ्या प्रवृत्तींपासून पक्षाला वाचवण्याची आग्रही मागणी केली.

चर्चेदरम्यान प्रकाश साबळे यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, 'आमचा लढा पक्षाच्या विरोधात नसून, पक्षातील हेकेखोर व्यक्तींच्या कार्यपद्धतीविरुद्ध आहे. काँग्रेस ही सर्वांची आहे, ती कोणाची खाजगी मालमत्ता होऊ शकत नाही. हीच भूमिका आम्ही भविष्यातही ठामपणे मांडत राहू.' असे त्यांनी स्पष्ट केले.



यावेळी झालेल्या चर्चेत साबळे यांनी गेल्या मागील काही काळातील निवडणूक निकालांचे विश्लेषण मांडले. यामध्ये प्रामुख्याने विधान परिषद, जिल्हा परिषद , लोकसभा आणि विधानसभा निवडणुका यांचा समावेश होता. सर्व निवडणुकांमधील पक्षाची भूमिका, झालेली पडझड आणि संघटनात्मक उणिवा यावर त्यांनी प्रकाश टाकला. ग्रामीण भागात पक्ष मजबूत करण्यासाठी आक्रमक आणि सर्वसमावेशक नेतृत्वाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी अधोरेखित केले. प्रकाश साबळे यांच्या या आक्रमक पवित्र्यामुळे अमरावती जिल्हा काँग्रेसमधील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, पक्षश्रेष्ठी आता यावर काय निर्णय घेतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आशा सेविकांचे थकीत मानधन तत्काळ द्या

## -खासदार वानखडे यांची केंद्र सरकारकडे मागणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील आशा सेविका व गटप्रवर्तिका यांचे गेल्या सहा ते सात महिन्यांपासून मानधन थकीत असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. यासंदर्भात खासदार बळवंत वानखडे , खा.डॉ.कल्याण काळे आणि खा.रवींद्र चव्हाण यांनी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व दुर्गम भागात कार्यरत असलेल्या आशा सेविका अत्यंत कमी मानधनावर दिवस-रात्र आरोग्य सेवा



पुरवत आहेत. प्रसूती सेवा, लसीकरण मोहीम, जनजागृती कार्यक्रम तसेच विविध शासकीय आरोग्य योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. मात्र, एवढे महत्त्वाचे काम करूनही त्यांना मिळणारे केंद्र सरकारचे मानधन गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असल्यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीवर गंभीर परिणाम होत आहे.

या मानधनावरच अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असल्याने, नियमित पगार न मिळाल्यामुळे आशा सेविकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे ☞(पान २ वर)

# चक्कर येऊन पडल्याने वृद्धाचा मृत्यू

## रहाटगांव येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** चक्कर येऊन पडल्याने वृद्धाचा मृत्यू झाल्याची घटना नांदगाव पेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या रहाटगाव येथे समोर आली आहे. रामदास परसराम झाडे (वय ७४, टाकरखेडा मोरे अंजनगाव सुर्जी) असे मृतक वृद्धाचे नाव आहे. माहिती नुसार रामदास झाडे रहाटगांव येथील विधी हाइट बिल्डिंग मध्ये सेक्युरिटीचे काम करीत होते. गुरुवारी सकाळी ड्युटीवर असताना त्यांना अचानक चक्कर आला आणि ते खाली पडले. तेथे कार्यरत इंजिनियरने त्यांना तात्काळ जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. जेथे डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या प्रकरणात रामदास यांचा मुलगा चेतन झाडे (वय ३२) याच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल केला आहे.



# प्राचार्य डॉ.जयपूरकर यांची केंद्र शासनाच्या तज्ञ समितीवर नियुक्ती

**अमरावती/प्रतिनिधीः-** चिखलदरा येथील सिपना शिक्षण प्रसारक मंडळ, या संस्थेच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर यांची केंद्र सरकारच्या पर्यावरण, वन तथा जलवायु परिवर्तन मंत्रालया अंतर्गत असणाऱ्या मूल्यांकन समितीवर तज्ञ म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. या समिती द्वारे भारतातील कोळसा खाणी व्यातिरिक्त इतर खाणी प्रकल्पांच्या प्रस्तावांचा पर्यावरणीय व जलवायु वर होणाऱ्या परिणामाचा सखोल अभ्यास करणे तसेच प्रकल्पांना प्रत्यक्ष भेट देऊन त्यांचे मूल्यांकन करून शिफारस करणे इत्यादि बाबींचा समावेश आहे.



डॉ.जयपूरकर हे भूगर्भशास्त्र विषयाचे अभ्यासक असून या क्षेत्रातील संशोधन विषयक साहीत्यांचा त्यांचा अभ्यास आहे. अनेक राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय चर्चा सत्रा मध्ये व कार्यशाळे मध्ये त्यांचे संशोधन पेपर प्रसिद्ध झाले आहेत. या तज्ञ समितीच्या सभा इंदिरा पर्यावरण भवन, नवी दिल्ली येथे आयोजित असतात.

त्यांच्या नियुक्ती बद्दल सिपना शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री जगदीश गुप्ता व संस्थेच्या सर्व कार्यकारिणीचे सदस्य तसेच सहकारी व मित्रमंडळी तर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# सोलर बसवण्याच्या नावावर ८.७० लाखांनी फसवणुक

## -आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** घरावर सोलर बसविण्याच्या नावावर ८ लाख ७० हजार रुपयांनी फसविण्यात आल्याची घटना राजापेठ पोलीस ठाणे हद्दीत येणाऱ्या केडिया नगर मध्ये समोर आली आहे. या प्रकरणात चंद्रशेखर विशंभर मिरगे (वय ५८, केडिया नगर) यांच्या तक्रारीवरून विशाखा इन्फ्रा प्रायव्हेट लिमिटेड चे मालक अभिजीत धर्माळे व एका महिले विरुद्ध कलम ३१८(४), ३(५) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला. माहितीनुसार चंद्रशेखर मिरगे यांना आपल्या घरावर सोलर सिस्टिम बसवायचे ☞(पान २ वर)



# शांताबाई गुंबळे यांचे निधन

**अमरावती/प्रतिनिधीः-** अखिल माळवी सोनार महासंघाचे विद्यमान अध्यक्ष नंदकिशोर गुंबळे यांच्या मातोश्री शांताबाई गुंबळे (वय ९७ वर्षे) यांचे आज दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी दुपारी १२:५० वाजता दुःखद निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा आज, शनिवारी १८ एप्रिल २०२६ रोजी संध्याकाळी ७ वाजता, त्यांचे राहते घर (बुधवारा चौक, अमरावती) येथून निघाली. त्यांच्या मागे मुलगा , मुलगी , नातवंड असा मोठा परिवार आहे.



# समतापर्व म्हणजे फुले-शाहू-आंबेडकरांच्या विचारांचा जागर - आ. सुलभा खोडके

## तपोवन परिसरात 'समतापर्व' उत्साहात

## प्रबोधन, परिवर्तन आणि बुद्ध-भीम गीतांचा सुरेल संगम

**अमरावती/प्रतिनिधीः-** समता, न्याय, आणि बंधुतेचा संदेश घराघरापर्यंत, भारतीय संविधान जागृती आणि समतेच्या विचारांच्या प्रसारासाठी समतापर्व साजरा साजरा केला जातो. महात्मा ज्योतिबा फुले यांच्या विचारातून समताधिष्टित समाज घडविण्यासाठी आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिप्रेत असलेला लोकशाही समाज निर्माण ☞(पान २ वर)







# तलवार घेऊन दहशत निर्माण करणारा ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** तलवार घेऊन दहशत निर्माण करणारा आरोपी अमन रमजान रायलीवाले (वय २२, फ्रेजरपुरा कालू घोडेवाले,जुना बायपास रोड) याला पोलिसांनी मध्यरात्री ताब्यात घेतले आहे. त्याच्या कडून तलवार जप्त करण्यात आली आहे. माहिती नुसार गाडगे नगर डीबी शाखेचे पथक शुक्रवारी रात्री नाईट पेट्रोलिंग ड्युटी करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, वेलकम पॉइंट चौकावर आरोपी हातात तलवार



घेऊन दहशत निर्माण करत आहे. या वरून ☞(पान २ वर)






# सारांश

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

❒ रविवार, १९ एप्रिल २०२६ ❒ E-paper - www.janmadhyam.com


## महिला आरक्षण विधेयक

# अंदाज चुकला, सापळा फसला!

**खरेतर, आता जनगणना रखडल्याने लांबलेल्या परिसीमनाचा मुद्दा महिला आरक्षणाशी जोडणे योग्य होते का, यावर अधिक विचार व्हायला हवा. कारण, महिला आरक्षणाला कोणत्याही विरोधी पक्षाचा तसा विरोध नव्हता. सप्टेंबर २०२३ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या काही महिने आधी केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा निर्णय घेतलाच होता. तेव्हाही आणि आताही महिला आरक्षणाच्या मूळ मुद्द्याला विरोध न करता काही पक्ष वेगळे काही मागत असतील तर ते महिला आरक्षणात जातनिहाय आरक्षण आहे.**

पन्नास वर्षे रखडलेली लोकसभा मतदारसंघांची फेररचना, परिसीमनाची सांगड लोकसभा व विधानसभांमधील महिलांच्या तेहतीस टक्के आरक्षणाशी घालण्याचा नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचा प्रयत्न फसला. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू असताना घाईघाईने महिला आरक्षणाशी संबंधित १३१वी घटनादुरुस्ती व आणखी दोन विधेयके संमत करण्यासाठी संसदेचे विशेष अधिवेशन बोलावण्यात आले खरे. परंतु, घटनादुरुस्तीसाठी आवश्यक असलेले दोन-तृतीयांश बहुमत सत्ताधारी आघाडी मिळवू शकली नाही. दोन दिवसांच्या घनघोर चर्चेनंतरही दुरुस्तीच्या बाजूने २९८ आणि विरोधात २३० मते पडली. सरकारचा असा पराभव झाल्यानंतर या घटनादुरुस्तीसोबत सादर केलेली परिसीमन आणि केंद्रशासित प्रदेशातील आरक्षणाशी संबंधित विधेयके मागे घेण्याची घोषणा संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी केली. सरकारसाठी हा नामुष्कीचा तर विरोधकांसाठी अपवादात्मक असा आनंदाचा क्षण!

पश्चिम बंगाल व तामिळनाडू राज्यांचे विधानसभेचे मतदान अजून बाकी असताना सत्ताधारी रालोआने अगदी जाणीवपूर्वक हा सगळा सापळा विरोधकांसाठी रचला होता. घटनादुरुस्ती मंजूर झाली तर एकाचवेळी महिलांना राजकीय प्रतिनिधित्वाचा ऐतिहासिक निर्णय आणि सोबतच परिसीमनाचे आणखी एक ऐतिहासिक पाऊल असे दुहेरी श्रेय सरकारला मिळणार होते. घटनादुरुस्ती फसलीच तर विरोधी पक्ष महिलांच्या हक्काविषयी बेफिकीर, नव्हे विरोधातच आहेत, विरोधकांमुळे महिलांचे हक्क डावलले गेले, असा प्रचार करता येईल, ही या व्यूहरचनेची दुसरी बाजू होती. लोकसभेतील दोन दिवसांची सगळी भाषणेदेखील या व्यूहाभोवतीच फिरताना दिसली. अखेरचा उपाय म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी दुपारी सर्व खासदारांना राजकीय अभिनिवेश सोडून महिलांच्या राजकीय प्रतिनिधित्वाचा विचार करण्याचे आवाहन केले. पण, त्याला अजिबात प्रतिसाद मिळत नाही हे पाहून गृहमंत्री अमित शाह यांनी चर्चेला उत्तराच्या भाषणात काँग्रेसवर तुफान टीका केली. तथापि, अंतिमत: मतदानावेळी हे डावपेच, व्यूहरचना, विरोधकांना भावनिक गुंत्यात अडकविण्याचा सापळा सारे काही फसले. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी लोकसभेतील भाषणात म्हटल्याप्रमाणे आता यापुढील काळात सत्ताधारी भारतीय जनता पक्षाकडून या मुद्द्यावर विरोधकांना लक्ष्य केले जाईल. नरेंद्र मोदी यांच्या सरकारच्या प्रत्येक निर्णयाला काँग्रेस पक्ष कसा विरोध करीत आला, याची जी जंत्री अमित शाह यांनी गुरुवारी सायंकाळी सभागृहासमोर ठेवली, तिच्यातून भविष्यातील हल्ल्यांचा पुरता अंदाज आला आहेच.





खरेतर, आता जनगणना रखडल्याने लांबलेल्या परिसीमनाचा मुद्दा महिला आरक्षणाशी जोडणे योग्य होते का, यावर अधिक विचार व्हायला हवा. कारण, महिला आरक्षणाला कोणत्याही विरोधी पक्षाचा तसा विरोध नव्हता. सप्टेंबर २०२३ मध्ये लोकसभा निवडणुकीच्या काही महिने आधी केंद्र सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांप्रमाणे लोकसभा व विधानसभांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षणाचा निर्णय घेतलाच होता. तेव्हाही आणि आताही महिला आरक्षणाच्या मूळ मुद्द्याला विरोध न करता काही पक्ष वेगळे काही मागत असतील तर ते महिला आरक्षणात जातनिहाय आरक्षण आहे. नुकतीच प्रक्रिया सुरू झालेल्या जनगणनेत स्वातंत्र्यानंतर प्रथमच जातगणना होत आहे आणि त्या आकडेवारीवर आधारित ओबीसी व इतर आरक्षित प्रवर्गातील महिलांना एकूण महिला आरक्षणात वाटा असावा, अशी काही विरोधी पक्षांची मागणी आहे. खरा वाद परिसीमनाच्या मुद्द्यावर आहे. एकतर जनगणनेची ताजी आकडेवारी न वापरता सरकारने २०११ च्या जनगणनेच्या आधारे लोकसभेच्या जागा ५४३ वरून ८५० पर्यंत वाढविण्याचा प्रस्ताव तयार केला. त्यात दक्षिण भारतातील राज्यांवर अन्याय होत असल्याचा आरोप झाला.

राज्याराज्यांच्या वाट्याच्या लोकसभेच्या जागा १९७६ पासून जशाच्या तशा आहेत. या स्थितीला दोनवेळा प्रत्येकी पंचवीस वर्षांची मुदतवाढ मिळाली आहे. सध्याची मुदत यंदा, २०२६ मध्ये संपणार आहे. त्यातच जनगणना रखडली. या अर्धशतकात उत्तर भारतातील राज्यांची लोकसंख्या वाढली. दक्षिण भारतातील तामिळनाडू, केरळ, आंध्र, तेलंगणा, कर्नाटक आदी राज्यांनी मात्र शिक्षण, आरोग्य आणि महिला सक्षमीकरणाच्या बळावर लोकसंख्या नियंत्रण केले. त्याचा फटका लोकसभेतील प्रतिनिधित्वाच्या रूपाने बसणार असेल तर त्याला ही राज्ये अजिबात तयार नाहीत.

या राज्यांना ही विकासाची शिक्षा वाटते.

हा एकाचवेळी भावनिक व राजकीय मुद्दा बनला आहे. हा उत्तर-दक्षिण दुभंग किती तीव्र आहे, याविषयीचा सत्ताधारी आघाडीचा अंदाज चुकला आणि त्यात महिला आरक्षण फसले.

## लैंगिक छळाविरुद्ध दाद मागण्यासाठी 'पॉश'ची मदत..



या कायद्याची सुरुवात झाली ती १९९२ साली राजस्थानात झालेल्या भंवरीदेवीच्या केसमुळे. तथाकथित कनिष्ठ जातीत जन्मलेली भंवरीदेवी ही राजस्थान सरकारच्या त्यावेळच्या ग्रामीण विकास कार्यक्रमात नोकरी करत होती. त्या कामाचा भाग म्हणून तिने गावात होणाऱ्या एका मुलीच्या बालविवाहाला विरोध केला. पोलिसांची मदत घेऊन तिने ते लग्न थांबवलं. ती मुलगी सवर्ण जमीनदार घरातील होती. सूड म्हणून त्या घरातील पुरुषांनी तिच्यावर बलात्कार केला, असा तिने आरोप केला. तिचा नवरा भक्कमपणे तिच्या पाठीशी उभा राहिला. खालच्या कोर्टात केस तिच्याविरूद्ध गेली. त्यामुळे देशभरातील महिला संघटनांनी एकत्र येऊन या विषयावर सुप्रीम कोर्टात जनहीत याचिका दाखल केली. या याचिकेचा जो निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला तोच प्रसिद्ध असा 'विशाखा निकाल.' तिथून महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ हा विषय राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला. मग सर्व सरकारी, निमसरकारी आणि खासगी आस्थापनांत विशाखा समिती स्थापन करावी, असा सरकारने आदेश दिला. देशभरात अशा समित्या स्थापन झाल्यानंतर लक्षात आलं, महिलांचा कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, ही बऱ्यापैकी सार्वत्रिक बाब होती. त्यामुळे २०१३ साली या विशाखा निकालाचं रुपांतर 'पॉश' या कायद्यात करण्यात आलं.

सर्व सरकारी, निमसरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये १०पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणं या कायद्याने बंधनकारक आहे. समितीची अध्यक्ष आस्थापनेतील ज्येष्ठ महिला असावी, महिलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असावी, त्यात किमान दोन कर्मचारी असावेत व एक बाहेरील सदस्य - शक्यतो महिलाप्रश्नी काम करणारी सामाजिक व्यक्ती किंवा वकील असावी. या समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा व त्याखेरीज गरजेप्रमाणे घेण्यात यावी.

हा कायदा मुख्यतः महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरूद्ध दाद मागण्यासाठी सुरक्षित जागा निर्माण करून देतो. परंतु, काही वेळा त्या आस्थापनेतील अत्यंत वरिष्ठ पदावर असणारी एखादी व्यक्तीच लैंगिक छळ करणारी गुन्हेगार असते. काही वेळा आस्थापनेचा मालकच कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ करत असतो. अशा वेळी अंतर्गत तक्रार निवारण समितीतून न्याय मिळेल, असा विश्वास महिलांना वाटत नाही. काही वेळा आस्थापनेतील सदस्यांची संख्या १०पेक्षा कमी असल्याने तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केलेली नसते. काही वेळा महिला असंघटित क्षेत्रात काम करत असतात. उदा. घरेलू कामगार महिला, काच - कागद - पत्रा वेचक महिला, रोजंदारीने मजुरी करणाऱ्या महिला. या महिलांवर कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार होत असतील तर त्यांनी कुठे जायचं? -अशा सर्व महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन केलेली असते. या समितीत जिल्हा महिला बालविकास अधिकारी, त्या कार्यालयातील किमान एक कर्मचारी, एक वकील आणि दोन अशासकीय महिला असे सदस्य असतात.एखाद्या महिलेने अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीत तक्रार दाखल केली, तर तिची लेखी तक्रार स्वीकारली जाते.

# हे सूर्यनारायणा, यांच्या डोक्यात जरा प्रकाश टाक!

गेल्या आठवड्यात राज्य सरकारने येत्या डिसेंबर पर्यंत महावितरणाचा आयपीओ बाजारात आणण्याचा, तसेच सरकारी रोख्यांच्या मदतीने कंपनीवरील कर्जाचे नवे-जुने करण्याचा निर्णय घेतला. तेव्हा वाटले की, चला, आतबट्ट्याच्या व्यवहारामुळे होणाऱ्या तोट्याची वसुली प्रामाणिक ग्राहकांकडून करण्याची नेहमीची क्लृप्ती वीज कंपनीने बाजूला ठेवली. पण, तसे नव्हते.

कोळसा खाणी व औष्णिक विजेच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या महावितरण कंपनीच्या लक्षात आले असावे की, कृषिपंपाची सबसिडी व सरकारी खात्यांकडील थकबाकी ही समस्या आहेच. त्याशिवाय सौरऊर्जेचा वाढता वापर भलेही ग्राहकांसाठी लाभदायक, पर्यावरणाचे रक्षण करणारा, ग्रीन एनर्जीचे ध्येय गाठणारा असला तरी कंपनीसाठी नवे संकट आहे. आधी 'पीएम कुसुम' योजना आणि फेब्रुवारी २०२४ पासून 'पीएम सूर्यघर' योजनेमुळे हजारो, लाखो, कोट्यवधी ग्राहक सौरऊर्जेकडे वळले. म्हणून महावितरणने घराच्या छतावर बसवायच्या यंत्रणेवर मर्यादा आणली. आधीच्या १२ महिन्यांमधील प्रत्यक्ष वीजवापराच्या सव्वाशे टक्के इतक्याच क्षमतेचे सोलर पॅनल बसवता येतील असा उफराटा निर्णय घेतला. मुळात, मार्च २०२७ पर्यंत प्रत्येक कुटुंबाला महिन्याला तीनशे युनिट मोफत वीज, देशात एक कोटी घरांमध्ये सौरऊर्जेचा वापर, त्यातून ३० गिगावॉट क्षमतेची उभारणी, हे 'पीएम सूर्यघर' योजनेचे ध्येय बरेच दूर आहे. मार्च २०२६ पर्यंत जेमतेम २६ लाख कुटुंबांनीच योजनेचा लाभ घेतला आहे. केंद्राच्या अनुदानात स्वत:ची भर टाकण्याचा निर्णय घेणाऱ्या महाराष्ट्रात तर हा आकडा पाच लाखांच्याही आत आहे. अशा वेळी ही विचित्र मर्यादा आणली गेल्याने केंद्राचे नवी व नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयदेखील नाराज झाले. हा निर्णय प्रतिगामी असून त्याचा फेरविचार करण्याची सूचना महावितरणला केल्याचे त्या खात्याने ऊर्जाविषयक स्थायी समितीला सांगितले.

सौरऊर्जा वापरणाऱ्यांचा उत्साह मारून टाकण्याचा महावितरणचा दुसरा निर्णय तर अगदीच आत्मघातकी आहे. हा निर्णय महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिल्याचे सांगून सरकार व महावितरण हात झटकत असले तरी मुळात महावितरणच्या विनंतीवरूनच आयोगाने हा निर्णय घेतला आणि तोदेखील सौरऊर्जेच्या वापरकर्त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची कोणतीही संधी न देता. केवळ आपण नश्वर माणसेच कशाला, पृथ्वीतलावरील समस्त जीवसृष्टीचा, झालेच तर सूर्यमालेतील असलेल्या-नसलेल्या सजीवांचा सूर्य हा ऊर्जादाता आहे. अनादिकालापासून ऊर्जेचा अखंड स्रोत आहे. ती ऊर्जा आपल्या घराच्या, उद्योगांच्या छतावर साठवून वापरण्याची, जास्तीची वीज महावितरणला विकण्याची, रात्रीच्या वेळी जी वीज वापरली जाईल ती त्या विकलेल्या विजेतून वळती करण्याची संधी उपलब्ध झाल्यामुळे लोकांनी मोठी गुंतवणूक करून सोलर पॅनल बसवले. नेट मीटरिंगच्या माध्यमातून सामान्य ग्राहक आणि महावितरण यांच्यात विजेचा व्यवहार, व्यापार होऊ लागला. दिवसा निर्माण होणारी वीज ग्रीडमध्ये टाकणे किंवा रात्री ग्रीडमधून वीजनिर्मिती करणाऱ्यांची गरज भागविणे, याचा खर्च महावितरण व ग्राहक दोघे वाटून घेत होते. पण, नियामक आयोगाच्या नव्या आदेशाने या व्यवहारावर विघ्न आले आहे.



**कोळसा खाणी व औष्णिक विजेच्या प्रेमात आकंठ बुडालेल्या महावितरण कंपनीच्या लक्षात आले असावे की, कृषिपंपाची सबसिडी व सरकारी खात्यांकडील थकबाकी ही समस्या आहेच. त्याशिवाय सौरऊर्जेचा वाढता वापर भलेही ग्राहकांसाठी लाभदायक, पर्यावरणाचे रक्षण करणारा, ग्रीन एनर्जीचे ध्येय गाठणारा असला तरी कंपनीसाठी नवे संकट आहे.**

एकतर, सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळातच स्वत: निर्माण केलेल्या विजेचा वापर ग्राहकांना करता येईल. त्याशिवाय १० किलोवॉटपेक्षा अधिक क्षमतेच्या सोलर सिस्टीमवर ग्रीड सपोर्ट चार्जेसचा भुर्दंड ग्राहकांना सोसावा लागेल. धक्कादायक म्हणजे देशाच्या व राज्याच्या ऊर्जाविषयक धोरणात अशी उलटी पावले टाकणारे हे निर्बंध उद्योग व व्यवसायासाठी वीज वापरणाऱ्यांवर पूर्वानुलक्षी प्रभावाने लागू करण्यात आले आहेत. १ जानेवारी २०२० नंतर बसविलेल्या लघु व उच्चदाब वीजग्राहकांना युनिटमागे अनुक्रमे १ रुपया ९६ पैसे व १ रुपया ४२ पैसे इतका मोठा हा भुर्दंड आहे. १ जुलै २०२५ पासून असेच पूर्वानुलक्षी प्रभावाने सगळ्या घरगुती ग्राहकांवरही चार्जेस लागू करण्यात आले आहेत. याशिवाय टीओडी म्हणजे टाइम ऑफ डे धोरणात केलेले बदल जाचक आहेत. गेल्या काही वर्षांत या दिशेने केंद्र व राज्य सरकार ठोस पावले टाकत असल्याचे पाहून मोठ्या उमेदीने कच्चा माल ते सोलर पॅनल अशा नानाविध क्षेत्रांत उतरलेल्या उद्योजकांपुढे नवी आव्हाने उभी राहिली आहेत.

या निर्णयाच्या समर्थनार्थ राज्य सरकारची भूमिका तर हास्यास्पद आहे. उद्योजकांनी बॅटरीजच्या माध्यमातून दिवसा निर्माण केलेली वीज साठवून ठेवावी व रात्री वापरावी. जेणेकरून बॅटरी उत्पादनाच्या उद्योगाला चालना मिळेल. एमएसएमई क्षेत्राला नवी संधी निर्माण होईल, असे सरकारला वाटते. त्यासाठीची गुंतवणूक पाहता हा रोगापेक्षा इलाज जालीम म्हणावा लागेल.

सौरऊर्जेविषयीचे सरकारचे धोरण आत्मघातकी आहे. उद्योगांची, विशेषत: वृत्तपत्रे, हॉटेल व हॉस्पिटॅलिटी, तीन पाळ्यांमध्ये चालणारे मोठे उद्योग अशा सगळ्यांचीच ही फसवणूक आहे.

महावितरण, नियामक आयोग व सरकार जणू सूर्यावर, सौरऊर्जा स्रोतावर हक्क सांगायला निघाले आहे. इवल्याशा कंपनीची मुंगी सूर्य गिळायला निघाली आहे. एखाद्या नव्या सुविधेची चटक लावून, लाभाच्या मधाचे बोट दाखवून नंतर त्यातून वसुली करण्याचा प्रकार अनेकदा अनुभवास येतो. सौरऊर्जेबाबत तसेच काहीसे होतेय. प्रत्यक्ष सूर्यानेच प्रकाशाचे काही कवडसे संबंधितांच्या डोक्यात टाकले तरच हे उफराटे निर्णय बदलले जातील.


# डेटवर जायला वेळ नाही....



बॉलीवूड अभिनेत्री मृणाल ठाकूर तमिळ अभिनेता धनुषसोबत रिलेशनशीपमध्ये असून लवकरच दोघे लग्न करणार असल्याच्या चर्चा बऱ्याच कालावधीपासून रंगल्या आहेत. या चर्चांनंतर अखेर अत्रिनेत्री मृणाल ठाकूरने मौन सोडले आहे. धनुषसोबत लग्न करणार असल्याच्या चर्चा मृणालने फेटाळून लावल्या आहेत. मृणाल पहिल्यांदाच या अफवांबाबत व्यक्त झाली आहे.

आदिवी शेषसोबतचा 'डकॉयट' हा तिचा नवीन चित्रपट गेल्या आठवड्यात प्रदर्शित झाला. मृणाल ठाकूरने नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सांगितले की, तिचे वैयक्तिक आयुष्य चर्चेत रहावे असे तिला वाटत नाही. मला पडद्यावरच्या माझ्या कामामुळे ओळखले जावे असे वाटते. मी कोणाला डेट करत आहे? या प्रश्नामुळे मला ओळखले जावे असे मला वाटत नाही, असे मृणालने सांगितले. माझ्याकडे डेटिंगसाठी वेळ नाही. माझ्या पायाचा लिगामेंट फाटला आहे आणि एक्स-रे नंतर, मला माझ्या पायावर उपचार करायलाही वेळ मिळाला नाही. वैयक्तिक आयुष्य तर विसरूनच जा, असे पुढे मृणालने नमूद केले.

लोकांना वाटते की हा माझा 'पीआर' स्टंट आहे. म्हणून स्वतःची बाजू मांडण्यासाठी मला एका टीमची नेमणूक करावी लागली. जेव्हा मी प्रेमात पडेन, तेव्हा स्वतः सर्वांना सांगेन. एक 'पब्लिक फिगर' म्हणून वावरताना या गोष्टी अपरिहार्य असतात, असेही तिने पुढे नमूद केले. मी इतकी मनमोकळ्या स्वभावाची व्यक्ती आहे की, जर माझ्या एखाद्या मित्राने मला एखादे फूल दिले, तरीही मी त्याचा फोटो पोस्ट करेन.




# 'धुरंदर'समोर 'पुष्पा झुकेगा या नहीं?'

बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंगचा चित्रपट 'धुरंधर: द रिव्हेंज'ने 'सुपर डुपर' हीट ठरला आहे. या चित्रपटाने आज बॉक्स ऑफिसवर चार आठवडे पूर्ण केले आहेत. २८ दिवसांनंतर या चित्रपटाची देशातील निव्वळ कमाई १,०९९.७२ कोटी रुपये झाली आहे. तर एकूण कमाई १,३१६.४५ कोटी रुपयांवर पोहोचली आहे. मात्र असे असले तरी 'पुष्पा २' झुकेगा नहीं म्हणत अजूनही पहिले स्थान टिकवून आहे.


परदेशातील कमाईवर नजर टाकल्यास या चित्रपटाने २८ व्या दिवशी ०.५० कोटी रुपये कमावले, ज्यामुळे आता परदेशातील एकूण कमाई आतापर्यंत ४१६.७५ कोटी रुपये झाली आहे. 'सॅकनिल्क'च्या आकडेवारीनुसार, यामुळे चित्रपटाची जगभरातील एकूण कमाई १,७३३.२० कोटी रुपये झाली आहे.

दाक्षिणात्य अभिनेता अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २'चा विक्रम मोडण्यासाठी रणवीर सिंगच्या चित्रपटाला अजूनही १३५ कोटी रुपयांची आवश्यकता आहे. 'पुष्पा २'ची हिंदुस्थानातील निव्वळ कमाई १,२३४.१० कोटी रुपये आहे. त्यामुळे आतापर्यंतचा हिंदुस्थानातील सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट म्हणून पुष्पा २ आपल्या स्थानावर कायम आहे.

बॉक्स ऑफिसच्या कमाईवर नजर टाकल्यास स्पष्ट होते की, चौथ्या बुधवारी या चित्रपटाने देशात तिकीट खिडकीवर ४.०५ कोटी रुपये कमावले. पहिल्या आठवड्यात या चित्रपटाने ६७४.१७ कोटी रुपयांची मोठी कमाई केली होती. दुसऱ्या आठवड्यात कमाईत मोठी घट झाली आणि अवघे २६३.६५ कोटी रुपये जमा झाले.

तिसऱ्या आठवड्यात चित्रपटाने ११०.६० कोटी रुपये कमावले.

या आधी १८ मार्च रोजी झालेल्या 'पेड प्रिव्ह्यू'मधून या चित्रपटाने ४३ कोटी रुपये कमावले होते. आता 'धुरंदर २' आणखी १३५ कोटी रुपये कमावून बॉक्स ऑफिसवरचा धुरंदर बनून पुष्पा २ ला झुकवणार का याकडे सिने रसिकांचे लक्षं लागलं आहे.



# रोहित शेट्टी गोळीबार प्रकरण
# आग्र्याहून १५ व्या आरोपीला केली अटक


*बॉलीवूड दिग्दर्शक रोहित शेट्टी याच्या जुहू येथील घरावर झालेल्या गोळीबार प्रकरणात मुंबई गुन्हे शाखेने आग्र्याहून आणखी एका आरोपीला पकडले. त्यामुळे या प्रकरणात अटक झालेल्या आरोपींची संख्या १५ इतकी झाली आहे. १ फेब्रुवारी रोजी रोहित शेट्टी यांच्या जुहूतील घरावर बेछूट गोळीबार झाला होता. त्यानंतर गुन्हे शाखेने या प्रकरणात आतापर्यंत १४ आरोपींना अटक केली होती. ते सर्व सद्यस्थितीत न्यायालयीन कोठडीत आहेत. याच प्रकरणात गुन्हे शाखेने आग्रा येथून प्रदीपकुमार जाठव ऊर्फ गाठ (२२) याला अटक केली आहे. गोळीबार झाला त्यादिवशी प्रत्यक्ष घटनास्थळी उपस्थित राहण्याबरोबर इतर आरोपींना आवश्यक ती मदत केल्याचा प्रदीपवर आरोप आहे.*



# आता 'हेरा फेरी ३'हा चित्रपट होणार नाही

'हेरी फेरी' या चित्रपटातील परेश रावल यांचे बाबू भैय्या हे पात्र चांगलेच गाजले. पहिल्या दोन भागांमधील इतर कलाकारांपेक्षा बाबू भैय्या या पात्राने चांगलाच भाव खाल्ला होता. दिग्दर्शक प्रियदर्शन यांचा २००० सालचा चित्रपट 'हेरा फेरी' आजही प्रेक्षकांमध्ये लोकप्रिय आहे. या विनोदी चित्रपटाने अनेक पिढ्यांचे मनोरंजन केले. निर्मात्यांनी चित्रपटातील मूळ कलाकारांसह—अक्षय कुमार, सुनील शेट्टी आणि परेश रावल 'हेरा फेरी ३' ची घोषणा केली होती. सर्वजण या प्रोजेक्टबद्दल खूप आनंदी होते आणि एकत्र काम करण्यास उत्सुक होते. मात्र, आता ते खूप कठीण वाटत आहे.बऱ्याच काळापासून 'हेरा फेरी ३' रद्द झाल्याच्या, पुढे ढकलल्या गेल्याच्या आणि कलाकार व दिग्दर्शक यांच्यातील मतभेदांच्या बातम्या येत होत्या. यासंदर्भात कायदेशीर प्रकरणेही सुरू आहेत.दरम्यान, अक्षय कुमारने आता पुष्टी केली आहे की कायदेशीर प्रकरणांमुळे 'हेरा फेरी ३' बनणार नाही. शुभंकर मिश्रा याच्या पॉडकॉस्टमध्ये बोलताना अक्षय कुमार म्हणाला, 'हेरा फेरी ३ हा चित्रपट आता बनवला जाणार नाही. हे ऐकल्यावर मला स्वतःलाच धक्का बसला. काही गोष्टी घडतात, याबद्दल मी कॅमेऱ्यासमोर बोलू शकत नाही.' अनेक गोष्टी, करार आहेत, त्यामुळे हा प्रकल्प रखडला होता.'राजू, श्याम आणि बाबूराव यांना मोठ्या पडद्यावर परत पाहण्यासाठी चाहते उत्सुक असतानाच, 'हेरा फेरी ३' हा चित्रपट होणार नसल्याने, चाहतेही निराश झाले आहेत.

# 'बिग बॉसमध्ये गेलेले, पण उंदीर आणि झुरळांसोबत राहावे लागले' सोनाली राऊत



बिग बॉस मराठीचं सहावं पर्व आता अंतिम टप्प्यात येऊन पोहोचलं आहे. बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वाचे टॉप ५ स्पर्धक मिळाले असून उद्या महाअंतिम सोहळा पार पडणार आहे. बिग बॉस मराठीच्या सहाव्या पर्वात १७ सदस्यांनी एन्ट्री घेतलेली. यामध्ये बॉलिवूड अभिनेत्री आणि मॉडेल सोनाली राऊतचाही समावेश होता. पण, सोनाली काही आठवड्यातच बिग बॉसच्या घरातून बाहेर पडली. अशातच आता सोनाली राऊतनं 'बिग बॉस मराठी'वर गंभीर आरोप केले आहेत. त्यासंबंधी अभिनेत्रीनं पोस्ट शेअर केली आहे.

सोनालीला बिग बॉसच्या घरात असताना त्वचेचा आजार झालेला. त्यामुळे ती लवकर बिग बॉसच्या बाहेर आली. अभिनेत्रीनं आता सोशल मीडियावर फोटो शेअर म्हटलंय की, 'रिॲलिटी शो म्हणजे आपल्या जीवाशी खेळ करणं नसावं.

मी मोठ्या विश्वासानं या घरात प्रवेश केला होता, पण मला मानवी मर्यादांपलीकडे ढकलण्यात आलं. स्वयंपाकघरात उंदीर आणि झुरळांसोबत राहावं लागलं. तो अनुभव अक्षरशः भयानक होता. अत्यंत अस्वच्छ परिस्थितीमुळे मला 'स्केबीज' सारखा त्वचारोग झाला. आता जबाबदारी निश्चित होणं गरजेचं आहे.'

'मला टॉवेल आणि अगदी रेझरसारख्या मूलभूत गरजेच्या वस्तू इतरांसोबत वाटून घेण्यास भाग पाडलं गेलं, त्यामुळे त्वचेचा गंभीर आजार झाला. कोणालाही आपल्या करिअर आणि आरोग्यापैकी एकाची निवड करावी लागू नये.' असं अभिनेत्रीनं पुढे म्हटलंय.सोनालीनं लोकमत फिल्मीला दिलेल्या मुलाखतीमध्ये म्हटलेलं की, 'स्वयंपाकघरात उंदीर फिरत होते, तेच अन्न खाल्लं जात होतं आणि तेच अन्न स्पर्धकांना दिलं जायचं. जेवणातून झुरळं यायची. शिक्षा म्हणून १७ स्पर्धकांसाठी फक्त एकच बाथरूम होतं.

# सुंदर नायिकेचा अपघाताने विद्रूप झाला चेहरा....



भारतीय सिनेइंडस्ट्रीत अशा अनेक अभिनेत्री होत्या, ज्यांचं आयुष्य हे संघर्षानं भरलेलं होतं. व्यावसायिक तसंच वैयक्तिक आयुष्यात त्यांनी बरंच काही सोसलं होतं.

असंच एक नाव म्हणजे 'खाष्ट सासू' आणि 'मंथरा' यांसारख्या अजरामर भूमिका साकारणाऱ्या दिग्गज अभिनेत्री ललिता पवार . त्यांचं आयुष्य पडद्यावर जितकं चकाकणारं होतं, तितकाच त्यांच्या आयुष्यात संघर्ष होता आणि त्यांचा प्रवास वेदनादायीही होता.

तब्बल ७०० हून अधिक चित्रपटांत काम करून ७० वर्षांहून अधिक काळ अभिनयाचा वारसा जपणाऱ्या ललिता पवार यांचा प्रवास थक्क करणारा होता. १८ एप्रिल १९१६ रोजी नाशिकजवळील येवला इथं एका सधन कुटुंबात ललिता पवार यांचा जन्म झाला. त्यांचं मूळ नाव अंबा लक्ष्मणराव सगुण असं होतें. त्यांचे वडील रेशीम आणि कापसाचे व्यापारी होते. ललिता यांना लहानपणापासूनच अभिनयाची आवड होती.

एका अपघातानं बदललं आयुष्य

१९४० च्या दशकापर्यंतललिता पवार एक अत्यंत सुंदर आणि लोकप्रिय मुख्य नायिका म्हणून ओळखल्या जात होत्या. मात्र, १९४२ मध्ये 'जंग-ए-आझादी' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान एका दुर्दैवी घटनेनं त्यांचं आयुष्य पूर्णपणे बदलून टाकलं. एका दृश्यात सहकलाकार मास्टर भगवान यांना ललिताजींच्या श्रीमुखात द्यायची होती. हा शॉट इतका जोरात बसला की ललिताजींच्या डाव्या डोळ्याची नस फाटली. चुकीच्या उपचारामुळं त्यांच्या चेहऱ्याच्या एका बाजूला अर्धांगवायूचा झटका बसला आणि त्यांचा एक डोळा कायमचा निकामी झाला.एका सुंदर नायिकेसाठी ही करिअर संपवणारी घटना होती. पण ललिता पवार हार मानणाऱ्यांपैकी नव्हत्या. त्यांनी आपल्या या शारीरिक दोषालाच आपली ताकद बनवलं आणि 'कॅरेक्टर आर्टिस्ट' म्हणून पुनरागमन केलं. त्यांनी केवळ हिंदीच नाही तर मराठी आणि गुजराती चित्रपटांतही आपली मोहोर उमटवली.

# युझवेंद्र चहलने तानिया चॅटर्जी विरोधात दाखल केला खटला



भारतीय क्रिकेटपटू युझवेंद्र चहल आजकाल खेळापेक्षा सोशल मीडियावर जास्त चर्चेत आहे. इन्फ्लुएन्सर तानिया चॅटर्जीनं दावा केला आहे की, चहलने तिला इन्स्टाग्रामवर मेसेज केला होता. यामुळे वाद निर्माण झाला आणि सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली.

तानियानं पुढे स्पष्ट केलं की, 'चहलची बदनामी करण्याचा माझा अजिबात हेतू नव्हता. मी माझ्या मित्रांसोबतही तशीच वागते. माझ्यात अजूनही तो निरागसपणा आहे. माझ्यातलं लहान मूल अजूनही जिवंत आहे आणि नेहमीच राहील. त्यानं माझं कौतुक केलं, मला ते आवडलं, बस्स इतकंच.' अभिनेत्री पुढे म्हणाली, 'बदनामीचा खटला कसा दाखल होऊ शकतो हे मला समजत नाही. मी त्याची बदनामी केली नाही, मी फक्त त्याचं कौतुक केलं. चहल एक भारतीय क्रिकेटपटू आहे आणि आयपीएलमध्ये खेळतो. मी त्याच्या वैयक्तिक आयुष्यात किंवा इतर कोणत्याही गोष्टीत हस्तक्षेप करत नाही.'अभिनेत्री म्हणाली, हे २०२३ मध्ये घडलं. जर तिला असं काही करायचं असतं, तर तिनं ते आधीच केलं असतं. तानिया म्हणाली, 'हे २०२३ मध्ये घडलं. त्यावेळी तो विवाहित आहे हे सर्वांना माहीत होतं.

**चहलबद्दल बोलताना काय म्हणाली तानिया?**

आयएएनएसला दिलेल्या मुलाखतीत तानियानं या प्रकरणावर भाष्य केलं. तानिया म्हणाली, 'तो फक्त एक नॉर्मल मेसेज होता. लोक मला ट्रोल करत आहेत, माझीच बदनामी होत आहे. युझवेंद्र चहलबद्दल बोलताना तानिया म्हणाली, 'त्यात काहीही चुकीचं नव्हतं किंवा वाद निर्माण करण्यासारखं काहीही नव्हतं. माझ्या मनात त्याच्याबद्दल खूप आदर आहे. मी त्याचा खूप आदर करते. तो एक भारतीय खेळाडू आहे आणि देशासाठी खूप मेहनत करतो. त्यानं फक्त मला 'क्युट' म्हटलं आणि आमचं बोलणं आयपीएलबद्दल होतं.'

**अभिनेत्रीचे वडील प्रकरणाची चौकशी करत आहेत**

'माझे वकील या प्रकरणाची चौकशी करत आहेत आणि त्यांनी मला यावर अधिक काही बोलण्यास मनाई केली आहे, पण माझा अजूनही विश्वास आहे की त्यानेच मला मेसेज केला होता.' असंही सांगितलं.



# 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये'

महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या भोंदू बाबा अशोक खरात च्या प्रकरणात धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रूपाली चाकणकर अशोक खरातला गुरु मानत असल्याचं समोर आलं आणि याप्रकरणात त्यांचंही नाव गोवलं गेलं. त्यामुळे रुपाली चाकणकर यांना त्यांची दोन पदं गमवावी लागली.

त्याचबरोबर एसआयटी तपासात रुपाली चाकणकर यांची बहीण प्रतिभा चाकणकर यांचंही नाव याप्रकरणात जोडलं गेलं. त्यामुळे अशोक खरात प्रकरणात रोज नव-नवीन खुलासे होत आहेत. अशातच आता यावर मराठी अभिनेते भारत गणेशपुरे आणि पूजा सावंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

**काय म्हणाली पूजा सावंत?**

त्याचबरोबर याप्रकरणी पुढे पूजा सावंत म्हणाली की, 'आपल्याकडे कुठल्याही स्त्रियांच्या बाबतीत किंवा पुरुषांच्या बाबतीतसुद्धा जर शारीरिक त्रास कुठेही कोणी देत असेल, आपल्याकडे कठोर शिक्षा असेल, लगेच गुन्हेगाराला ती शिक्षा मिळत असेल तर गुन्हेगार तो गुन्हा करण्यापूर्वी किमान दोनदा विचार करेल. आता ही जी काही संख्या आहे बलात्काराची किंवा या सगळ्या भोंदूगिरीची, कुठेतरी कमी होईल.'

रहस्यांनी भरलेला, श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये ठळक रेष दर्शवणारा चित्रपट म्हणजे सालबर्डी

'सालबर्डी' सिनेमात पूजानं मनोरमा प्रधान या पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली आहे. 'मनोरमा प्रधान म्हणून याकडे बघताना मी म्हणेन की, न्याय हा खूप कठोर पाहिजे.

कठोर शिक्षा असेल तर कुठेतरी आळा घालता येईल. आणि काही वर्षांनी आपल्याला जसा भारत हवाय तसा करता येईल.' असंही पूजानं पुढे सांगितलं.

दरम्यान, 'सालबर्डी' या सिनेमाबद्दल सांगायचं तर हा सिनेमा १७ एप्रिल २०२६ रोजी प्रदर्शित झाला असून या सिनेमात पूजा सावंत, शशांक शेंडे, भारत गणेशपुरे, अंशुमन विचारे, ओंकार भोजने, रोहित कोकाटे, कमलाकर सातपुते, चित्तरंजन गिरी, अनिल नगरकर, माधव अभ्यंकर, प्रवीण डाळिंबकर यांच्या महत्वपूर्ण भूमिका आहेत.

**अशोक खरात प्रकरणी भारत गणेशपुरे यांची प्रतिक्रिया**

**भारत गणेशपुरे आणि पूजा सावंत त्यांच्या 'सालबर्डी' या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. या सिनेमाच्या निमित्तानं 'सालबर्डी' सिनेमाच्या टीमनं 'एबीपी माझा' सोबत संवाद साधला. यादरम्यान खरात प्रकरणाबद्दल विचारलं असता भारत गणेशपुरे म्हणाले की, 'तो खरात म्हणतो, 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये. चमत्कार वैगरे काही नाही, मी थोडा विज्ञानाचा वापर करतो, थोड्या ट्रिक वापरतो आणि त्यामुळे मी हे केलेलंय.' आता लोकांनी या गोष्टी समजून घ्यायला पाहिजे, यामध्ये काही जादू नाहीये, काही चमत्कार नाहीये.'**



## उन्हाळ्यात नुसतेच स्टायलिश गॉगल.....

सध्या वातावरण अतिशय गरम झालेलं आहे. दुपारच्यावेळी तर उन्हाचा कडाका भयंकरच असतो. पण सकाळी अगदी १० वाजेच्या आधीही घराबाहेर पडायला नकोसं वाटावं एवढं ऊन वाढलेलं असतं. उन्हामुळे मग साहजिकच डोळे चमकायला लागतात. उन्हाचा कडाका डोळ्यांना सहन होत नाही. त्यामुळे मग गॉगल लावावाच लागतो. एरवी हौस म्हणून स्टायलिश गॉगल लावणं चालू शकतं. पण उन्हाळ्यात मात्र गॉगल ही फक्त स्टाईल नसून गरज असते. त्यामुळे उन्हाळ्यात गॉगलची खरेदी थोडी काळजीपुर्वक करणं गरजेचं आहे. नाहीतर डोळ्यांचं नुकसान होऊ शकतं..

१. उन्हाळा सुरू झाला की ठिकठिकाणी गॉगलचे स्टॉल लागलेले दिसतात. अगदी प्रत्येक शहरातल्या कित्येक चौकांमध्ये, मुख्य रस्त्यांवर गॉगल विकायला असतात. त्याठिकाणी मिळणारे गॉगल अतिशय आकर्षक असतात. त्यामुळे साहजिकच ते घेण्याचा मोह होतो.

पण तो आवरा. कारण ते स्वस्तातले गॉगल तुमच्या डोळ्यांसाठी चांगले असतीलच असं नाही. कारण एरवी ते गॉगल लावण्यास हरकत नाही. पण उन्हाळ्यात जर खरोखर डोळ्यांचं संरक्षण करायचं असेल तर असे स्वस्तातले गॉगल टाळलेलेच बरे.

२. दुकानात गॉगल घेताना त्या गॉगलची फक्त स्टाईल बघू नका. शक्यतो ऊन असताना दुपारच्या वेळी गॉगल खरेदी करा. तो गॉगल घालून पाहा. खरंच डोळ्यांना शांत वाटत असेल तरच खरेदी करा.

कुलरची गार हवा कमी आणि आवाजच जास्त? ५ रुपयांचे पदार्थ कुलरमध्ये घाला- खोली होईल एसीपेक्षा गार

३. उन्हाळ्याच्या दिवसांत पिवळसर छटा असणारे गॉगल घेण्यापेक्षा काळपट, निळसर काचा असणारे गॉगल खरेदी करणं जास्त चांगलं. कारण या रंगांचे गॉगल डोळ्यांना जास्त गारवा देतात.४. गॉगलच्या काचांचा आकार विचारात घ्या.

## उन्हात स्टायलिश आणि आरामदायी दिसण्यासाठी बंद कॉलरचे कॉटन कुर्ता

उन्हाळ्याच्या कडक उन्हात स्टायलिश आणि आरामदायी दिसण्यासाठी बंद कॉलरचे कॉटन कुर्ता सेट्स हा एक उत्तम पर्याय आहे. कॉटनमध्येही तुम्ही खादी कॉटन, लिलन-कॉटन किंवा मलमल प्रकारच्या कापडाची निवड करू शकता. हे प्रकार उन्हाळ्यात अधिक हवाशीर वाटतात. उन्हाळ्यासाठी १००टक्के सुती कापड अत्यंत उपयुक्त असते, कारण ते घाम शोषून घेते आणि त्वचेला थंडावा देते. बंद कॉलर मुळे कुर्त्याला एक शिस्तबद्ध आणि 'रॉयल' लूक मिळतो, जो कोणत्याही कार्यक्रमात उठून दिसतो. उन्हाळ्यासाठी पांढरा, आकाशी, हलका गुलाबी किंवा पेस्टल रंगांचे कुर्ता सेट्स डोळ्यांना थंडावा देतात. हे सेट्स तुम्ही ऑफिस, घरगुती कार्यक्रम किंवा सण-समारंभासाठी सहजपणे परिधान करू शकता.बंद कॉलरच्या कुर्त्यासोबत पायजमा, चुडीदार किंवा अगदी जीन्स घातल्यास एक आधुनिक 'इंडो-वेस्टर्न' लूक तयार होतो.सध्या मानेभोवती आणि कॉलरवर हलकी एम्ब्रॉयडरी किंवा थ्रेड वर्क असलेले कुर्ता सेट्स खूप लोकप्रिय आहेत. सुती कुर्ते धुण्यास सोपे असतात आणि इस्त्री केल्यानंतर ते अतिशय नेटके दिसतात.न्हाळ्यात या सेटसोबत कोल्हापुरी चपला आणि सनग्लासेस वापरल्यास तुमचा लूक पूर्ण आणि स्टायलिश वाटतो.केवळ साधे कॉटनच नाही, तर लिनन-कॉटन किंवा खादी कॉटनचे बंद कॉलर कुर्ते उन्हाळ्यात अधिक 'प्रीमियम' आणि क्लासी दिसतात.



## आजीआजोबांच्या काळातल्या बॅगी पॅण्टची जेन झीला पडली भूरळ, फिल्मस्टार्सही ढगळ्या पॅण्टचे झाले दिवाने..

फॅशनच्या दुनियेत काही ट्रेंड असे असतात जे पुन्हा पुन्हा परत येतात आणि प्रत्येक वेळी नव्या स्टाइलसह तरुणांना भुरळ घालतात. बॅगी पॅण्ट हा तसाच एक ट्रेंड आहे, जो आजच्या काळात पुन्हा एकदा जोरदार सुरु आहे. आरामदायक फिट, स्टायलिश लुक आणि सहज कॅरी करता येणारी रचना यामुळे बॅगी पॅण्ट तरुणांमध्ये प्रचंड लोकप्रिय झाली. पूर्वी तर ही पॅण्ट आवडीने वापरली जायची मध्यंतरी त्याचे फॅड कमी झाले होते मात्र आता पुन्हा ती स्टाइल वापरली जात आहे.

बॅगी पॅण्टची खासियत म्हणजे तिचा सैलसर आणि रिलॅक्स्ड फिट. शरीराला चिकटणाऱ्या कपड्यांपेक्षा ही पॅण्ट अधिक मोकळेपणाची भावना देते, त्यामुळे दिवसभर आरामात राहता येतं. पूर्वी हा स्टाइल मुख्यतः हिप-हॉप संस्कृतीशी जोडला जात होता, पण आता तो सहज कोणीही वापरतो. मुलं आणि मुली दोघेही हा ट्रेंड आवडीने फॉलो करत आहेत.

या ट्रेंडमध्ये विविध प्रकारही पाहायला मिळतात. कार्गो बॅगी पॅण्ट्स, ज्यामध्ये मोठे पॉकेट्स असतात, त्या सध्या खूप ट्रेंडमध्ये आहेत आणि कॅज्युअल लुकसाठी उत्तम मानल्या जातात. डेनिम बॅगी जीन्स हा एक क्लासिक प्रकार आहे, जो कॉलेज गोइंग तरुणांमध्ये विशेष लोकप्रिय आहे. तसेच हाय-वेस्ट बॅगी पॅण्ट्स मुलींमध्ये खूप आवडत्या ठरत आहेत, कारण त्या स्टाइलसोबतच एक वेगळा फिट देतात. लिनन किंवा कॉटन मटेरियलमधील बॅगी पॅण्ट्स उन्हाळ्यासाठी हलक्या आणि आरामदायक असतात.



तरुणांमध्ये बॅगी पॅण्टची क्रेझ वाढण्यामागे सोशल मीडिया आणि सेलिब्रिटींचा मोठा वाटा आहे. अनेक इन्फ्लुएन्सर्स आणि स्टार्स हा लुक कॅरी करताना दिसतात, त्यामुळे हा ट्रेंड पटकन लोकप्रिय होतो.

याशिवाय, आजची पिढी कम्फर्ट फर्स्ट या संकल्पनेवर भर देते, आणि बॅगी पॅण्ट त्यासाठी परफेक्ट पर्याय ठरते. गौरी प्रधान , हर्षवर्धन कपूर, करीना कपूर, दीपिका पदूकोण इतरही अनेक सेलिब्रिटी आजकाल विविध प्रकारच्या बॅगी पॅण्ट वापरतात.

बॅगी पॅण्टची किंमत पाहायला गेलं तर अगदी २०० पासून ८ ते ९ हजारापर्यंत जाते. कंपनी आणि प्रकारानुसार त्याची किंमत ठरते. उन्हाळ्यासाठी एकदम मस्त असा प्रकार आहे.

## रोज रात्री दुधात 'हा' पदार्थ घालून प्या, सुटलेले पोट होऊ लागेल सपाट

वाढते वजन आणि सुटलेले पोट ही आजच्या काळात अनेकांसाठी डोकेदुखीच ठरत आहे. वाढलेले वजन, पोटाची ढेरी कमी करण्यासाठी आपण तासंतास जिममध्ये घाम गाळतो, डाएट करतो आणि नवनवीन उपाय शोधत असतो. पण इतके प्रयत्न करूनही अनेकदा वजनाचा काटा हलत नाही आणि पदरी निराशा येते. याचं मुख्य कारण म्हणजे आपण आपल्या व्यायामावर जेवढा भर देतो, त्या तुलनेत आपल्या रोजच्या खाण्यापिण्यातील छोट्या पण महत्त्वाच्या चुकांकडे दुर्लक्ष करतो. जर तुम्हाला खरंच वजन कमी करायचं असेल, तर सगळ्यांतआधी तुमच्या आहाराकडे लक्ष देणं खूप गरजेचं आहे. तसेच वजन कमी करण्यासाठी गोड पदार्थ टाळणंही तितकंच महत्त्वाचं ठरते

वजन कमी करताना सर्वात मोठा अडथळा असतो तो म्हणजे 'साखर'. आपण दिवसभर साखर टाळतो, पण रात्रीच्या एका चुकीच्या सवयीमुळे आपले सगळे प्रयत्न वाया जातात. आपल्यापैकी काही जणांना रात्री झोपण्यापूर्वी ग्लासभर दूध पिण्याची सवय असते. दूध हे पूर्णान्न असले तरी, त्यात चवीसाठी टाकलेली साखर शरीरातील कॅलरीज आणि फॅट्स वाढवण्यास कारणीभूत ठरते. परंतु हेच रात्रीचं दूध तुमच्यासाठी 'फॅट बर्नर' म्हणून काम करू शकतं, जर तुम्ही त्यात साखरेऐवजी दालचिनी या मसाल्याच्या पदार्थाचा वापर केला तर! दालचिनीमध्ये असे काही नैसर्गिक गुणधर्म आहेत जे मेटाबॉलिझम वेगवान करतात आणि झोपेतही तुमची चरबी जाळण्यास मदत करतात. साखरेचं दूध पिण्याऐवजी 'दालचिनी दूध' घेतल्यास वजन कमी होण्यासोबतच पचनही सुधारते.

जर तुम्हांला वजन कमी करुन कायमसाठी नियंत्रित करायचे असेल, तर सर्वात आधी दुधामध्ये दालचिनी मिसळून पिण्यास सुरुवात करा.

यासाठी एक पॅन घ्या, त्यात दूध आणि दालचिनीची थोडीशी पूड घालून ते चांगले उकळवून घ्या. आता रोज रात्री झोपण्यापूर्वी




असे दालचिनी घातलेले दूध आवर्जून ग्लासभर प्या. यामुळे वजन अत्यंत वेगाने कमी होऊ शकते.'अमेरिकन जर्नल ऑफ क्लिनिकल न्यूट्रिशन'नुसार, जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल, तर दूध आणि दालचिनी हे तुमच्यासाठी एक आरोग्यदायी पर्याय असू शकतो.

हे स्नायूंची निर्मिती करून शरीरावरील थुलथुलीत चरबी कमी करण्यास मदत करते.

दूध हे प्रथिनांचा एक चांगला स्त्रोत आहे, ज्यामुळे मांसपेशींचा विकास होतो.

आणि शरीर सुदृढ राहतेदुधामध्ये भूक नियंत्रित ठेवण्यास आणि वजन कमी करण्यास मोठ्या प्रमाणात मदत करते.परिणामी शरीरातील अतिरिक्त कॅलरीज वेगाने बर्न होतात.

## कितीही पौष्टिक असले तरी 'हे' पदार्थ रात्री खाऊ नयेत, वजन- शुगर वाढून तब्येत बिघडते

कोणता पदार्थ कुठल्यावेळी खाल्ल्याने तो उत्तम पचतो, याचे काही नियम असतात. त्यानुसार तो पदार्थ खाल्ला गेला तर त्याचे आरोग्याला खूप चांगले फायदे मिळतात.

म्हणूनच असे काही पदार्थ आहेत जे रात्रीच्या वेळी खाणं टाळायलाच हवं. कारण ते कितीही पौष्टिक असले तरी ते रात्रीच्या वेळी खाणं आरोग्यासाठी चांगलं नाही. ते पदार्थ नेमके कोणते ते पाहा..

त्यापैकी सगळ्यात पहिला पदार्थ आहे दही किंवा ताक. दही किंवा ताक रात्रीच्यावेळी खाल्ल्याने ते पचत नाही. यामुळे ?सिडीटी, जळजळ, पोटात आग होणे असे त्रास होऊ शकतात.

रात्रीच्यावेळी फळं खाणंही योग्य नाही. त्यामुळे कफ प्रवृत्ती वाढते. दुपारची वेळ किंवा दोन जेवणांच्या मधली वेळ फळं खाण्यासाठी योग्य आहे.



ज्यांची पचनशक्ती चांगली नसते म्हणजे ज्यांना नेहमीच पचनाचे वेगवेगळे त्रास होत असतात त्यांनी गव्हाची पोळीही रात्रीच्या वेळी खाणं टाळायला हवं.

मैद्याचे पदार्थ अतिशय जड असतात. ते खरंतर कधीच खाणं चांगलं नाही. पण त्यातही खायचेच असतील तर दुपारच्या वेळी खावे. रात्रीच्या वेळी मैद्याचे पदार्थ खाणं टाळावं. त्यामुळे अपचन, कोलेस्टेरॉल आणि वजन वाढणे असे त्रास होऊ शकतात.मोड आलेली कडधान्येही रात्रीच्या वेळी खाऊ नका. ते पचनाला जड असतात. त्यामुळे अपचनाचा त्रास होतो.काकडी, टोमॅटो, बीट, गाजर असे कोणतेच सलाड कच्च्या स्वरुपात रात्री खाऊ नये. खायचेच असतील तर थोडेसे शिजवून घ्यावे आणि मग खावे.

रात्रीच्या जेवणानंतर हमखास अनेक लोक आईस्क्रिम खातात. सध्या उन्हाळा असल्याने तर आईस्क्रिम, डेझर्ट नेहमीच खाल्ले जाते. पण आयुर्वेदानुसार रात्रीच्यावेळी थंड आणि गोड पदार्थ खाणं टाळावं, अशी माहिती ५४९४ या इंस्टाग्राम पेजवर शेअर करण्यात आली आहे.

## वजन कमी करण्यासाठी ब्रोकोली




वजन कमी करणाऱ्यांसाठी ब्रोकोली हा एक उत्तम पर्याय मानला जातो. ब्रोकोलीमध्ये नानाविध पोषक तत्व असल्याने, वजन कमी करण्यासाठी फार महत्त्वाची भूमिका बजावते. ब्रोकोलीमध्ये फायबरचे प्रमाणही चांगले असते, त्यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहते. अमेरिकेच्या कृषी विभागाच्या मते, १०० ग्रॅम ब्रोकोलीमध्ये ३४ किलोकॅलरी ऊर्जा, २.८२ ग्रॅम प्रथिने आणि २.६ ग्रॅम फायबर असते. हा कॅल्शियमचा एक चांगला स्त्रोत आहे आणि त्यात मॅग्नेशियम, फॉस्फरस, पोटॅशियम, सेलेनियम, व्हिटॅमिन सी, फोलेट, कोलीन, व्हिटॅमिन ए, ल्युटीन, झियाझॅन्थिन आणि व्हिटॅमिन के देखील असतात.

वजन कमी करण्याच्या आहारात ब्रोकोलीचा समावेश करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे ती ५ ते ६ मिनिटे वाफवून घेणे आणि नंतर खाणे. यामुळे त्यातील पोषक तत्वे टिकून राहतात आणि अतिरिक्त चरबी नाहीशी होते. ब्रोकोली वाफवल्यानंतर, ड्रेसिंगसाठी थोडे लिंबाचा रस, मीठ, काळी मिरी आणि थोडे ऑलिव्ह तेल घालून त्याचा आनंद घ्या.

वजनावर नियंत्रण ठेवताना रात्रीचे जेवण हलके ठेवायचे असेल, तर तुम्ही ब्रोकोलीचे सूप बनवू शकता. ते पौष्टिक आणि स्वादिष्ट दोन्ही आहे. हे करण्यासाठी, एका पॅनमध्ये थोडे बटर घाला, त्यात लसूण आणि कांदा घालून हलके परता. नंतर चिरलेली ब्रोकोली घालून २ मिनिटे परता. आता व्हेजिटेबल स्टॉक किंवा पाणी घालून ५ ते ६ मिनिटे उकळवा. थोडे मीठ घाला.

शिजल्यावर, त्याची प्युरी बनवण्यासाठी मिक्सरमध्ये बारीक करा. नारळाचे दूध घाला आणि वरून काळी मिरी पूड भुरभुरून खा.




## रोज सकाळी पेरूची पाने चावून खा

मौखिक स्वच्छता ही आपल्या आरोग्यासाठी खूप गरजेची असते. मौखिक स्वच्छता नसल्याने हिरड्यांना सूज येणे, दातदुखी किंवा तोंडाची दुर्गंधी यांसारख्या समस्यांमुळे केवळ अस्वस्थता येत नाही, तर आत्मविश्वासही कमी होतो. सकाळी रिकाम्या पोटी पेरूची कोवळी पाने चावणे हा या समस्यांवर एक सोपा आणि स्वस्त उपाय आहे. या पानांमधील दाहक-विरोधी आणि जीवाणू-विरोधी गुणधर्म तोंडात वाढणाऱ्या जीवाणूंना नष्ट करण्यासाठी कोणत्याही महागड्या औषधांइतकेच प्रभावी आहेत.तोंडाच्या दुर्गंधीवर बाजारात उपलब्ध असलेले माउथवॉश तात्पुरते काम करू शकतात, परंतु पेरूची पाने मुळावर काम करतात. त्यामध्ये असलेले फ्लेव्होनॉइड्स आणि टॅनिन तोंडाच्या दुर्गंधीला कारणीभूत असलेल्या जंतूंना नष्ट करतात. सकाळी फक्त एक किंवा दोन कोवळी पाने धुवा आणि ती पूर्णपणे चावा. तुम्हाला दिवसभर ताजेतवाने वाटेल, ज्यामुळे कृत्रिम स्प्रेची गरज भासणार नाही.पेरूची पाने हिरड्यांमधून रक्त येण्यावर रामबाण उपाय आहेत. ही पाने चावल्यानंतर, त्यातून निघणारा रस हिरड्यांना खोलवर स्वच्छ करतो आणि सूज कमी करतो. पेरूची पाने चावता आणि त्यांचा रस श्वासावाटे आत घेता, तेव्हा ते तुमच्या पचनसंस्थेसाठी डिटॉक्सिफायिंग (विषारी घटक बाहेर काढण्याचे) काम करते. पेरूच्या पानांमध्ये असे घटक असतात जे पोटातील हानिकारक जीवाणूंना मारतात, ज्यामुळे गॅस, बद्धकोष्ठता आणि आम्लपित्त यांसारख्या समस्यांपासून त्वरित आराम मिळतो.


## कलिंगड विकत घेताना...

उन्हाळा आणि कलिंगड यांचं एक अनोखं नातं आहे. उन्हाळ्यात रस्त्यावर कलिंगडाची रास विकण्यासाठी दिसल्यावर आपले पाय आपसुक कलिंगड विकत घेण्यासाठी वळतात.

परंतु अनेकदा कलिंगड विकत घेताना तुम्हालाही फसल्यासारखे होते का.. कलिंगड विकत घेताना कधीतरी ते आतून अर्धेअधिक पांढरे निघते. तर कधी आतून पिवळसरही असते. अशावेळी कलिंगड विकत घेताना काही गोष्टी या लक्षात ठेवणे खूप गरजेचे आहे. कलिंगड घेताना काही गोष्टी लक्षात ठेवल्या तर, कलिंगड घेणे हे अगदी सोपे होईल.



कलिंगड हे उन्हाळ्यात सर्वाधिक खाल्ले जाणारे फळ आहे, पण कधीकधी बाहेरून चांगले दिसणारे कलिंगड कापल्यावर बेचव निघते. त्यामुळे कलिंगड विकत घेताना ते गोड आहे की नाही हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.कलिंगड हातात घेऊन सर्वात आधी ठोकून बघावे. कलिंगड आतून पिकलेले असेल तर आवाज येईल. समजा बाहेरून ठोकल्यानंतर आवाज नाही आला तर समजायचे कलिंगड कच्चे आहे.वजनाला हलके कलिंगड असेल तर ते अजिबात घेऊ नये. कलिंगड खरेदी करताना, एकाच आकाराची दोन कलिंगड हातात घ्यावी. जे जड असेल ते अधिक पाणीदार आणि गोड असते.कलिंगड खरेदी करताना, त्याची खालची बाजू तपासा. खालच्या बाजूचा रंग जितका जास्त पिवळा असेल, तितके कलिंगड गोड असते. तथापि, जर रंग पांढरा किंवा फिकट पिवळा असेल, तर कलिंगड कच्चे असण्याची शक्यता आहे.कलिंगडाची वरची साल पूर्णपणे काळपट हिरवी असायला हवी हे लक्षात ठेवा.कलिंगडावर थोडासा पिवळसर डाग असेल तर, ते कलिंगड आतून लाल असणार हे नक्की.कलिंगड घेताना गोलसर किंवा अंडाकृती आकाराचे कलिंगड निवडावे.कलिंगड घेताना दोन कलिंगड हातात आळीपाळीने घेऊन बघावे. कलिंगड हाताला जड मजबूत लागला तर तो कलिंगड चांगला आहे असे समजावे.कलिंगड वजनाला हलका लागल्यास तो कलिंगड विकत घेऊ नये.




अलिबाग हे केवळ त्याच्या सुंदर समुद्र किनाऱ्यांसाठीच नाही, तर ऐतिहासिक वारसा, आध्यात्मिक शांतता आणि चविष्ट कोकणी खाद्यसंस्कृती साठीही जगभरात प्रसिद्ध आहे. उन्हाळीच्या सुट्टीत किंवा लाँग विकेंडला अनेकजण अलिबागला जाण्याचे बेत आखतात. पण पर्यटकांना अलिबाग म्हणजे फक्त समुद्र किनारा एवढंच माहितेय. बीचच्या पलीकडेही अलिबागला एक वेगळी संस्कृतीही आहे. अलिबागच्या इतिहासाची साक्ष देणारे अनेक जलदुर्ग येथे आहेत, तसंच अनेक प्राचीन आणि जागृत देवस्थाने आहेत. अलिबागच्या खाद्यसंस्कृतीबद्दल तेथे गेलेल्या पर्यटकांना वेगळं काही सांगायलाच नको. चला तर मग येथील बीचव्यतिरिक्त येथे काय काय प्रसिद्ध आहे, त्यावर एकदा नजर मारुया.

**कोलाबा किल्ला**

अलिबाग बीचपासून समुद्रामध्ये असलेला कोलाबा हा ऐतिहासिक किल्ला ओहोटीच्या वेळी चालत किंवा घोडागाडीने जाऊन पाहता येतो. भरती असताना किल्ल्यापर्यंत पोहोचण्यासाठी बोटीचा वापर करावा लागतो. बोटीचे तिकीट साधारणतः ?२०० (येण्या-जाण्यासाठी) असते. सकाळी १० ते संध्याकाळी ५.३० पर्यंत पर्यटक येथे भेट द्यायला जाऊ शकतात. मात्र, भरती-ओहोटीच्या वेळांमुळे याच्या वेळाही बदलू शकतात. भारतीयांसाठी २५ रुपये आणि परदेशी पर्यटकांच्या सोयीसाठी साधारण ३०० ते ५०० रुपये आकारले जातात.

**जंजिरा किल्ला**

अलिबागपासून साधारण ५५ कि.मी. अंतरावर असलेला मुरुड-जंजिरा हा केवळ किल्ला नसून तो मानवी जिद्द आणि अजोड स्थापत्यकलेचे प्रतीक आहे. हा अभेद्य जलदुर्ग त्याच्या अवाढव्य बांधकामासाठी आणि २३ बुरुजांसाठी प्रसिद्ध आहे. अरबी समुद्रात एका बेटावर वसलेला हा जलदुर्ग गेल्या ३५० वर्षांहून अधिक काळ 'अजिंक्य' राहिला आहे. अलिबागवरून तुम्ही खाजगी वाहन किंवा एसटी बसने राजपुरी जेटीपर्यंत जाऊ शकता. तिथून शिडाच्या होड्यांनी किल्ल्यावर नेले जाते. बोटीचा खर्च ८० ते १५० रुपये असू शकतो तर, किल्ल्यामधील प्रवेश शुल्कासाठी २५ रुपये आकारले जातात.

**रेवदांडा किल्ला**

अलिबागपासून साधारण १७ ते २० किमी अंतरावर असलेला रेवदंडा किल्ला हा पोर्तुगीज स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. हा किल्ला कुंडलिका नदीच्या मुखाशी समुद्रकिनाऱ्याला लागूनच आहे, त्यामुळे येथील नैसर्गिक सौंदर्य पाहण्यासारखे असते. सकाळी ९ ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत पर्यटक येथे जाऊ शकतात. येथे प्रवेश विनामुल्य आहे.

**कनकेश्वर मंदिर**

लिबागपासून सुमारे १२ किमी अंतरावर मापगावजवळ एका टेकडीवर वसलेले कनकेश्वर मंदिर (श्री क्षेत्र कनकेश्वर) हे एक अतिशय प्राचीन आणि जागृत शिवमंदिर आहे. मंदिरापर्यंत पोहोचण्यासाठी साधारण ७०० ते ७५० पायऱ्या चढाव्या लागतात. हा प्रवास पूर्ण करण्यासाठी साधारण ४५ ते ६० मिनिटे लागतात.

**बिर्ला मंदिर**

अलिबागपासून सुमारे २० किमी अंतरावर सालाव गावात एका टेकडीवर असलेले बिर्ला मंदिर हे अलिबागच्या प्रमुख आकर्षणांपैकी एक आहे. दुधाळ पांढऱ्या संगमवरी दगडातील हे मंदिर त्याच्या अप्रतिम वास्तुकलेसाठी आणि शांत परिसरासाठी प्रसिद्ध आहे. हे मंदिर संध्याकाळी रोषणाईमध्ये अतिशय सुंदर दिसते, त्यामुळे ५:३० नंतर भेट देणे अधिक चांगले ठरते

**नागावचे रामेश्वर मंदिर**

नागावचे श्री रामेश्वर मंदिर हे अलिबाग जवळील नागाव गावातील अत्यंत प्राचीन आणि जागृत देवस्थान मानले जाते. हे मंदिर त्याच्या शांत वातावरणासाठी आणि पारंपरिक कोकणी स्थापत्यशैलीसाठी प्रसिद्ध आहे. सकाळी ६ ते रात्री ८ पर्यंत मंदिर दर्शनासाठी खुले असते.

**मॅग्नेटिक ऑब्झर्व्हेटरी**

१९०४ मध्ये स्थापन झालेली ही वेधशाळा विज्ञानाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे ऐतिहासिक स्थळ आहे.

**अलिबागची खाद्यसंस्कृती**

अलिबागची सफर तिथल्या जेवणाशिवाय अपूर्ण आहे. ताजी मासळी, पापलेट, कोळंबी आणि खेकड्याचे विविध प्रकार येथे अत्यंत चविष्ट मिळतात. तर, अलिबागचा पांढरा कांदा जगप्रसिद्ध असून त्याला भौगोलिक मानांकन मिळालेले आहे.

हा कांदा औषधी गुणांसाठीही ओळखला जातो.

---

# डोळ्यांची खरी परीक्षा! पुस्तकाच्या मध्यभागी लपलेली पेन्सिल दिसतेय का?

आजकाल सोशल मीडियावर ऑप्टिकल इल्यूजन म्हणजेच नजरेला भ्रमित करणाऱ्या चित्रांची जोरदार चर्चा आहे. ही चित्रं केवळ मनोरंजन करत नाहीत, तर तुमची निरीक्षणशक्ती, लक्ष केंद्रित करण्याची क्षमता आणि मेंदूची कार्यक्षमता यांचीही कसोटी पाहतात.

काही वेळा तर अशा इल्यूजनमधून तुमच्या व्यक्तिमत्त्वाबद्दलही रोचक गोष्टी समजतात आणि आज आम्ही तुमच्यासाठी घेऊन आलो आहोत असाच एक भन्नाट चॅलेंज!

सध्या सोशल मीडियावर ऑप्टिकल इल्युजनफोटो मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहेत. हे फोटो पाहताना डोळ्यांना फसवणारी अशी दृश्यं दिसतात, ज्यामुळे अनेकजण गोंधळून जातात. अशाच एका नव्या फोटोने पुन्हा एकदा सोशल मीडियावर धुमाकूळ घातला आहे. हा फोटो पाहून खरंच तुम्हाला उत्तर शोधता येतंय का, ते एकदा नक्की तपासा.

तुमच्यासमोर एक रंगीबेरंगी पुस्तकांचा ढिगारा आहे. वरकरणी हे चित्र अगदी साधं वाटेल, पण त्यात एक छोटासा ट्विस्ट आहे-या पुस्तकांमध्ये कुठेतरी एक पेन्सिल लपलेली आहे!


**होय, अगदी बरोबर वाचलं तुम्ही..**

तुम्हाला ती पेन्सिल शोधायची आहे-आणि तेही फक्त २० सेकंदांत!

वेळ सुरू झालीष्ठ शोधायला तयार आहात?

**चित्र नीट पाहा..**

प्रत्येक कोपरा तपासा...



कुठलाही भाग दुर्लक्षित करू नका.तुमची नजर किती तीक्ष्ण आहे हे आता समजणार आहे.पण सावध! ही पेन्सिल सहज दिसणार नाही.

**सापडली का?**

जर तुम्हाला पेन्सिल दिसली असेल-तर खूप छान! तुमची निरीक्षणशक्ती खरोखरच तीक्ष्ण आहे.

पण, अजूनही शोध सुरू आहे? काळजी करू नकाष्ठ हे चॅलेंज खरंच अवघड आहे.

**छोटासा इशारा**

अजून सापडली नसेल तर हा हिंट तुमच्यासाठी-

ही पेन्सिल पुस्तकांच्या रंगातच मिसळलेली आहे. विशेष म्हणजे, ती हिरव्या रंगाच्या पुस्तकांसारखीच दिसते.

**आता पुन्हा एकदा नीट पाहा...**

तुमची 'ईगल आय' वापरा! आता तरी दिसली का?

जर आता तुम्हाला पेन्सिल सापडली असेल तर अभिनंदन!

तुमचं लक्ष आणि निरीक्षणशक्ती दोन्हीही उत्तम आहे.

**अजूनही नाही?**

काही हरकत नाही! प्रत्येक वेळी जिंकणं गरजेचं नसतं. अशा ऑप्टिकल इल्यूजनमुळे तुमचा मेंदू अधिक सक्रिय होतो आणि पुढच्या वेळी तुम्ही नक्कीच जलद उत्तर शोधाल.

**येथे पाहा पेन्सिल**

**ऑप्टिकल इल्यूजन का महत्त्वाचे?**

अशा प्रकारचे चॅलेंजेस केवळ वेळ घालवण्यासाठी नसतात. ते तुमची एकाग्रता वाढवतात, मेंदूला चालना देतात आणि समस्यांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतात.

---

# कधीही कोणाला कमी समजू नका! घरासाठी सापाशी थेट भिडला सुतार पक्षी

सोशल मीडियावर दररोज हजारो व्हिडीओ व्हायरल होत असतात, पण काही दृश्यं अशी असतात की ती पाहून नजर हटतच नाही. सध्या असाच एक थरारक व्हिडीओ चर्चेत आला आहे, ज्यामध्ये एक साप आणि सुतार पक्षी (कठफोडवा) यांच्यातील जबरदस्त झुंज पाहायला मिळते. हा केवळ संघर्ष नाही, तर आपल्या घरासाठी दिलेली एक जिद्दी लढाई आहे, जी पाहून कुणालाही आश्चर्य वाटेल.


**नेमकं काय घडलं?**

व्हायरल झालेल्या या व्हिडीओमध्ये दिसतं की, एका झाडाच्या खोडात सुतार पक्ष्याने स्वतः मेहनत घेऊन एक मोठं भोक तयार केलं होतं. हेच त्याचं घर त्याचं सुरक्षित निवासस्थान.

मात्र, अचानक एक साप त्या भोकात शिरतो आणि तेच आपलं ठिकाण बनवण्याचा प्रयत्न करतो. सुतार पक्ष्याच्या आयुष्यातील ही धक्कादायक घटना ठरते.जसं त्याच्या लक्षात येतं की, त्याच्या घरात अतिक्रमण झालं आहे, तसं तो तात्काळ आक्रमक होतो.सुतार पक्षी वारंवार आपल्या तीक्ष्ण चोचीने झाडाच्या खोडाजवळ जोरदार प्रहार करू लागतो. त्याचा एकच उद्देश सापाला बाहेर हाकलून लावणे!

काही क्षणातच सापही बाहेर येतो आणि सुतार पक्ष्याला सामोरा जातो.

पण, इथेच खरी लढाई सुरू होते.साप फुत्कारत उभा राहतो, तर सुतार पक्षी अजिबात मागे हटत नाही. उलट तो अधिक आक्रमक होतो. आपल्या घराचं रक्षण करण्यासाठी तो सतत हल्ले करत राहतो.



दोघांमधील ही झुंज काही सेकंदांची नसून बराच वेळ चालते आणि पाहणारेही थक्क होऊन हा सामना बघत राहतात.

**अखेर कोण जिंकले?**

साप सुरुवातीला हटण्यास तयार नसतो. तो पुन्हा पुन्हा त्या भोकात घुसण्याचा प्रयत्न करतो, यावरून स्पष्ट होतं की तो त्या जागेवर हक्क सांगू इच्छितो.

पण, सुतार पक्ष्याची जिद्द काही कमी नसते. तो सतत चोचीने हल्ले करत राहतो आणि सापाला एक क्षणही शांत बसू देत नाही.

अखेर या सततच्या हल्ल्यांमुळे साप त्रस्त होतो आणि हार मानतो. शेवटी तो त्या ठिकाणाहून निघून जातो आणि सुतार पक्षी आपल्या घराचे रक्षण करण्यात यशस्वी ठरतो.हा व्हिडीओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. अनेकांनी सुतार पक्ष्याच्या धैर्याचं कौतुक केलं आहे. 'लहानसा पक्षी, पण जबरदस्त हिंमत!' अशा प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणावर येत आहेत.

हा व्हिडीओइन्स्टाग्राम अकाउंटवर शेअर करण्यात आला असून, तो लाखो लोकांनी पाहिला आहे.

**का खास आहे हा व्हिडीओ?**

हा व्हिडीओ केवळ प्राण्यांमधील झुंज दाखवत नाही, तर आपल्या घरासाठी लढण्याची वृत्तीही दाखवतो. आकाराने लहान असलेला सुतार पक्षी, पण आपल्या घरासाठी त्याने दाखवलेलं धैर्य खरोखरच प्रेरणादायी आहे.

**निष्कर्ष :** कधी कधी लढाई जिंकण्यासाठी ताकद नव्हे, तर जिद्द आणि धैर्य महत्त्वाचे ठरते आणि हेच या सुतार पक्ष्याने सिद्ध करून दाखवलं!

---

# भटकंती : ताम्रपट दानाचा इतिहास

प्राचीन काळात राजे-महाराजांनी केलेल्या दानांचे उल्लेख असलेले ताम्रपट सापडतात. इतिहासाचा अभ्यास करताना हीच दानपत्रे एक मोठा दुवा होऊन जातात.

'दा' म्हणजे देणे यावरून दान हा शब्द तयार झालेला आहे. वस्तूचे मूल्य न घेता तिच्यावरची आपली मालकी नष्ट करून तिथे दुसऱ्याची मालकी उत्पन्न करणे, अशा प्रकारचा जो त्याग, त्याला दान म्हणतात. दानाचे ढोबळमानाने ४ प्रकार सांगितले आहेत. कोणत्याही फळाचा उद्देश मनात न धरता केलेले दान, पापनाश किंवा प्रायश्चित्त हा उद्देश, संतती, संपत्तीच्या प्राप्तीसाठी केलेले आणि भगवंताच्या संतोषासाठी धर्मयुक्त अंतकरणाने व निष्काम बुद्धीने दिलेले दान.

विशिष्ट पुण्यदिवशी अथवा ग्रहणादि पर्वकाळी दाने देण्याची प्रथा आपल्याला पूर्वापार चालत आलेली दिसून येते. मुख्यत्वे राजे-महाराजांनी अशा विशिष्ट समयी मोठ्या प्रमाणावर दाने दिल्याचे उल्लेख आपल्याला दिसून येतात. ही दाने देताना ती घटना तांब्याच्या पत्र्यावर लिहून नोंदवून ठेवलेली दिसते. याचे कारण असे की, याद्वारे हे दान पिढ्यानपिढ्या सुरू राहावे, तसेच पुढे येणाऱ्या राजांना याची माहिती असावी या उद्देशाने तांब्याच्या पत्र्यावर हा मजकूर कोरून ही दानपत्रे तयार केली जातात. इतिहासाचा अभ्यास करताना हीच दानपत्रे एक मोठा दुवा होऊन जातात. प्राचीन इतिहासाचा अभ्यास करताना, त्याची संगतवार मांडणी करताना या दानपत्रांचा मोठा उपयोग होतो आहे. जेव्हा कोणी सम्राट एखाद्या देवस्थानाला किंवा ब्राह्मणाला कुठले गाव, क्षेत्र दान म्हणून देत असे त्याचा स्पष्ट उल्लेख या ताम्रपटात केलेला असे. नुसता त्याचाच उल्लेख नव्हे तर अनेकदा त्या राजाची वंशावळ, त्याने विविध युद्धांत प्राप्त केलेले विजय आणि त्या राजाची विविध विशेषणे त्या ताम्रपटात उल्लेखिलेली दिसतात. त्यामुळे ताम्रपट या एकाच साधनावरून इतिहासाची सर्वंकष जुळणी करता येते.

शिलालेख आणि ताम्रपट यात मुख्य फरक म्हणजे ताम्रपट हे चल असल्यामुळे एका ठिकाणाहून दुसरीकडे नेले जाऊ शकतात. त्यामुळे अनेकदा ताम्रपटांचा आढळ एका ठिकाणी दिसतो तर त्यात उल्लेख केलेली माहिती ही कुठल्या निराळ्या प्रदेशाचे वर्णन करते. ग्रहणकाळ हा सर्वात महत्त्वाचा पर्वकाळ समजला गेला आहे. या काळात केलेल्या दानामुळे मोठेच पुण्य लाभते अशी समजूत असल्यामुळे या काळात जास्तीत जास्त दाने दिलेली दिसून येतात. दाने देताना जेव्हा एखादे गाव दान म्हणून दिलेले असेल तर त्या गावाच्या चतुःसीमासुद्धा सांगितलेल्या असतात. त्यावरून आज प्रचलित असलेली गावे त्याकाळी कुठल्या नावाने प्रसिद्ध होती याची जाणीव होते.

उदाहरणार्थ पुण्याच्या बाबतीत बघायला गेले तर राष्ट्रकुट राजा कृष्ण याने इ. स. ७५८ आणि ७६८ साली



दिलेल्या ताम्रशासनात, तसेच ठाण्याचा शिलाहार राजा याने इ. स. ९९३ साली दिलेल्या ताम्रशासनात पुण्याचा उल्लेख 'पुणकविषय देश' असा आलेला आहे. इ. स. ७५८ सालचा राष्ट्रकुट राजा कृष्णाच्या ताम्रपटात त्याने पूगडी भट या ब्राह्मणास बोपखेल हे गाव, हेमलंबी संवत्सरात, अश्विन अमावास्येच्या सूर्यग्रहणाचे दिवशी इनाम दिले असा उल्लेख आहे. त्या ताम्रपटात त्याने बोपखेलच्या चतुःसीमा दिलेल्या आहेत.

पुण्यविषयान्तर्गत बोपरखळुग्रामः। त्यस्य पूर्वतो कलसः।

दक्षिणत नदी मूईला।

पश्चिमत दर्पपूडिका।

उत्त (र) तो भेऊसरी ग्राम।

असा मजकूर असून पुण्याचा उल्लेख पुणक-विषय असा स्पष्ट केला आहे. बोपखेलच्या आजूबाजूला असलेल्या गावांमध्ये कळस, मुळा नदी, दापोडी आणि भोसरीचा या लेखात असलेल्या उल्लेखावरून त्याकाळी पुणे एखाद्या तालुक्याचे ठिकाण असण्याएवढे मोठे होते असे समजते.

ताम्रपटावरून इतिहासाचे असे नेमके ज्ञान होते. आडिवरेजवळ असलेल्या कशेळीचा ताम्रपट हा असाच एक प्रसिद्ध दानपट आहे. इ. स. ११९१ मधील या ताम्रपटानुसार द्वितीय भोज राजाने गंडरादित्य कुमाराच्या सांगण्यावरून कोकणातील अट्टविरे (आडिवरे) भागातील कशेळी गाव बारा ब्राह्मणांच्या प्रतिदिन भोजनासाठी दान दिले.ानाचा उद्देश हा पुण्यप्राप्ती हा होय. आपण दिलेले दान हे अक्षय्य राहावे, चिरकाल टिकावे म्हणून ते ताम्रपटावर नोंदवून दिले जायचे. तत्कालीन राजांचा हा खटाटोप आजच्या इतिहास अभ्यासकांना पर्वणी ठरलेला आहे. वाकाटक, गुप्त, शिलाहार, यादव या राजांनी दाने दिलेले अनेक ताम्रपट आजही उपलब्ध आहेत. त्यावरून त्या राजांची वंशावळ, त्यांचे धार्मिक आचरण, त्यांचा आर्थिक स्तर तसेच प्रजेप्रति असलेला दृष्टिकोन इतक्या बाबी त्यांच्या ताम्रपटावरून समजतात.

जितके पुण्य त्यांना दान दिल्याने लाभले असेल त्याच्या कित्येक पटीने जास्त पुण्य त्यांना आजच्या अभ्यासकांनी दिलेल्या दुव्यामुळे लाभले असणार हे नक्की. दानासाठी वापरलेला ताम्रपट हे मध्यम अशा प्रकारे इतिहासाचे एक मोठे साधन होऊन राहिलेले आहे.

---

# अक्षय्य तृतीयेच्या मंगल दिवशी लक्ष्मी पूजन सुख- समृध्दीचे....

हिंदू धर्मात अक्षय्य तृतीया या सणाला विशेष महत्त्व आहे. यावर्षी अक्षय्य तृतीया रविवार, १९ एप्रिल २०२६ रोजी साजरी केली जाणार आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस नवीन कार्याची सुरुवात, गुंतवणूक आणि लक्ष्मी प्राप्तीसाठी केल्या जाणाऱ्या अनुष्ठानांसाठी अत्यंत शुभ आणि शक्तिशाली मानला जातो.

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी बहुतांश हिंदू घरांमध्ये लक्ष्मी पूजनाचे आयोजन केले जाते. देवी लक्ष्मीचा आशीर्वाद वर्षभर राहावा, यासाठी तिचे स्वागत स्वच्छ आणि सुशोभित घरात केले जाते. असे मानले जाते की, जिथे स्वच्छता आणि सकारात्मक ऊर्जा असते, तिथेच लक्ष्मीचा वास होतो.




**अक्षय्य तृतीया २०२६: पूजेसाठी घर कसे तयार करावे?**

**१. घराची संपूर्ण स्वच्छता**

घरातील प्रत्येक खोलीतील तुटलेल्या, जुन्या आणि निरुपयोगी वस्तू काढून टाका. फाटलेले कपडे, मुदत संपलेली औषधे आणि रिकाम्या बाटल्या फेकून द्या. हिंदू परंपरेनुसार, स्वच्छ घरात सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह अखंड राहतो, त्यामुळे देवी लक्ष्मीचे आगमन सुलभ होते.

**२. कानाकोपऱ्यांची सफाई**

अक्षय्य तृतीयेच्या दिवशी किंवा त्याच्या आदल्या दिवशी सकाळी लवकर उठून फरशी स्वच्छ करून घर स्वच्छ करावे. फर्निचरच्या मागे आणि कोपऱ्यांमध्ये साचलेली धूळ किंवा कोळीष्टके काढून टाका. कारण यामुळे सकारात्मक ऊर्जेत अडथळा निर्माण होतो.

**३. दरवाजे, खिडक्या आणि आरसे**

घराच्या खिडक्या, दरवाजे आणि आरसे कपड्याने पुसून लख्ख करा.

चमकदार आणि धूळमुक्त काच शुभ मानली जाते. घराच्या मुख्य प्रवेशद्वाराची चौकट स्वच्छ ठेवा, जेणेकरून ते देवी लक्ष्मीच्या स्वागतासाठी सज्ज दिसेल.

**४. पूजा स्थानाची मांडणी**

लक्ष्मी पूजनासाठी घरातील विशिष्ट दिशेनुसार एक शांत जागा निवडा. पूजा स्थान हे शौचालय किंवा शयनकक्षापासून दूर असावे. देवघरातील मूर्ती, चित्रे आणि पूजा साहित्य मऊ कापडाने पुसून व्यवस्थित मांडावे.

**५. नैसर्गिक सुगंधाचा वापर** फरशी पुसण्याच्या पाण्यात लिंबू, व्हिनेगर किंवा कडुनिंबाच्या पाण्याचे काही थेंब टाका. यामुळे घराला नैसर्गिक ताजेपणा मिळेल. तसंच दिवाणखाना आणि पूजा घरात अगरबत्ती किंवा सुगंधी तेलाचा वापर करा. सुखद सुगंधामुळे प्रसन्न वातावरण निर्माण होऊन देवी लक्ष्मीची कृपा प्राप्त होते.अक्षय्य तृतीया २०२६ च्या निमित्ताने, एक स्वच्छ आणि सुव्यवस्थित घर माता लक्ष्मीला तुमच्या जीवनात आमंत्रित करण्याचा उत्तम मार्ग आहे. १९ एप्रिलपूर्वीच या सोप्या गोष्टींचे पालन करून आपले घर शांती आणि आशीर्वादाने भरून टाका.